जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, रविवार १३ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०+४

12 राज्यांत मुसळधार पावसाचा अंदाज

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- अल निनोचा प्रभाव संपूर्ण देशात दिसून येत आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये समाधानकारक पाउस झालेला नाही. अनेक भागातील पावसाची तूट वाढताना पाहायला मिळत आहे. याचा परिणाम जलसाठ्यांवर झालेला दिसत आहे. पाउस कमी झाल्याने अनेक धरणे पूर्ण क्षमतेने भरलेली नाहीत. शेतकरी बांधवही संकटात आहेत. अशातच देशातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले असून पुढील ३ दिवसांत हे क्षेत्र ओडिशापासून गुजरातपर्यंत पुढे सरकण्याचा अंदाज आहे. दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, हरियाणा, पंजाब, जम्मू आणि काश्मीर, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, छत्तीसगड, आसाम, महाराष्ट्र, गुजरात, तेलंगणा, केरळ, त्रिपुरा आणि नागालँड या राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या काळात वादळी वारे वाहतील, अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे.

उत्तर कोकण, उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा, विदर्भात बहुतेक ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. १३ सप्टेंबर रोजी संपूर्ण राज्यात बहुतेक ठिकाणी पाउस पडण्याची शक्यता आहे. १४ सप्टेंबर आणि १५ सप्टेंबर रोजी कोकणात बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता असून, दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील ४ जिल्हे वगळता संपूर्ण राज्यासाठी पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. १३ सप्टेंबर रोजी उत्तर कोकण, उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही ➪(पान २ वर)

मतभेदांचे रूपांतर वादात होउ नये

पंतप्रधान मोदी अन् शी जिनपिंग यांच्यात द्विपक्षीय चर्चा; भारत-चीन संबंधांची नव्याने सुरूवात

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- दिल्लीत १८ वी ब्रिक्स शिखर परिषद पार पडली आहे. या ब्रिक्स परिषदेत रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन, चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग, इराणचे अध्यक्ष पेझेश्कियान यांच्यासह आणखी काही राष्ट्रांचे प्रमुख सहभागी झाले होते. या ब्रिक्स परिषदेच्या बैठकीत विविध जागतिक विषयांवर चर्चा झाली आहे. या परिषदेदरम्यानच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात शनिवारी द्विपक्षीय बैठक पार पडली आहे.

पंतप्रधान मोदी आणि शी जिनपिंग यांच्यात झालेल्या द्विपक्षीय बैठकीतील चर्चेत भारत आणि चीनमधील मतभेदांचं रूपांतर वादात होउ न देण्याच्या अनुषंगाने चर्चा झाली. जवळपास सात वर्षांनंतर शी जिनपिंग हे भारतात दाखल झालेले आहेत. त्यामुळे सात वर्षांनंतर या दोन नेत्यांची ही पहिलीच द्विपक्षीय बैठक होती. दरम्यान, ऑगस्ट २०२५ मध्ये तियानजिन येथे झालेल्या मागील बैठकीनंतर दोन्ही देशांमधील संबंध स्थिर करण्याच्या पार्श्वभूमीवर झालेल्या चर्चेच्या प्रगतीचा आढावा यावेळी दोन्ही नेत्यांनी घेतला. सीमेवरील अनेक वर्षांच्या तणावानंतर संबंध पूर्ववत करण्याचे प्रयत्न भारत आणि चीनकडून सुरू असल्याने या चर्चेला विशेष महत्त्व प्राप्त झालं होतं.

परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही देशांनी आपल्या संबंधांकडे धोरणात्मक आणि दीर्घकालीन दृष्टिकोनातून पाहावं, यावर पंतप्रधान मोदी आणि शी जिनपिंग यांनी सहमती दर्शवली. तसेच संवादाद्वारे मतभेद हाताळताना सहकार्याची क्षेत्रे विस्तारण्याच्या गरजेवरही भर देण्यात आला आहे.मतभेदांचं रूपांतर वादात होउ नये, असं परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात म्हटलं आहे. आशियातील या दोन प्रमुख शक्तींमधील संबंध, परस्पर आदर, परस्पर संवेदनशीलता आणि परस्पर हित, या तीन तत्त्वांवर आधारित असावेत, यावर पंतप्रधान मोदी यांनी भर दिला असल्याचं वृत्तात म्हटलं आहे.

भारत अन् चीनवर मोठी जबाबदारी : जिनपिंग

पंतप्रधान मोदी यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी म्हटलं की, आज जग विविध बदलांतून जात आहे, आव्हानं वाढत आहेत. अशा वेळी जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले दोन देश आणि ग्लोबल साउथचे प्रमुख सदस्य म्हणून भारत आणि चीनवर मोठी जबाबदारी आहे. आपल्या दोन्ही देशांनी मानवतेचं भविष्य आणि आपापल्या जनतेचं हित लक्षात ठेवलं पाहिजे, असं शी जिनपिंग यांनी म्हटलं आहे.आपल्याला ब्रिक्स मंचावर प्रभावीपणे एकत्रितपणे काम करणं आवश्यक आहे. आपण अशा जगाचा पुरस्कार केला पाहिजे जिथे कोणत्याही एका देशाचं वर्चस्व नसेल. सर्व राष्ट्रांना समान अधिकार असतील. तसेच व्यापार आणि आर्थिक प्रगती अशा प्रकारे झाली पाहिजे की ज्यामुळे प्रत्येक देशाला लाभ होईल. असं केल्यानेच आपण जगभरात शांतता, स्थिरता आणि प्रगती साधू शकू, असं शी जिनपिंग यांनी म्हटलं आहे.

जम्मू -काश्मीरमधील दहशतवादी कट; एनआयएची सात ठिकाणी धडक कारवाई

श्रीनगर / वृत्तसंस्था-राष्ट्रीय तपास संस्थेने एका दहशतवादी कटाच्या प्रकरणात शनिवारी सकाळी जम्मू आणि काश्मीरच्या अनेक भागांमध्ये मोठी छापेमारी केली. सुरक्षा दलांनी कुलगाम, गांदरबल आणि बांदीपोरासह खो-यातील एकूण सात ठिकाणी शोधमोहीम राबवली आहे. पाकिस्तानस्थित दहशतवादी सूत्रधार आणि स्थानिक भूमिगत कार्यकर्त्यांच्या नेटवर्कशी संबंधित प्रकरणाचा तपास करण्यासाठी ही कारवाई हाती घेण्यात आली असून, एनआयएच्या पथकांनी कुलगाममध्ये दोन, बांदीपोरामध्ये तीन आणि सोपोरमध्ये दोन ठिकाणी झाडाझडती घेतली. स्थानिक पोलीस आणि सुरक्षा दलांनी या शोधमोहिमेदरम्यान एनआयएच्या पथकांना पूर्ण सहकार्य केले असल्याची

माहिती अधिका-यांनी दिली आहे. तपास यंत्रणेला संशय आहे की, पाकिस्तानस्थित दहशतवादी सूत्रधारांच्या इशा-यावर काम करणा-या स्थानिक नेटवर्कने खो-यात घुसखोरी करणा-या दहशतवाद्यांना रसद (ल?जिस्टिक्स) आणि इतर प्रकारची मदत पुरवली होती. मूळात हे प्रकरण श्रीनगरमधील जकुरा पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आलेल्या एफआयआरशी संबंधित आहे. त्यानंतर एनआयएने हे प्रकरण जेएमयूके म्हणून पुन्हा नोंदवून आपल्या हातात घेतले. या प्रकरणात बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) कायदा, १९६७ च्या कलम २३, शस्त्र कायदा, १९५९ च्या कलम ७ आणि २५ तसेच स्फोटक पदार्थ कायदा, १९०८ च्या कलम ४ अंतर्गत कायदेशीर कारवाई केली जात आहे.

ब्रिक्स परिषदेतून भारताचा मोठा संदेश:

पहलगाम हल्ल्याचा आंतरराष्ट्रीय मंचावर निषेध, टॅरिफलाही केला विरोध

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- भारतात पार पडलेल्या १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेत सर्वसंमतीने नवी दिल्ली जाहिरनामा स्वीकारण्यात आला. यामध्ये ग्लोबल साउथमधील देशांमधील परस्पर सहकार्य अधिक दृढ करण्यावर भर देण्यात आला असून, आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये विकसनशील देशांचा आवाज वाढवण्याची ठाम मागणी करण्यात आली आहे. तसेच जागतिक पातळीवर वाढणारा एकतर्फी दबाव, बेकायदेशीर आर्थिक निर्बंधांना स्पष्ट विरोध दर्शवत ब्रिक्स देशांनी अधिक प्रातिनिधिक, लोकशाही आणि बहुध्रु वीय जागतिक रचनेचा जोरदार पुरस्कार केला आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या सनदेवर आधारित आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन करण्याचे आवाहन करतानाच आफ्रिका, आशिया आणि लॅटिन अमेरिकेतील विकसनशील देशांना जागतिक मंचांवर अधिक प्रतिनिधित्व मिळायला हवे, अशी भूमिका या परिषदेत मांडण्यात आली.

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या विस्ताराचा पुनरु च्चार-संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत व्यापक सुधारणा करण्याची गरज या जाहीरनाम्यात व्यक्त करण्यात आली. सुरक्षा परिषदेसह संयुक्त राष्ट्रांच्या सर्व स्तरांवर भारताला आणि ब्राझीलला अधिक मोठी भूमिका मिळण्यासाठी रशिया आणि चीनने दिलेल्या पाठिंब्याचे या परिषदेत स्वागत करण्यात आले. याशिवाय, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF), जागतिक बँक आणि इतर ब्रेटन वूड्स संस्थांमध्ये विकसनशील देशांना ➪(पान २ वर)

मोदी, पुतिन अन् जिनपिंग यांच्या खास फोटोची जगभरात चर्चा

हातात हात अन् चेह-यावर हास्य

नवी दिल्ली/वृत्तसंस्था-दिल्लीत १८ वी ब्रिक्स शिखर परिषद पार पडत आहे. या ब्रिक्स परिषदेसाठी अनेक देशांचे प्रमुख सहभागी झाले आहेत. यामध्ये रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन, चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग, इराणचे अध्यक्ष पेझेश्कियान यांच्यासह आदी देशांचे प्रमुख नेते या ब्रिक्स परिषदेत सहभागी झालेले आहेत. या ब्रिक्स परिषदेच्या बैठकीला आज पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते औपचारिकपणे सुरु वात झाली आहे.

या बैठकीत विविध जागतिक विषयांवर चर्चा होत आहेत. नवी दिल्लीत सुरू असलेल्या ब्रिक्स शिखर परिषदेमधील एका खास फोटोची जगभरात मोठी चर्चा सुरू झाली आहे. या फोटोत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग हे दिसत आहेत. ब्रिक्स शिखर परिषदेच्या दरम्यान झालेल्या एका चर्चेदरम्यानचा हा फोटो आहे. हा फोटो एएनआय या वृत्तसंस्थेने एक्सवर (ट्विटर) शेअर केला आहे.

ब्रिक्स शिखर परिषदेमधील पंतप्रधान नरेंद्र मोदी, व्लादिमीर पुतीन आणि शी जिनपिंग यांच्या या खास फोटोची चर्चा होत आहे. हा फोटो सोशल मीडियावर देखील मोठ्या प्रमाणात ➪(पान २ वर)

कोहली-एकनाथ शिंदेंची थेट लंडनमध्ये भेट

मुंबई /प्रतिनिधी-दिग्गज भारतीय क्रिकेटपटू विराट कोहली सध्या आपला बहुतेक वेळ लंडनमध्ये घालवतो. जेव्हा जेव्हा तो भारताला भेट देतो, तेव्हा त्याच्याबाबत अनेक चर्चा रंगतात. तो आता लवकरच भारतात परतणार असून वेस्ट इंडिजविरु द्धच्या आगामी मालिकेत भारतीय संघाकडून खेळणार आहे. दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे एका कार्यक्रमासाठी लंडनमध्ये होते, जिथे दोघांची भेट झाली. एकनाथ शिंदे यांनी कोहलीला शाल देउन सन्मानित केले आणि त्यांनी विविध विषयांवर चर्चा केली.विराटची भेट

घेतल्यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, विराट कोहली खूप साधेपणाने वागतो. कोहलीचे कौतुक करताना शिंदेंनी म्हटले, तो एक महान क्रिकेटपटू असूनही खूप साधेपणाने वागतो. त्यांनी स्पष्ट केले की ते कोहलीला यापूर्वीही भेटले आहेत, पण यावेळी थेट संवाद झाला. तसेच दोघांनी महाराष्ट्रातील विविध कल्याणकारी योजनांवर चर्चा केली. याशिवाय कोहलीला पायाभूत सुविधांबद्दलही माहिती दिल्याचे एकनाथ शिंदेंनी सांगितले.राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गुरु वारी लंडन येथे दाखल झाले. एका सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्र मंडळातर्फे त्यांना ग्लोबल प्राईड ऑफ महाराष्ट्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान शिंदे म्हणाले की, येत्या काळात लंडनमध्ये आंतरराष्ट्रीय मराठी साहित्य महोत्सव आयोजित केला पाहिजे. यापूर्वी, शिंदे यांनी भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहण्यासाठी लंडनमधील त्यांच्या निवासस्थानी भेट दिली होती.

एडीसीला लग्नही करता येत नाही

मेजर ऋषभ यांच्या खुलाशाने उडाली खळबळ

नवी दिल्ली / वृत्तसंस्था- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे माजी एडीसी मेजर ऋषभ सिंह सांब्याल यांनी वयाच्या अवघ्या ३०व्या वर्षी लष्करी सेवेतून निवृत्ती घेतल्याने मोठी चर्चा रंगली होती. राष्ट्रपतींच्या एडीसीपदावर असताना ते सोशल मीडियावरही चांगलेच चर्चेत आले होते. मात्र, अचानक घेतलेल्या निवृत्तीच्या निर्णयामागे नेमके कारण काय, याबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात होते. आता मेजर ऋषभ यांनी एका पाडकास्टमध्ये या निर्णयामागची वैयक्तिक्र कारणे सांगितली आहेत. यात विशेष म्हणजे एडीसीला लग्न करता येत नसल्याचे त्यांनी सांगितल्याने खळबळ उडाली आहे. मेजर ऋषभ सिंह सांब्याल यांनी सांगितले की, लष्करात

जाणे त्यांच्यासाठी केवळ करिअर नव्हते, तर बालपणापासून पाहिलेले एक स्वप्न होते. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी आयुष्यातील एक दशकाहून अधिक काळ घालवला. त्यामुळे लष्करी सेवा सोडण्याचा विचार त्यांनी कधीच केला नव्हता.

मात्र, एका टप्प्यावर त्यांच्यासमोर स्वत:च्या महत्त्वाकांक्षा आणि आई-वडिलांप्रती असलेल्या जबाबदा-या यापैकी एकाची निवड करण्याची वेळ आली. ऋषभ यांनी सांगितले की, या कठीण प्रसंगी त्यांनी स्वत:च्या करिअरपेक्षा आई-वडिलांसोबत राहण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या मते, आयुष्यात काही गोष्टींसाठी त्याग करावा लागतो आणि पालकांसाठी केलेला त्याग यापेक्षा मोठा असू शकत नाही. एक मुलगा म्हणून माझ्या काही जबाबदा-या आहेत आणि त्या महत्त्वाच्या आहेत. मला निर्णय घ्यायचा होता. मला काहीतरी त्याग करावा लागणार होता. मला स्वत:ची निवड करायची होती किंवा माझ्या आई-वडिलांची. मला स्वार्थी व्हायचे नव्हते. मी ते केले असते तर या विचारात मला आयुष्य घालवायचे नव्हते.

कुटुंबाशी चर्चा करून घेतला निर्णय

लष्करातून निवृत्ती घेण्याचा निर्णय अचानक किंवा घाईघाईने घेतलेला नव्हता, असंही ऋषभ ➪(पान २ वर)

भाच्यांसाठी बीएसपीचे दरवाजे बंद, भाची दीपिका आनंदवर राजकीय जबाबदारी

लखनौ/वृत्तसंस्था :चार वेळा उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री राहिलेला आणि बहुजन समाज पक्षाच्या अध्यक्ष मायावती यांनी विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. पक्षांतर्गत सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर मायावती यांनी एक मोठे विधान केले आहे. आपल्या दोन्ही भाच्यांना बहुजन समाज पक्षामध्ये संधी दिली जाणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे. त्याचबरोबर त्यांनी भाची दीपिका आनंद हिच्याबद्दल महत्त्वाचे संकेत दिले आहेत. मायावती यांनी एक्सवर एक दीर्घ पोस्ट लिहिली आहे. त्यांनी म्हटले आहे की, 'मी अविवाहित असल्यामुळे मला नाइलाजाने माझ्या सर्व सख्ख्या भावंडांपैकी एकाला आणि शेवटी सर्वात लहान भाउ आनंद कुमार यांना माझ्यासोबत ठेवण्याची गरज भासली. ते माझी काळजी घेण्यासोबतच माझ्या पूर्ण

देखरेखीखाली ब-याच काळापासून पक्षाच्या महत्त्वाच्या जबाबदा-याही सांभाळत आहेत, पण याचा फायदा आता त्यांच्या कुटुंबातील लोकांनीही घ्यावा हे पक्ष आणि आंदोलनाच्या हिताच्या दृष्टीने योग्य ठरणार नाही.' 'आज माझा हा अंतिम निर्णय आणि शपथ घेत आहे की, या➪(पान २ वर)

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांच्या समाधानाऐवजी राजकारण

राजकीय पोळी भाजू दिली जाणार नाही, मुख्यमंत्र्यांचा विरोधकांना इशारा

नागपूर/प्रतिनिधी :एमपीएससी परीक्षेतील गैरप्रकाराच्या पार्श्वभूमीवर सरकारवर विरोधकांनी सरकारला धारेवर धरले आहे. विरोधक विद्यार्थ्यांच्या मोर्चात सहभागी होत आहे. विद्यार्थ्यांना एकप्रकारे प्रोत्साहित केले जात आहे. यावरू न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी नागपुरात प्रसारमाध्यमासोबत बोलताना विरोधकांवर टीका केली.मारबत महोत्सवासाठी मुख्यमंत्री नागपुरात आले असता प्रसारमाध्यमासोबत बोलत होते. ते म्हणाले, एमपीएससी परीक्षेतील गैरप्रकाराच्या पार्श्वभूमीवर सरकारने गुरु वारी सविस्तर बैठक घेउन सर्व बाबींवर सकारात्मक चर्चा केली आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर सरकार गंभीर आहे. परीक्षेत गैरप्रकार करणा-यांना जेरबंद केले आहे. भविष्यातही अशा प्रकारांना पाठीशी घातले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. परंतु काहीजण विद्यार्थ्यांच्या प्रश्नाचे समाधान करण्याऐवजी या मुद्द्याचे राजकारण करून त्यातून आपली राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करीत आहेत.

मात्र, कोणालाही विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर राजकीय फायदा घेता येणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. राज्य सरकार पूर्ण ताकदीने विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे आहे, असेही त्यांनी सांगितले. परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी

सरकारकडून आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून, भविष्यात अधिक पारदर्शक परीक्षा पद्धती लागू केली जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

जरांगे पाटील यांना आवाहन- दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत येउन आंदोलनाचा इशारा दिला आहे. यावरू न मुख्यमंत्री म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांना मानणा-या प्रत्येकाने हिंदूंच्या सणांचा आणि गणेशोत्सवाचा आदर करावा. हिंदूंच्या सणांमध्ये किंवा गणेशोत्सवात कोणत्याही प्रकारचे विघ्न आणले जाउ नये, असे आवाहन त्यांनी मनोज जरांगे पाटील यांना केले.एमपीएससीची तयारी करणा-या पुण्यातील प्रथमेश देशमुख या तरु णाने जीवन संपवल्याने संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली. विद्यार्थ्यांच्या टोकाच्या निर्णयाने पुन्हा एकदा मोठी समस्या निर्माण झाली आहे. काकरोच जनता पार्टीचे नेते अभिजीत दीपके यांनी १० सप्टेंबरला धाराशिवमध्ये आत्महत्या करणा-या प्रथमेश देशमुख या विद्यार्थ्याच्या कुटुंबीयांची भेट घेतली होती. त्यानंतर अभिजीत दीपके यांनी या प्रश्नावर आता महाराष्ट्रात आंदोलन छेडण्याचा निर्णय जाहीर केला.एमपीएससीच्या विद्यार्थ्यांसाठी मी स्वतः महाराष्ट्रात मैदानात उतरणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. प्रथमेश समोर आर्थिक अडचणी होत्या. त्याच्यावर कर्जही होते. त्यामुळे तो खचला होता. पुण्यात राहताना तो एकवेळ जेवण करून दिवस काढत होता. त्यातच प्रथमेशची शेती वाहून गेली. दुष्काळ पडल्याने तो खचून गेला होता. त्या नैराश्यातूनच त्याने टोकाचं पाउल उचलले, असे सांगतानाच कितीही संकट आले तरी खचून जाउ नका. हार मानू नका, असे आवाहन दीपके यांनी विद्यार्थ्यांना केले होते.

तान्हा पोळ्याच्या यात्रेत थरारक घटना,

आकाश पाळण्यात महिलेचे केस अडकले

यवतमाळ /प्रतिनिधी : महागाव तालुक्यातील फुलसावंगी येथे तान्हा पोळ्यानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही पुणेश्वर मंदिराच्या पायथ्याशी एकदिवसीय भव्य यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. श्री पुणेश्वर महादेवाच्या दर्शनासाठी आणि यात्रेचा आनंद लुटण्यासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी, विशेषतः महिला व बालकांनी मोठी गर्दी केली होती. मात्र, शुक्रवारी सायंकाळी या उत्साही वातावरणावर एका अत्यंत थरारक व अंगावर काटा आणणा-या दुर्घटनेने विरजण पडले.

महिलेचे केस बेरिंगमध्ये अडकले आणि

यात्रेत फिरणा-या एका मोठ्या आकाश पाळण्यात बसलेल्या बाली मारोती टाळीकोटे (२५, रा. फुलसावंगी) या तरु ण महिलेच्या बाबतीत ही दुर्दैवी घटना घडली. पाळणा वेगाने फिरत असताना अचानक बाली टाळीकोटे यांचे लांब केस मागे असलेल्या पाळण्याच्या फिरत्या बेरिंगमध्ये अडकले. पाळण्याचा वेग जास्त असल्याने आणि बेरिंगचा आस फिरत असल्याने क्षणार्धात त्यांचे केस मोठ्या ताकदीने ओढले गेले. यात त्यांच्या डोक्यावरील केसांसह संपूर्ण चामडी निघून आल्याची अंगाचा थरकाप उडवणारी घटना घडली.

नागरिकांच्या मदतीने अनर्थ टळला- महिला वेदनेने किंचाळल्याने आणि रक्ताच्या थारोळ्यात पाहून यात्रास्थळी एकच धावपळ आणि खळबळ उडाली. सुदैवाने, यात्रेच्या सुरक्षेसाठी तेथे तैनात असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील अंभुरे आणि पोलीस जमादार सुहास कायटे यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून स्थानिक नागरिकांच्या मदतीने तत्काळ धाव घेतली. त्यांनी वेगाने फिरणारा पाळणा तातडीने थांबवला आणि अत्यंत कौशल्याने जखमी महिलेला बाहेर काढले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. पोलीस प्रशासनाने क्षणाचाही विलंब न लावता १०८ रु ग्णवाहिका➪(पान २ वर)



एडीसीला लग्नही करता येत नाही

मेजर ऋषभ यांच्या खुलाशाने उडाली खळबळ

नवी दिल्ली / वृत्तसंस्था- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे माजी एडीसी मेजर ऋषभ सिंह सांब्याल यांनी वयाच्या अवघ्या ३०व्या वर्षी लष्करी सेवेतून निवृत्ती घेतल्याने मोठी चर्चा रंगली होती. राष्ट्रपतींच्या एडीसीपदावर असताना ते सोशल मीडियावरही चांगलेच चर्चेत आले होते. मात्र, अचानक घेतलेल्या निवृत्तीच्या निर्णयामागे नेमके कारण काय, याबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात होते. आता मेजर ऋषभ यांनी एका पाडकास्टमध्ये या निर्णयामागची वैयक्तिक कारणे सांगितली आहेत. यात विशेष म्हणजे एडीसीला लग्न करता येत नसल्याचे त्यांनी सांगितल्याने खळबळ उडाली आहे. मेजर ऋषभ सिंह सांब्याल यांनी सांगितले की, लष्करात जाणे त्यांच्यासाठी केवळ करिअर नव्हते, तर बालपणापासून पाहिलेले एक स्वप्न होते. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी आयुष्यातील एक दशकाहून अधिक काळ घालवला. त्यामुळे लष्करी सेवा सोडण्याचा विचार त्यांनी कधीच केला नव्हता.मात्र, एका टप्प्यावर त्यांच्यासमोर

स्वतःच्या महत्त्वाकांक्षा आणि आई-वडिलांप्रती असलेल्या जबाबदा-या यापैकी एकाची निवड करण्याची वेळ आली. ऋषभ यांनी सांगितले की, या कठीण प्रसंगी त्यांनी स्वतःच्या करिअरपेक्षा आई-वडिलांसोबत राहण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या मते, आयुष्यात काही गोष्टींसाठी त्याग करावा लागतो आणि पालकांसाठी केलेला त्याग यापेक्षा मोठा असू शकत नाही. एक मुलगा म्हणून माझ्या काही जबाबदा-या आहेत आणि त्या महत्त्वाच्या आहेत. मला निर्णय घ्यायचा होता. मला काहीतरी त्याग करावा लागणार होता. मला स्वतःची निवड करायची होती किंवा माझ्या आई-वडिलांची. मला स्वार्थी व्हायचे नव्हते. मी ते केले असते तर या विचारात मला आयुष्य घालवायचे नव्हते.

कुटुंबाशी चर्चा करून घेतला निर्णय

लष्करातून निवृत्ती घेण्याचा निर्णय अचानक किंवा घाईघाईने घेतलेला नव्हता, असंही ऋषभ यांनी स्पष्ट केलं. कुटुंबीयांशी चर्चा केल्यानंतर आणि सर्व बाजूंचा विचार करून त्यांनी हा निर्णय घेतला. लष्करी कारकिर्दीचा शेवट अपेक्षेपेक्षा लवकर झाला असला, तरी देशसेवेत घालवलेल्या प्रत्येक क्षणाचा आपल्याला अभिमान असल्याचं त्यांनी सांगितले.

एडीसी पदावर असताना अनेक बंधने

राष्ट्रपतींचे अउऊ म्हणून काम करताना अत्यंत कठोर प्रोटोकाल आणि शिस्तीचे पालन करावे लागते. या काळात वैयक्तिक आयुष्यावरही अनेक मर्यादा येतात, असे ऋषभ यांनी सांगितले. एडीसी म्हणून काम करताना लग्नासंदर्भातही कठोर नियम असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या कार्यकाळात एडीसीला लग्न करण्याची परवानगी नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

लग्नासाठी निवृत्ती घेतली या चर्चेलाही पूर्णविराम

ऋषभ सिंह यांच्या निवृत्तीनंतर सोशल मीडियावर लग्नामुळे त्यांनी लष्कर सोडल्याच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. मात्र, त्यांनी या चर्चांना स्पष्ट शब्दांत नकार दिला. आपलं अद्याप लग्न झालेले नाही आणि सध्या लग्न करण्याचाही कोणताही विचार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे त्यांच्या निवृत्तीचा निर्णय लग्नाशी संबंधित असल्याच्या चर्चांना त्यांनी पूर्णविराम दिला.

पेपरफुटी रोखण्यासाठी राज्यात नवे सूत्र; प्रश्नपत्रिकांची निर्मिती आयत्यावेळी करणार असल्याची टास्क फोर्सच्या अध्यक्षांची माहिती

पुणे/प्रतिनिधी : प्रश्नपत्रिकाच नसल्या, तर पेपरफुटीचा धोकाही राहणार नाही. त्यामुळे आयत्या वेळी प्रश्नपत्रिका निर्माण करण्याचे सूत्र निश्चित करण्यात आल्याचे राज्यातील भरती परीक्षा सुधारणांसाठी गठीत ऊच्चस्तरीय कृती समितीच्या (टास्क फोर्स) अध्यक्ष आणि सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत सांगितले. प्रश्नपत्रिकांची निर्मिती, छापाई, वितरण आदी टप्प्यांवर गळतीचे धोके असतात. त्यामुळे ही साखळी संपुष्टात आणून कोणलाही प्रश्नापत्रिकांची माहिती होउ शकणार नाही, अशी व्यवस्था ऊभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

भरती परिक्षांबाबतच्या सूचना, तक्रारी जाणून घेण्यासाठी पुण्यात आयोजित पहिल्या विद्यार्थी संवाद-सल्लामसलत सत्रानंतर समितीच्या सदस्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्या वेळी समितीच्या अध्यक्ष व्ही. राधा यांनी भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी विद्यार्थ्यांच्या मागण्या आणि त्यासाठी करण्यात येणार असलेल्या ऊपाययोजनांची माहिती दिली. समितीचे सदस्य राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धीमत्ता विभागाचे सचिव विरेंद्र सिंह, नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, आयआयटी मुंबईचे प्रा. श्यामाप्रसाद करगट्ठे या वेळी ऊपस्थित होते. तर केंद्रीय लोकसेवा आयोगाचे (युपीएससी) माजी सदस्य निवृत्त एअर चीफ मार्शल अजित भोसले ऑनलाईन पद्धतीने सहभागी झाले होते.

व्ही. राधा म्हणाल्या, प्रश्नपत्रिकांच्या निर्मिती प्रक्रियेत गळतीचे धोके असतात. प्रश्नपत्रिका निर्मितीच्या प्रक्रियेत असणा-या प्राध्यापकांना प्रश्नांची माहिती असते. तसेच छापाई, वाहतुक आणि प्रत्यक्ष परीक्षा केंद्रांवर वितरणावेळी गळतीचा धोका असतो. त्यामुळे ही साखळीच संपुष्टात आणण्यात येईल. त्यासाठी आयत्यावेळी प्रश्नपत्रिकांची निर्मिती आणि त्यानुसार वितरण व्यवस्था ऊभारण्यासाठी पावले ऊचलण्यात येतील. या प्रक्रियेत तंत्रज्ञानाचीही मदत घेण्यात येणार आहे. प्रश्नपत्रिकांची निर्मितीच आयत्यावेळी झाली, तर गळतीचा धोकाही राहणार नाही.

पेपरफुटीसारख्या प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई गरजेची आहे. मात्र, त्याबरोबरच परीक्षा प्रक्रियेत बदल करण्याची विद्यार्थ्यांची मागणी आहे. आतापर्यंत १८ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी ई-मेलद्वारे तक्रारी सूचना कळविल्या असून, पुण्यात सुमारे ४०० विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधण्यात येत आहे.

अमेरिकेला थेट संदेश! मनमानी टॅरिफविरोधात ब्रिक्स देश एकटवले

नवी दिल्ली - राजधानी दिल्लीच्या भारत मंडपम येथे सुरू असणा-या ब्रिक्स शिखर संमेलनात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी BRICS च्या भविष्याचा एक रोडमॅप शेअर केला. ज्यात इतर देशांनी सहमती दर्शवली. ब्रिक्स देशांनी जागतिक स्तरावरील निर्णय प्रक्रियेत सर्व देशांच्या समान वचनबद्धतेवर आणि सहभागावर भर दिला.

ब्रिक्स देशांसाठी आराखडा मांडताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, ग्लोबल साउथ देशांनाही निर्णय घेण्याचा अधिकार असला पाहिजे, कारण सध्या जागतिक सत्ता एका पिरॅमिडसारखी आहे, जिथे केवळ शिखरावरील काही देश जगाबद्दल निर्णय घेत आहेत आणि बाकीचे देश त्याचे परिणाम भोगत आहेत. ब्रिक्स देशांनी युद्ध आणि संघर्षाबद्दलही चिंता व्यक्त केली. सर्व देशांना समान हक्क मिळावेत आणि तेही जागतिक निर्णय प्रक्रियेत भूमिका बजावू शकतील. यासोबतच त्यांच्या हिताचाही आदर केला पाहिजे असं ब्रिक्सने जागतिक मुद्द्यांवर दृष्टिकोन स्वीकारण्याचे आवाहन केले.

मनमानी टॅरिफवर व्यक्त केली चिंता

ब्रिक्स देशांनी अमेरिकेला थेट संदेश देत मनमानी टॅरिफबाबत चिंता व्यक्त केली. ब्रिक्स देशांनी एकतर्फी टॅरिफ आणि नान टॅरिफ समस्यांवर टीका केली. टॅरिफमुळे जागतिक व्यापार आणि पुरवठा साखळी विस्कळीत होते. त्यामुळे कोणताही देश दुस-या कोणत्याही देशावर एकतर्फी टॅरिफ लादू शकत नाही असं ब्रिक्स देशांनी म्हटलं. या देशांनी एकतर्फी आर्थिक आणि दुय्यम निर्बंधांचा निषेध केला. ते आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विरुद्ध असून विकास, अन्न सुरक्षा, आरोग्य आणि मानवाधिकारांसाठी हानिकारक असल्याचे म्हटले. घोषणापत्रात WTO च्या विवाद-निराकरण यंत्रणेची पूर्ण आणि द्विस्तरीय पुनर्स्थापना करण्याचे आवाहन करण्यात आले, ज्यामध्ये नवीन अपीलीय मंडळाच्या सदस्यांच्या नियुक्तीचा समावेश होता. ब्रिक्सने इथिओपिया आणि इराणच्या डब्ल्यूटीओमध्ये सामील होण्याच्या प्रयत्नांना पाठिंबा दिला आणि चीनचे राजनैतिक संबंध असलेल्या ५३ आफ्रिकन देशांसाठीच्या झीरो टॅरिफ सुविधेचा ऊल्लेख केला. दरम्यान, ब्रिक्स देशांच्या घोषणापत्रात टॅरिफबाबत अशावेळी ऊल्लेख केला आहे, जेव्हा अमेरिकेने चीन-भारतासह अन्य देशांवर टॅरिफ लावण्याची घोषणा केली. काही दिवसांपूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर सर्वाधिक आणि भारतावरही टॅरिफ जाहीर केले.

प्रज्वल रेवन्नाच्या मोबाईलमध्ये आढळले पॉर्न व्हिडिओ

कारागृहात मोबाईल वापरताना सापडला होता; माजी PMचा नातू रेप प्रकरणात भोगतोय जन्मठेप

बंगळूरु /वृत्तसंस्था : बंगळूरु च्या तुरुंगात असलेल्या माजी खासदार प्रज्वल रेवन्नाच्या मोबाईलमध्ये अनेक पीर्न व्हिडिओ आणि पेन ड्राइव्हमध्ये वेब सिरीज मिळाल्या आहेत. शनिवारी फोन आणि इतर ऊपकरणांच्या फीरेन्सिक तपासणीत हे ऊघड झाले.गुन्हे शाखेने ११ ऑगस्ट रोजी बंगळूरु च्या परप्पना अग्रहारा मध्यवर्ती कारागृहात छापा टाकला होता. अधिका-यांनी रेवन्नाला तुरुंगाच्या कोठडीत मोबाईल वापरताना पकडले होते. छाप्यात फोन, चार्जर, पेन ड्राइव्ह आणि नोटबुक जप्त करण्यात आली होती.प्रज्वल हा जनता दल (सेक्युलर) चे आमदार एच.डी. रेवन्ना यांचा मुलगा आणि माजी पंतप्रधान एच.डी. देवेगौडा यांचा नातू आहे. तो महिलांवरील बलात्कार प्रकरणात ऑगस्ट २०२५ पासून बंगळूरु च्या परप्पना अग्रहारा मध्यवर्ती कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे.

मोलकरणीने प्रज्वलवर अनेक वेळा बलात्काराचा आरोप केला होता-प्रज्वलच्या कौटुंबिक फार्महाउसवर काम करणा-या ४७ वर्षीय महिलेने एप्रिल २०२४ मध्ये त्याच्याविरुद्ध एफआयआर (FIR) दाखल केला होता. तिने आरोप केला होता की, २०२१ पासून त्याने तिच्यावर अनेकदा बलात्कार केला आणि ही घटना कोणाला सांगितल्यास व्हिडिओ ऊघड करण्याची धमकी दिली.

न्यायालयाने या प्रकरणातील सुनावणी १८ जुलै २०२५ रोजी पूर्ण केली. प्रज्वलवर बलात्कार, 'व्होयरिझम' (गुप्तपणे अश्लील दृश्ये पाहणे/टिपणे), गुन्हेगारी स्वरूपाची धमकी आणि अश्लील प्रतिमा ऊघड करणे यांसारख्या विविध कलमांतर्गत आरोप निश्चित करण्यात आले.१ ऑगस्ट २०२५ रोजी लोकप्रतिनिधींसाठीच्या विशेष न्यायालयाने प्रज्वलला दोषी ठरवले. दुस-या दिवशी, म्हणजेच २ ऑगस्ट रोजी, त्याला जन्मठेपेची शिक्षा आणि ११.५० लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.या रकमेपैकी ११.२५ लाख रुपये पीडितेला देण्याचे निर्देश देण्यात आले. प्रज्वलविरुद्ध बलात्काराची आणखी तीन प्रकरणे प्रलंबित आहेत; या प्रकरणांची सुनावणी अद्याप व्हायची आहे.

पान १ व १० वरून

12 राज्यांत मुसळधार पावसाचा

जिल्ह्यांत येलो अलर्ट देण्यात आला असून नंदुरबार आणि नाशिक जिल्ह्यांसाठी १३ सप्टेंबर रोजी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

दरम्यान, यंदा राज्यात पावसाचे प्रमाण असमान आहे. अनेक भागात पावसाची तूट कायम आहे. सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात काही भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाउस झाला असला तरी बहुतांश भाग कोरडे होते. पुढील दोन दिवसांत हवामान प्रणालीच्या सक्रियतेमुळे हवामान विभागाने राज्यात सर्वदूर पावसाची शक्यता वर्तवली आहे. काही भागात मुसळधार पावसाची, तर काही भागात वादळी पावसाची शक्यता आहे.

बंगालच्या ऊपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचा परिणाम राज्यातील हवामानावर होणार असून, राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. पुढील दोन दिवस राज्यातील विविध भागांत पावसाची तीव्रता कायम राहणार असून, रविवारी ऊत्तर महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.हवामान विभागाच्या अंदाजानुसार, कोकणात १२ ते १६ सप्टेंबरदरम्यान मुसळधार पाउस होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

मध्य महाराष्ट्रात १२ आणि १३ सप्टेंबर रोजी मुसळधार पाउस पडण्याचा अंदाज आहे. मराठवाड्यात १२ सप्टेंबर रोजी काही भागांत मध्यम स्वरूपाचा पाउस होण्याची शक्यता असून, विदर्भात १२ सप्टेंबर रोजी मुसळधार, तर १३ आणि १४ सप्टेंबर रोजी मध्यम पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दरम्यान, कमी दाबाच्या क्षेत्रामुळे पावसाचे पुनरागमन झाल्याने राज्यातील अनेक भागांत ढगाळ वातावरण आणि पावसाच्या सरी पाहायला मिळण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी मुसळधार पावसामुळे स्थानिक पातळीवर पाणी साचण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पहलगाम हल्ल्याचा आंतरराष्ट्रीय

मतदानाचे अधिकार आणि नेतृत्वातील सहभाग वाढवण्याची मागणी करण्यात आली.

एकतर्फी निर्बंध, टॅरिफवर नाराजी-काही देशांकडून लादल्या जाणा-या एकतर्फी आर्थिक आणि दुय्यम निर्बंधांवर जाहीरनाम्यात थेट ताशेरे ओढण्यात आले. असे निर्बंध आंतरराष्ट्रीय कायद्यांनुसार बेकायदेशीर असून त्यामुळे गरीब व विकसनशील देशांचा विकास, अन्नसुरक्षा, आरोग्य व्यवस्था आणि मानवी हक्कांवर विपरीत परिणाम होतो, असे रोखठोक मत व्यक्त करण्यात आले. तसेच एकतर्फी आयात शुल्क (टॅरिफ) आणि बिगर-जकात अडथळ्यांमुळे जागतिक व्यापार आणि पुरवठा साखळी विस्कळीत होत असल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली.

संघर्षांवर तोडगा काढण्यासाठी मुत्सद्देगिरीचा मार्ग

जागतिक स्तरावरील विविध संघर्षांवर लष्करी कारवाईऐवजी संवाद, प्रतिबंधात्मक मुत्सद्देगिरी आणि मध्यस्थीचा मार्ग अवलंबण्याची गरज ब्रिक्सने अधोरेखित केली.गाझाच्या बाबतीत तत्काळ आणि कायमस्वरूपी शस्त्रसंधी, विनाअडथळा मानवतावादी मदत आणि पॅलेस्टिनी नागरिकांचे सक्तीचे विस्थापन रोखण्याची मागणी करण्यात आली. १९६७ च्या सीमेवर आधारित, पूर्व जेरुसलेम ही राजधानी असलेल्या द्वि-राष्ट्र सिद्धांताला पाठिंबा देत पॅलेस्टाइनला संयुक्त राष्ट्रांचे पूर्ण सदस्यत्व देण्याचे समर्थन करण्यात आले.लेबनानच्या सार्वभौमत्वाचा आदर राखत संयुक्तराष्ट्रांच्या सुरक्षा परिषद ठराव १७०१ ची अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली. तसेच सुदानमधील संघर्षावर तोडगा काढण्यासाठी आफ्रिकी देशांनीच पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले.

दहशतवादाविरुद्ध झिरो टालरन्स

दहशतवादाच्या मुद्द्यावर दुटप्पीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा देत दहशतवादाविरुद्ध झिरो टालरन्स धोरण राबवण्याचे ब्रिक्स देशांनी निश्चित केले. २२ एप्रिल २०२५ रोजी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्याचा या जाहीरनाम्यात स्पष्ट शब्दांत निषेध करण्यात आला. दहशतवादाला होणारा वित्त पुरवठा, मानवी तस्करी, बेकायदेशीर शस्त्रास्त्रांची देवाणघेवाण, सायबर गुन्हेगारी आणि आर्थिक घोटाळे करणा-या आंतरराष्ट्रीय टोळ्यांचा बिमोड करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय दहशतवादविरोधी सर्वसमावेशक कराराला लवकरात लवकर मंजुरी देण्याचे आवाहन करण्यात आले.

मोदी, पुतिन अन् जिनपिंग

व्हायरल होत आहे. हा फोटो ब्रिक्स शिखर परिषदेदरम्यानचा आहे. या फोटोत पंतप्रधान मोदी हे रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या मध्ये ऊभे असल्याचं दिसत आहेत. यावेळी पंतप्रधान मोदी हे व्लादिमीर पुतिन आणि शी जिनपिंग यांच्याशी हस्तांदोलन करताना दिसत आहेत. या फोटोत तिनही नेत्यांच्या चेह-यावर स्मित हास्य दिसत आहे. मोदी, पुतिन आणि जिनपिंग यांच्या या खास फोटोमधून काही संदेश देण्याचा प्रयत्न आहे का? याची देखील चर्चा होत आहे.

मध्य पुर्वेत आणि युक्रेन युद्धांमुळे निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारत या शिखर परिषदेचं यजमानपद भूषवत आहे. असं असतानाच मोदी, पुतिन आणि जिनपिंग यांचा हा खास फोटो समोर आला आहे. यातच अमेरिका आणि पाश्चात्य मित्रराष्ट्रांबरोबरची भागीदारी कायम राखत असतानाच रशिया आणि चीनबरोबरचे संबंध अधिक दृढ करण्यासाठीही भारत प्रयत्नशील आहे.

दुसरीकडे शी जिनपिंग हे सात वर्षांत पहिल्यांदाच भारताच्या दौ-यावर आले आहेत. या शिखर परिषदेच्या निमित्ताने पंतप्रधान मोदी आणि शी जिनपिंग यांच्यात चर्चा होणार असून सीमावाद, व्यापार आणि गुंतवणूक हे विषय चर्चेच्या अजेंड्यावर असण्याची शक्यता आहे. दरम्यान, पंतप्रधान मोदी आणि इराणचे अध्यक्ष पेझेश्कियान यांचाही हस्तांदोलन करतानाच्या एका फोटोची मोठी चर्चा सुरू आहे. इराण-अमेरिका संघर्षामुळे उर्जा पुरवठा आणि सागरी व्यापार विस्कळीत झाला असताना या फोटोने लक्ष वेधून घेतलं आहे. पुतिन यांच्याबरोबरच्या चर्चेप्रमाणेच पंतप्रधान मोदींनी इराणच्या अध्यक्षांबरोबरच्या भेटीदरम्यान पश्चिम आशियातील संघर्ष सोडवण्यासाठी संवाद आणि मुत्सद्देगिरीचं आवाहन केलं आहे.

आकाश पाळण्यात महिलेचे

नागरिकांच्या मदतीने अनर्थ टळला- महिला वेदनेने किंचाळल्याने आणि रक्ताच्या थारोळ्यात पाहून यात्रास्थळी एकच धावपळ आणि खळबळ ऊडाली. सुदैवाने, यात्रेच्या सुरक्षेसाठी तेथे तैनात असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील अंभुरे आणि पोलीस जमादार सुहास कायटे यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून स्थानिक नागरिकांच्या मदतीने तत्काळ धाव घेतली. त्यांनी वेगाने फिरणारा पाळणा तातडीने थांबवला आणि अत्यंत कौशल्याने जखमी महिलेला बाहेर काढले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. पोलीस प्रशासनाने क्षणाचाही विलंब न लावता १०८ रुग्णवाहिका बोलावून जखमी महिलेवर प्राथमिक ऊपचार केले व पुढील आपत्कालीन ऊपचारासाठी त्यांना तातडीने पुसद येथील एका खासगी रुग्णालयात दाखल केले आहे. तेथे त्यांच्यावर ऊपचार सुरू आहेत. मात्र डोक्याची संपूर्ण चामडी सोलल्याने प्रकृती अजूनही गंभीर असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले.

सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर व कारवाईची मागणी- या थरारक घटनेनंतर ग्रामीण भागातील यात्रांमध्ये ऊभारल्या जाणा-या आकाश पाळण्यांच्या आणि पाळणाचालकांच्या निष्काळजीपणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. आकाश पाळण्यांचे फिरते भाग किंवा बेरिंग ऊघडे ठेवल्यामुळेच हा गंभीर अपघात घडल्याचे प्राथमिक दृष्ट्या स्पष्ट होत आहे. अशा यात्रांमध्ये पाळण्यांची नियमित तांत्रिक पाहणी केली जाते का, प्रशासनाकडून सुरक्षेचे प्रमाणपत्र घेतले जाते का, असा गंभीर प्रश्न स्थानिक नागरिकांनी ऊपस्थित केला आहे. याप्रकरणी निष्काळजी पाळणाचालकावर कठोर कारवाई करण्याची आणि भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी यात्रांमध्ये कडक सुरक्षा नियम लागू करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

भाच्यांसाठी बीएसपीचे दरवाजे

देखरेखीखाली ब-याच काळापासून पक्षाच्या महत्त्वाच्या जबाबदा-याही सांभाळत आहेत, पण याचा फायदा आता त्यांच्या कुटुंबातील लोकांनीही घ्यावा हे पक्ष आणि आंदोलनाच्या हिताच्या दृष्टीने योग्य ठरणार नाही.' 'आज माझा हा अंतिम निर्णय आणि शपथ घेत आहे की, या बदल्यात, आता त्यांच्या विशेषत? कोणत्याही मुलाला बहुजन समाज पक्षामध्ये कोणत्याही लहान-मोठ्या पदावर राहून राजकारण करण्याची संधी दिली जाणार नाही', अशी मोठी घोषणा मायावती यांनी केली आहे.

'पुढे जाउन माझ्यासोबत राहताना आनंद कुमार यांना माझ्या मदतीसाठी आणखी एखाद्या सदस्याची गरज भासली, तर सध्याच्या राजकीय परिस्थितीत ते फक्त त्यांची एकुलती एक मुलगी दीपिका आनंद, जी सध्या वकिलीचे शिक्षण घेत आहे, पुढे जाउन तिची मदत घेउ शकतात आणि नंतर तिची प्रामाणिकता, निष्ठा व कार्यक्षमता इत्यादी पाहून पक्षामध्ये तिला गरजेनुसार स्वत?ची जबाबदारीही सोपवू शकतात', असे सांगत त्यांनी दीपिका आनंद हिच्यावर जबाबदारी सोपवण्याचे संकेत दिले आहेत.

... आनंद कुमार यांनी जबाबदारी पक्षाच्या कार्यकर्त्याकडे द्यावी

'आनंद कुमार आपल्या दोन्ही मुलांना आणि पुढे जाउन त्यांच्या तरुण मुलांपैकी कोणालाही आपली ही जबाबदारी सोपवणार नाहीत. यासोबतच, हेही सांगायचे आहे की, जर त्यांची मुलगी तयार नसेल तर ते पक्षाच्या सर्वसंमतीने केवळ पक्षातील दलित वर्गातील अन्य कोणत्याही प्रामाणिक कार्यकर्त्याकडे आपली ही जबाबदारी सोपवू शकतात', असा निर्णयही मायावती यांनी जाहीर केला आहे.

'आपल्या कोणत्याही मुलाला आणि त्यांची मुले मोठी झाल्यावर त्यांनाही ही जबाबदारी सोपवणार नाहीत. सध्याच्या काळात हीच काळाची गरज आहे आणि पक्षाच्या हिताचेही आहे', असे स्पष्ट भूमिका मायावती यांनी जाहीर केली आहे.

शहरात तब्बल ५९० गणेशमूर्तींची

पोलिसांची नजर-उत्सवाच्या बंदोबस्तासाठी शहर पोलीस आयुक्तालयातील ३ पोलीस उपायुक्त, ४ सहायक पोलीस आयुक्त, ३० पोलीस निरीक्षक, ६७ सहायक पोलीस निरीक्षक/पोलीस उपनिरीक्षक आणि सुमारे १,८०० पोलीस अंमलदार तैनात राहणार आहेत. याशिवाय आरसीपी व क्यूआरटी प्लाटून, एक एसआरपीएफ कंपनी, एक प्लाटून तसेच ४०० पुरुष आणि १०० महिला होमगार्डचा बंदोबस्त राहणार आहे. शहरातील प्रमुख चौक, गर्दीची ठिकाणे, मिश्र व संवेदनशील वस्त्यांमध्ये फिक्स पॉइंट उभारण्यात येणार आहेत. सर्व्हेलन्स व्हॅनद्वारेही परिसरावर नजर ठेवली जाणार आहे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी १४ सीआर मोबाईल, महिलांच्या सुरक्षेसाठी १० दामिनी पथके तैनात करण्यात आली आहेत. वीट मार्शल आणि डायल-११२ची वाहनेही शहरात सातत्याने पेट्रोलिंग करणार आहेत.

तडीपार गुन्हेगाराकडून पिस्टल

सिटी कोतवाली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ताब्यात घेण्यात आलेल्यांमध्ये मयुर ऊर्फ माया प्रकाश चव्हाण (२०, रा. लोहार लाईन, विलासनगर, अमरावती) आणि राज गोकुल सोळंके (२२, रा. लोहार लाईन, विलासनगर, अमरावती) यांचा समावेश आहे. पोलिसांनी आरोपींकडून सुमारे २५ हजार रुपये किमतीचे मॅगझीनसह पिस्टल आणि ५०० रुपये किमतीचा लोखंडी पाते असलेला चाकू असा एकूण २५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त प्रांजली सोनावणे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, पोलीस निरीक्षक अतुल वर, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दशरथ आडे, सहायक पोलीस उपनिरीक्षक फिरोज खान यांच्यासह गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

बोडणा वळणावर अनियंत्रित स्कूल

धाव घेतली. बसची तांत्रिक स्थिती, फिटनेस प्रमाणपत्र, चालकाची कागदपत्रे आणि अपघाताच्या वेळी बसची परिस्थिती याची पोलिसांकडून पडताळणी सुरू आहे. चालकाच्या निष्काळजीपणामुळे अपघात झाला की बसमधील तांत्रिक बिघाड कारणीभूत ठरला, याचा तपासही केला जात आहे.

अवैध धंद्यांवर ग्रामीण

तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली विविध पोलीस ठाण्यांच्या ठाणेदार व त्यांच्या पथकांनी केली.

घरफोडीतील सोने वितळवून

नकार दिल्याने चोरीच्या दागिन्यांपासून सोन्याचा गोळा तयार करण्यात आला. तपासादरम्यान हा ८.९४० ग्रॅम वजनाचा सोन्याचा गोळा, अंदाजे १ लाख २८ हजार रुपये किमतीचा, तसेच गुन्ह्यात वापरलेली सुमारे ७० हजार रुपये किमतीची मोटारसायकल जप्त करण्यात आली. ही कारवाई पोलिस अधीक्षक निकेतन कदम व अपर पोलिस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पथकात पीएसआय रोहित कुदळे, एएसआय मनोज चचेरे, पोलिस अंमलदार गजेंद्र ठाकरे, सुधीर बावणे, सचिन गायधने, दिनेश कनोजिया, चेतन दुबे, विकास अंजिकर (सायबर), रितेश गोस्वामी (सायबर) आणि चालक प्रज्वल राऊत यांचा समावेश होता.

रेल्वे फाटकावर अडकली

कोणत्याही गंभीर रुग्णाला अशा परिस्थितीला सामोरे जावे लागू नये, यासाठी अंडरब्रिजचे काम प्राधान्याने पूर्ण करणे गरजेचे आहे. अंडरब्रिज ही केवळ वाहतुकीची सुविधा नाही, तर आपत्कालीन परिस्थितीत कोणाचा तरी जीव वाचवण्यासाठी ती अत्यंत महत्त्वाची आहे, असेही देशमुख यांनी म्हटले आहे.

या घटनेनंतर प्रशासनाने अंडरब्रिजच्या कामाला गती देऊन ते लवकरात लवकर पूर्ण करून वाहतुकीसाठी खुले करावे अशी मागणी केली आहे.

त्या वाघिणीचा मृत्यू हृदय आणि

लागला आणि उपचारादरम्यान सायंकाळी ७:३० वाजता तिचा मृत्यू झाला.

अफवांवर विश्वास ठेऊ नका- प्रयोगशाळेचे अंतिम आणि पूर्ण अहवाल येईपर्यंत नागरिकांनी तसेच माध्यमांनी कोणत्याही प्रकारच्या अफवांवर किंवा बिनबुडाच्या निष्कर्षांवर विश्वास ठेवू नये. वाघीण प्रकरणातील वास्तव समोर आणले जाईल, अशी माहिती उपवनसंरक्षक अर्जुना के आर यांनी दिली आहे.

चिखलदऱ्यात ५५० लाख पर्यटक

लक्ष ठेवले जात आहे. पर्यटक महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष दामिनी पथक तैनात करण्यात आले आहे. गर्दीच्या तसेच महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे आणि पीए सिस्टीम बसविण्यात आल्या असून, गर्दी आणि वाहतुकीवर लक्ष ठेवण्यासाठी ड्रोनचीही मदत घेतली जात आहे. या बंदोबस्तासाठी २५ पोलिस अधिकारी, १२५ पोलिस अंमलदार आणि १२५ होमगार्ड जवान तैनात करण्यात आले होते. वाढत्या गर्दीनुसार बंदोबस्ताचे नियोजन करण्यात येत आहे. दरम्यान, चिखलदरा पर्यटनस्थळी येणाऱ्या नागरिकांमध्ये अमरावती ग्रामीण पोलिसांकडून 'ऑपरेशन कवच'अंतर्गत अंमली पदार्थविरोधी जनजागृती करण्यात आली. यासोबतच वाहतूक नियमांचे पालन, हेल्मेटचा वापर आणि सुरक्षित वाहनचालना याबाबतही पर्यटकांना मार्गदर्शन करण्यात आले. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, यंदा मोठ्या संख्येने पर्यटक दाखल होऊनही आतापर्यंत कोणतीही मोठी वाहतूक कोंडी अथवा अनुचित घटना घडलेली नाही. पोलिस अधीक्षक निकेतन कदम आणि अपर पोलिस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आले असून,अधिकारी-अंमलदारांच्या सतर्कतेमुळे पर्यटन हंगामात वाहतूक आणि सुरक्षेची व्यवस्था सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

८ दिवसापूर्वी विवाह जुळलेल्या

घातल्याने तळेगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेने संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. अंकुश आपल्या मागे आई-वडील, विवाहित बहीण, नातेवाईक व मोठा मित्रपरिवार सोडून गेला आहे. घटनेची माहिती मिळताच तळेगाव ठाकूर परिसरात शोक व्यक्त केला जात आहे.

गणेशोत्सवापूर्वी गुन्हेगारांना

अमरावती शहर व परिसरात प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. आदेशाचे उल्लंघन करून संबंधित व्यक्ती प्रतिबंधित क्षेत्रात आढळल्यास त्यांच्याविरुद्ध कायद्यानुसार कारवाई केली जाणार आहे. गणेशोत्सव शांततेत पार पडावा आणि नागरिकांना सुरक्षित वातावरण मिळावे, यासाठी पोलिसांकडून अशा व्यक्तींवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येणार आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली असून, परिमंडळ-१ चे पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके यांनी याबाबत माहिती दिली.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
e paper www.janmadhyam.com

२० सप्टेंबरला भगवे वादळ मुंबईत धडकणार

मनोज जरांगे यांची मोठी घोषणा!

वडीगोद्री/अंतरवाली सराटी : मराठा आरक्षणाच्या हक्कासाठी अंतरवाली सराटी येथे सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या बेमुदत उपोषणाचा आज, शनिवारी (दि. १२) पंधरावा दिवस उजाडला. राज्यभरातून लाखो मराठा बांधव आणि महिला-भगिनींच्या उपस्थितीत पार पडलेल्या ऐतिहासिक व राज्यव्यापी महाबैठकीनंतर मनोज जरांगे पाटील यांनी अखेर बहुप्रतीक्षित मुंबई कूचची अधिकृत घोषणा केली. आपल्याला कोणत्याही परिस्थितीत मुंबईला जायचे आहे. १५ सप्टेंबरला मुंबईसाठी अंतरवाली येथून निघणार. रस्त्यात कोणी कितीही खुन्नस दिली तरी त्याला प्रत्युत्तर देण्यात वेळ घालवू नका; डोळ्यांसमोर समाजाची वेदना आणि मुलांचे भविष्य ठेवा. कोणत्याही मार्गाने गेलो तरी यंदा जिंकूनच यायचे आहे, असा एल्गार जरांगे पाटील यांनी जनसागराला संबोधित करताना केला.दुपारी १२ वाजता बैठक सुरू होण्यापूर्वीच अंतरवाली सराटी परिसर मराठा बांधवांच्या गर्दीने अक्षरशः फुलून गेला होता. हातात भगवे झेंडे आणि डोक्यावर भगवे रुमाल फिरवत तरुणांनी परिसर दणाणून सोडला. एक मराठा, लाख मराठा, जय जिजाउ, जय शिवराय, मुंबई मुंबई आता कुठे जायचं? मुंबईला जायचं!, लढेंगे, जितेंगे हम सब जरांगे,मनोज दादा तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं आणि आरक्षण आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं अशा गगनभेदी घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

समाजाची वेदना डोळ्यांसमोर ठेवा

उपस्थितांशी संवाद साधताना मनोज जरांगे पाटील म्हणाले, हा लढा आता अंतिम टप्प्यात आला आहे. मुंबईला जाण्याचा आपला निर्णय पक्का आहे. शांततेच्या मार्गाने, संविधानाने दिलेल्या अधिकाराचा वापर करून आपण आपली ताकद दाखवणार आहोत. रस्त्यात कोण काय बोलते याकडे लक्ष देउ नका. आपल्या लेकरांचे कल्याण करणे हेच आपले एकमेव ध्येय आहे.

लाडक्या बहिणींनो, अमृता फडणवीस-लता शिंदेंच्या घरी हळदी-कुंकवाला जा!

वडीगोद्री/अंतरवाली सराटी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मुंबईकडे कूच करण्याचा निर्णय घेतला आहे. अंतरवाली सराटी येथील आंदोलनातून चलो मुंबई ची घोषणा करताना जरांगे यांनी आंदोलनाची दिशा, मुंबईपर्यंतचा मार्ग आणि आंदोलकांनी कोणती काळजी घ्यावी, मात्र, हे आंदोलन करताना कोणताही धुडगूस घालू नये, कायदा हातात घेउ नये आणि शांततेचा मार्ग सोडू नये, असेही जरांगे यांनी स्पष्ट केले. मी राज्याला शांततेचा शब्द दिला आहे. न्यायदेवतेलाही शब्द दिला आहे. मराठ्यांची मान खाली जाउ देणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली. जरांगे यांच्या या नव्या आंदोलनाच्या घोषणेमुळे गणेशोत्सवाच्या काळात मुंबईत पुन्हा मोठ्या संख्येने मराठा आंदोलक दाखल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मनोज जरांगे यांनी आंदोलनातील महिलांच्या सहभागाबाबत वेगळी रणनीती जाहीर केली. अमृता फडणवीस आणि लता शिंदे यांना त्यांनी ताई संबोधत त्यांच्या घरी महिलांनी हळदी-कुंकवासाठी जावे, असे आवाहन केले.अमृता ताईकडे आणि लता ताईकडे तुम्ही हळदी-कुंकवाला जायचं. हळदी-कुंकू लावताना मराठा आरक्षण द्या, एवढंच सांगायचं, असा संदेश त्यांनी महिलांना दिला. महिलांनी हळदी-कुंकूच्या पारंपरिक कार्यक्रमाच्या माध्यमातून मराठा आरक्षणाचा मुद्दा मांडावा, अशी जरांगे यांची भूमिका आहे. जरांगे यांनी या दोन्ही कुटुंबांतील महिलांच्या भूमिकेवरून सरकारवरही टीका केली. त्यांच्या मते, सरकारने मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवण्यासाठी ठोस निर्णय घ्यावा आणि महिलांनी त्यांच्या कुटुंबातील पुरुष नेत्यांकडे हा मुद्दा मांडावा.

हिंदू असतील तर हळदी-कुंकवाला बाहेर येतील!-मनोज जरांगे यांनी आपल्या भाषणात हिंदू परंपरेतील हळदी-कुंकवाचा संदर्भ देत सरकारच्या भूमिकेवर सवाल उपस्थित केला. महिलांनी हळदी-कुंकूसाठी घराबाहेर येण्याचे आवाहन करताना त्यांनी म्हटले की, जर त्या हिंदू परंपरांना मानणाऱ्या असतील, तर हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमासाठी बाहेर येतील आणि महिलांची मागणी ऐकतील.

लाडक्या बहिणीचे दोन भाउ-मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा संदर्भ घेत सरकारवर जोरदार टीका केली. अमृता फडणवीस यांना लाडकी दीदी आणि लता शिंदे यांना लाडकी बहीण संबोधत त्यांनी या दोन्ही नेत्यांच्या घरासमोर महिलांनी शांततेत आपली मागणी मांडावी, असे सांगितले. तुम्हाला दोन भाउ आहेत. लाडक्या दीदीचा एक भाउ फडणवीस साहेब आणि लाडक्या बहिणीचा एक भाउ शिंदे साहेब, असा उल्लेख करत जरांगे यांनी दोन्ही नेत्यांकडे मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवण्याची मागणी केली. महिलांनी त्यांच्या दारात जाउन हळदी-कुंकू करावे आणि मराठ्यांना आरक्षण द्या एवढेच सांगावे, असा त्यांचा आग्रह आहे.

मी राज्याला शांततेचा शब्द दिलाय

मनोज जरांगे यांनी आंदोलन शांततेत करण्याची आपली भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट केली. मी या राज्याला शब्द दिलाय. शांततेत आंदोलन करणार आहे. न्यायदेवतेलाही शब्द दिलाय. माझ्या मराठ्याची मान खाली घालायची नाही, अशा शब्दांत त्यांनी आंदोलकांना आवाहन केले. मुंबईकडे जाताना आंदोलकांनी संयम बाळगावा, रस्त्यावर धुडगूस घालू नये आणि न्यायालयाच्या आदेशाचा सन्मान करावा, असे त्यांनी स्पष्ट केले

आंदोलकांना वाहने आणि शिदोरी द्या-मुंबईला प्रत्यक्ष येउ न शकणाऱ्या गावांनी आंदोलनासाठी आर्थिक आणि इतर स्वरूपाची मदत करावी, असेही जरांगे यांनी सांगितले. गावातील लोकांनी सामूहिकपणे वर्गणी जमा करावी, मुंबईकडे जाणाऱ्या आंदोलकांसाठी वाहने उपलब्ध करून द्यावीत आणि त्यांना शिदोरी द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. मनोज जरांगे यांनी मुंबईकडे जाणाऱ्या मोर्चाचा मार्गही जाहीर केला आहे. अंतरवाली सराटी येथून निघाल्यानंतर आंदोलकांचा पहिला मुक्काम पाटोदा येथे असेल. त्यानंतर दुसऱ्या दिवशी श्रीगोंदा, तिसऱ्या दिवशी पुण्यातील हडपसर आणि चौथ्या दिवशी खोपोली येथे मुक्काम करण्याचे नियोजन आहे. त्यानंतर पाचव्या दिवशी आंदोलक मुंबईतील आझाद मैदानात पोहोचतील.

मंत्रालयात 'कालायन' उपकरणे नको; प्रशासकीय मान्यता तातडीने रद्द करण्याची अंनिसची मागणी

मुंबई : मंत्रालय परिसर आणि महाराष्ट्र विधानभवन येथे कालायन उपकरणे बसविण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाला महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने

विरोध केला आहे. सांस्कृतिक कार्य विभागाने ४ सप्टेंबर २०२६ रोजी काढलेली प्रशासकीय मान्यता तातडीने रद्द करावी, अशी मागणी समितीच्या वतीने डा. हमीद दाभोलकर यांनी केली आहे. या दोन उपकरणांसाठी १० लाख ९७ हजार ४०० रुपयांचा खर्च मंजूर करण्यात आला आहे. शासन निर्णयातील माहितीनुसार हे केवळ वेळ दाखविणारे घड्याळ नसून त्यात राशी, नक्षत्रे आणि पंचांग यांचा प्रमाण वेळेशी संबंध जोडण्यात आला आहे. त्यामुळे ज्योतिष विज्ञानाधारित चौकटीत मांडले जात असल्याचा भास निर्माण होतो, असे समितीचे राहुल थोरात, प्रवीण देशमुख, नंदिनी जाधव, रामभाउ डोंगरे आणि श्रीपाल लालवाणी यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. कालायन उपकरणे बसविण्यासाठी देण्यात आलेली मान्यता रद्द करावी, सार्वजनिक निधीतून अशा उपकरणांवर खर्च करण्यापूर्वी त्यांची स्वतंत्र वैज्ञानिक आणि तज्ज्ञांकडून तपासणी करावी, अशी मागणी आहे.

जमिनीचा वादातून कुख्यात गुंडाची निर्घृण हत्या; दगड बांधून मृतदेह टाकला खाणीत

अकोला : वाशीम जिल्ह्याच्या रिसोड तालुक्यातील निजामपूर शिवारात एका सराईत गुन्हेगाराची अत्यंत अमानुष पद्धतीने हत्या करण्यात आल्याने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. जमिनीच्या वादातून कुख्यात गुंडावर सपासप वार करून हत्या केली. आरोपी तेवढ्यावरच न थांबता त्यांनी मृतदेह ओढत नेउन दगड बांधला आणि खाणीमध्ये टाकला. या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली आहे. जमिनीच्या वादाचा अशा पद्धतीने धक्कादायक शेवट झाला. रिसोड तालुक्यातील निजामपूर येथील मुंगसाजी नगर परिसरातील गायरान जमिनीच्या मालकी हक्कावरून रमेश काळे आणि आरोपींच्या कुटुंबात गत १५ वर्षांपासून वाद सुरू होता. या वादातून अनेकवेळा संघर्ष झाला. प्रकरण न्यायालयातही प्रलंबित होते. आरोपींनी रमेश काळे याला जीवे मारण्याची उघड धमकी दिली होती. त्यानंतर आरोपींनी संगनमत करून रमेशवर जीवघेणा हल्ला चढवला. लोखंडी पाईप आणि काचेच्या बाटल्यांनी त्याच्या डोक्यावर व शरीरावर गंभीर वार केले. निर्घृणपणे हत्या करण्यात आली. दरम्यान, कुटुंबीयांनी त्याचा शोध घेण्यास सुरुवात केली. शोध घेताना रक्ताचा मोठा सडा आणि मृतदेह ओढत नेल्याच्या खुणा शिवारात दिसून आल्या. आरोपींनी रक्तावर माती टाकून पुरावा लपवण्याचा प्रयत्न केला होता. या रक्ताळलेल्या खुणांचा माग काढत कुटुंबीय एका खदानीच्या विहिरीजवळ पोहोचले. विहिरीत शंका आल्याने दोरी ओढून पाहिली असता, दगडाला बांधलेला रमेश काळेचा मृतदेह बाहेर आला. मृतक रमेश किसन काळे यांच्यावर विविध पोलीस ठाण्यांमध्ये घरफोडी, दरोडा, जबरी चोरी आणि वाटमारीसारखे सुमारे २५ ते ३० अत्यंत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल होते. हत्या प्रकरणी मृतकाची पत्नी लता रमेश काळे यांच्या फिर्यादीवरून रिसोड पोलिसांनी महादु प्रल्हाद काळे, अंकुश कैलास काळे, सचिन प्रल्हाद काळे, बालाबाई प्रल्हाद काळे, चंगुलाबाई कैलास काळे (सर्व रा. निजामपूर, ता. रिसोड) आणि रवी कमल्या चव्हाण (रा. खरबी, जि. हिंगोली) या सहा आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या विविध कलमांनुसार गुन्हा नोंदवला आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेउन रिसोड पोलीस आरोपींचा शोध घेत असून तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण होते.

तुकाराम मुंढेंची मोठी कारवाई!

500 लिटर भेसळयुक्त दूध FDA कडून जप्त; डेअरींमध्ये पुरवठ्याचा डाव ऊधळला

पुणे/प्रतिनिधी :मागील अनेक दिवसांपासून राज्यात आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी भेसळ विरोधात मोठा कारवाई सुरू केली आहे. दरम्यान, आज कल्याण-डोंबिवली परिसरातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या एका मोठ्या रॅकेटवर अन्न आणि औषध प्रशासनाने कारवाई केली आहे. डोंबिवली पश्चिमेतील भोईरवाडी परिसरात टाकलेल्या छाप्यात सांगलीहून आणलेले ५०० लिटर भेसळयुक्त सुटे दूध जप्त करून जागीच नष्ट करण्यात आले. ऐन सणासुदीच्या आणि दैनंदिन वापराच्या काळात एवढ्या मोठ्या प्रमाणावर भेसळयुक्त दुधाचा साठा पकडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

एफडीएच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, भोईरवाडी भागात संशयास्पदरीत्या मोठ्या प्रमाणावर सुट्या दुधाची आवक झाल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार पथकाने छापा टाकून तपासणी केली असता, दूध विक्री करणाऱ्या संबंधित व्यक्तीकडे अन्न सुरक्षा मानकांनुसार कोणताही अधिकृत विक्री परवाना आढळून आला नाही. इतकेच नव्हे, तर हे दूध कुठून खरेदी केले याचे कोणतेही वैध बिलही संबंधितांकडे उपलब्ध नव्हते. चौकशीदरम्यान हे ५०० लिटर भेसळयुक्त दूध कल्याण आणि डोंबिवली परिसरातील अनेक स्थानिक डेअरींमध्ये विक्रीसाठी वितरित केले जाणार असल्याचे उघड झाले आहे. अन्न आणि औषध प्रशासनाच्या पथकाने घटनास्थळावरून दुधाचे अधिकृत नमुने ताब्यात घेउन ते प्रयोगशाळेत रासायनिक तपासणीसाठी पाठवले आहेत. भेसळयुक्त दुधाचा उर्वरित साठा नागरिकांपर्यंत पोहोचू नये, यासाठी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तो त्वरित नष्ट करण्यात आला. नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्या या दूध विक्रेत्याविरोधात अन्न सुरक्षा व मानके कायद्यान्वये पुढील कठोर कायदेशीर कारवाईची प्रक्रिया वेगाने सुरू करण्यात आली आहे.

महिन्याभराच्या प्रतीक्षेनंतर जिल्ह्यात पावसाचे आगमन

नांदेड /प्रतिनिधी- अल निनोच्या प्रभावामुळे यंदाच्या पावसाळ्याला सुरुवातीपासूनच विलंब झाला. पाउस लांबल्याने खरीप हंगामातील पेरण्याही उशिरा झाल्या. मात्र, ऑगस्ट महिन्यात अचानक पावसाने दडी मारल्याने

जिल्ह्यातील खरीप हंगाम पुन्हा संकटात सापडला. तब्बल महिनाभर पावसाचा खंड पडल्याने अनेक भागांत सोयाबीन, कापूस यांसह अन्य पिकांवर मोठा परिणाम झाला. दरम्यान, हवामान केंद्राने दिलेल्या येलो अलर्टनूसार गेल्या दोन दिवसांपासून नांदेड जिल्ह्यात पावसाने पुन्हा हजेरी लावण्यास सुरुवात केली असून, शनिवारी नांदेड शहरासह जिल्ह्यातील विविध भागांत पावसाच्या सरी कोसळल्या. यामुळे शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

यंदा सुरुवातीला पावसाने ओढ दिल्यामुळे खरीप हंगामातील पेरण्यांना विलंब झाला. जुलैमध्ये पावसाने जोर धरल्यानंतर शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने सोयाबीन, कापूस, तूर आणि इतर पिकांची पेरणी केली. पिकांची उगवण झाल्यानंतर सुरुवातीला समाधानकारक परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, ऑगस्ट महिन्यात पावसाने अचानक पाठ फिरवल्याने पिकांना आवश्यक असलेला ओलावा मिळेनासा झाला. अनेक भागांत जमिनीतील ओलावा कमी झाल्याने पिकांची वाढ खुंटली. विशेषतः सोयाबीन आणि कापूस पिकांना पावसाच्या दीर्घ खंडाचा फटका बसला. काही ठिकाणी पिके सुकण्याच्या अवस्थेत पोहोचल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादनावरही परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली.

वाघ हल्ल्यातील बळी शेतकऱ्याचा मृतदेह अद्याप शवागारात!

शासनाने भूमिका जाहीर करूनही आंदोलन सुरूच

वर्धा/प्रतिनिधी : सेलू तालुक्यातील रायपूर जंगली या गावात ९ सप्टेंबर रोजी भगवान चंद्रभान धुर्वे या शेतकऱ्याचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला होता. सायंकाळी ही घटना उघडकीस आली. मात्र व्याघ्र प्रकल्प परिसरात येणाऱ्या या गावास अशी आपत्ती नेहमी सोसावी लागते. बंदोबस्त होत नाही. हा मृत्यू गावात संताप निर्माण करणारा ठरत आहे, असे स्पष्ट करीत गावकऱ्यांनी आंदोलन सूरू केले. मृतकच्या कुटुंबास १ कोटी रुपये देण्याची मागणी करण्यात आली. ती मान्य झाल्याशिवाय अंत्य संस्कार करणार नाही असा निर्धार व्यक्त झाला. खासदार अमर काळे यांनी पण या आंदोलनास पाठिंबा दिला. आज गावकरी वर्ध्यात आले व परत खा. काळे यांच्या नेतृत्वात आंदोलन सूरू आहे.

एकीकडे आंदोलन सूरू असतांना दुसरीकडे शासनाने या संदर्भात होणारी कार्यवाही आज जाहीर केली आहे. त्यानुसार मृत व्यक्तीच्या वारसांना शासन नियमांनुसार नुकसानभरपाईचा मोबदला लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. सदर वाघास तातडीने पकडण्यासोबतच अशी घटना घडू नये यासाठी परिसरात ट्रॅप कॅमेरे व गस्त वाढविण्यात आली आहे. घटनेनंतर ग्रामस्थांच्या मागण्यांच्या अनुषंगाने बोर व्याघ्र प्रकल्पाच्यावतीने वाघाचा लवकरात लवकर बंदोबस्त करण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले आहे. दि.९ सप्टेंबरपासून वाघाचा मागोवा घेण्यासाठी परिसरात ट्रॅप कॅमेरे लावण्यात आले असून, वाघाला जेरबंद करण्यासाठी प्रस्ताव तयार करून मुख्य वन्यजीव रक्षक नागपूर यांची परवानगी घेण्यात येत आहे. तसेच परिसरातील वन विभागाची गस्त वाढविण्यात आली आहे.शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी मोठा रस्ता उपलब्ध करून देणे, रस्त्यालगतचा व गावालगतचा परिसर स्वच्छ करणे, तसेच वाघ जेरबंद झाल्यानंतर ग्रामस्थांना त्याबाबत माहिती देउन प्रत्यक्ष दाखविण्याचेही आश्वासन देण्यात आले आहे. संबंधित नियतक्षेत्रात हंगामी मजूर वाढविण्यात येणार असून, त्यांची दर तीन महिन्यांनी फेरबदल करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या शेतीसाठी श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेंतर्गत महाडिबीटी पोर्टलवर प्राप्त अर्जांवर कार्यवाही करून सोलर फेन्सिंगचा पुरवठा करण्याचेही आश्वासन देण्यात आले आहे. रायपूर जंगली गावाच्या पुनर्वसनासाठी ग्रामपंचायतीमार्फत सादर होणारा ठराव शासनाकडे पाठवून त्याबाबत पाठपुरावा करण्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. दि.११ व १२ सप्टेंबर रोजी उपविभागीय अधिकारी, वर्धा, उपसंचालक बोर व्याघ्र प्रकल्प, तहसीलदार सेलू, पोलिस अधिकारी तसेच वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांची व ग्रामस्थांची भेट घेउन शासन नियमांनुसार तत्काळ नुकसानभरपाई देण्याची कार्यवाही करण्यात येईल, तसेच उर्वरित मागण्या शासनाकडे पाठविण्यात येतील, असे आश्वस्त केले.

काँग्रेससोबत वाद सुरू असतानाच बड्या नेत्याची मातोश्रीवर भेट

मुंबई - राष्ट्रीय राजकारणात विरोधी पक्षांच्या क्ष्ऱ्क्ष्ऱ्ह् आघाडीतील वाद गेल्या काही काळापासून समोर आले आहेत. त्यात तामिळनाडूच्या विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेस आणि डीएमके यांच्यात मतभेद निर्माण झाले. अशातच क्ष्ऱ्ख् पक्षाच्या प्रमुख नेत्या आणि लोकसभेच्या खासदार कनिमोझी करूणानिधी यांनी अचानक मुंबई येथील मातोश्री निवासस्थानी गाठत उद्धव ठाकरे यांची भेट घेतली आहे.तामिळनाडूमध्ये मजबूत अस्तित्व असलेल्या द्रमुक पक्षाच्या एका ज्येष्ठ नेत्याची महाराष्ट्रातील एका प्रमुख प्रादेशिक नेत्यासोबत झालेली ही भेट देशाच्या राजकीय वर्तुळात एक मोठी राजकीय घडामोड मानली जात आहे. तामिळनाडूतील अलीकडील राजकीय घडामोडींमुळे द्रमुक आणि काँग्रेस यांच्यातील संबंध मोठ्या प्रमाणात बिघडले आहेत. तामिळनाडूमध्ये काँग्रेसने अभिनेता विजयच्या टीव्हीके पक्षाला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आणि ते सत्तेत सहभागी झाले. ज्यामुळे द्रमुक आणि काँग्रेस यांच्यातील २० वर्षांची युती तुटली. इतकेच नाही तर काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी प्रादेशिक पक्ष व्हीसीकेचे प्रमुख थिरु मावलवन यांना फोन करून टीव्हीकेला पाठिंबा देण्याची विनंती केली.काँग्रेसच्या या निर्णयामुळे नाराज झालेल्या डीएमके खासदार कनिमोझी यांनी लोकसभा

अध्यक्ष ओम बिरला यांना पत्र लिहून संसदेत आपल्या पक्षाच्या खासदारांसाठी स्वतंत्र आसनव्यवस्थेची विनंती केली आहे. आतापर्यंत डीएमकेचे खासदार लोकसभेत राहुल गांधी आणि काँग्रेसच्या खासदारांच्या शेजारी बसत होते. त्यात समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनीही तामिळनाडूचे नेते एम. के. स्टॅलिन आणि डीएमकेला उघडपणे पाठिंबा दिला असून त्यासाठी कनिमोझी यांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहेत.या तणावपूर्ण राजकीय वातावरणात कनिमोझी यांची मातोश्री भेट अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जाते. या बैठकीत उद्धवसेनेचे खासदार अनिल देसाई आणि आमदार मिलिंद नार्वेकर हेदेखील मातोश्री येथे उपस्थित होते. बैठकीत केंद्र सरकारकडून मांडण्यात येणाऱ्या मतदारसंघ पुनर्रचना विधयेकावर चर्चा झाली अशी माहिती देसाई यांनी दिली. या विधेयकानुसार लोकसभेच्या एकूण जागांची संख्या ५४३ वरून ८५० पर्यंत वाढवण्याचा आणि ३३ टक्के महिला आरक्षण लागू करण्याचा प्रस्ताव आहे.

सणासुदीच्या काळात ग्राहकांना मोठी संधी!

सोन्या चांदीच्या दरात अचानक मोठी घसरण

मुंबई/प्रतिनिधी : सोन्या चांदीची खरेदी करणाऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. सोन्या चांदीच्या दरात मोठी घसरण झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळं सोने चांदी खरेदी करणाऱ्यांसाठी ही मोठी संधी आहे. गेल्या काही दिवसापासून सोन्या चांदीच्या दरात सातत्याने वाढ होत होती. त्यामुळं ग्राहकांच्या खिशाला झळ लागत होती. अशातच आज सोन्या चांदीच्या दरात मोठी घसरण झाली आहे. जाणून घेउयात आजचे दर. आज, १२ सप्टेंबर २०२६ सोने आणि चांदी

खरेदी करणाऱ्यांसाठी एक महत्त्वाचा दिवस आहे. आज सराफा बाजारात सोन्याच्या दरात २७०० आणि चांदीच्या दरात १० हजार रुपयांची लक्षणीय घसरण झाली. देशभरातील विविध शहरांमध्ये सोन्या-चांदीचे नवीन दर आता जाहीर झाले आहेत. आज, २४ कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम १ लाख ५५ हजार ९०० रुपये आहे. तर २२-कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम सुमारे १.४२ लाख आहे. वेगवेगळ्या शहरांतील स्थानिक बाजारपेठेनुसार दरांमध्ये बदल होतो. सोन्यासोबतच, गेल्या काही दिवसांत चांदीच्या दरातही लक्षणीय चढ-उतार दिसून आले आहेत.

सुनील तटकरे कंपन्यांना ब्लॅकमेल करतात

शिवसेना आमदार महेंद्र थोरवेंचा खळबळजनक आरोप

मुंबई/प्रतिनिधी : गेल्या अनेक दिवसापासून रायगड जिल्ह्यात महायुतीत सगळं काही ठीक असल्याचं चित्र दिसत नाही. सातत्याने शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांमध्ये आरोप प्रत्यारोप सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे. अशातच आता शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी राष्ट्रवादीचे खासदार सुनिल तटकरे यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. सुनील तटकरे कंपन्यांना ब्लॅकमेल करत असल्याचा खळबळजनक आरोप आमदार महेंद्र थोरवे यांनी केला आहे. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारेंच्या रोजगार आंदोलनावरून महायुतीत पुन्हा जोरदार जुंपली आहे. शिंदे सेनेचे आमदार महेंद्र थोरवें यांनी सुनील तटकरे यांच्यावर आरोप करत निशाणा साधलाय. आंदोलनकर्त्यांनी स्वत?ची झोळी भरण्यसाठी केलेली स्टंटबाजी होती. हा प्रकार सगळ्यांच्या लवकरच लक्षात येईल अस

थोरवे म्हणाले. खालापूर मधील कंपन्यांना राष्ट्रवादी त्रास देण्याचे काम करत असल्याचा घणाघात देखील थोरवेंनी यावेळी केला. स्थानिकांना रोजगार देण्याचे काम कंपन्या करतात. मात्र अशा कंपन्या कोणी बंद पाडण्याचा विचार करत असेल तर त्याला जशास तसे उत्तर देउ असा इशाराही थोरवेंनी तटकरेंसह राष्ट्रवादीच्या सुधाकर घारे यांना दिला आहे दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून रायगडमध्ये पालकमंत्रीपद कोणाकडे जाणार? असा सवाल उपस्थित केला जात होता. कारण मंत्री भरत गोगावले .आणि मंत्र अदिती तटकरे यांच्यात या पदावरुन रस्सीखेच असल्याचं पाहायला मिळालं होतं. मात्र, विधानपरिषदेच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटानं अनिकेत तटकरे यांनी सहकार्य केलं. त्यांच्या विरोधात दाखल केलेला उमेदवारी अर्ज माघारी घेतला. त्यामुळं अनिकेत तटकरे यांच्या निवडणूक बिनविरोध होण्याचा मार्ग मोकळा झाला होता. यानंतर मंत्री भरत गोगावले यांच्या गळ्यात रायगडच्या पालकमंत्रीपदाची माळ पडली होती.

ऊत्तराखंडमध्ये १७० फूट लांब पूल वाहून गेला:छत्तीसगडमध्ये ३ कॉलेज विद्यार्थी नदीत बेपत्ता

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पिथौरागढमधील कुलागड ओढ्यावरील १७० फूट लांबीचा 'बेली ब्रिज' (तात्पुरता पूल) पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहून गेला. यामुळे चीन सीमेजवळील व्यास, दारमा आणि चौदांस खोऱ्यांशी असलेला संपर्क तुटला आहे. हा पूल गत २७ ऑगस्ट रोजीच उभारण्यात आला होता. त्याआधीचा पूल १८ ऑगस्ट रोजी दरड कोसळल्यामुळे कोसळला होता.छत्तीसगडच्या जांजगीर-चंपा जिल्ह्यात हसदेव नदीच्या प्रखर प्रवाहात तीन महाविद्यालयीन विद्यार्थी वाहून गेले. शुक्रवारी हे तिघे बिलासपूरच्या चौकसे कालेजमधील इतर आठ विद्यार्थ्यांसह सहलीसाठी देओरी गावात आले होते. नदीकाठी सेल्फी घेत असताना एक विद्यार्थी घसरून पडला. त्याला वाचवण्यासाठी पाण्यात उतरलेले इतर दोन विद्यार्थीही प्रवाहाबरोबर वाहून गेले. या तिघांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

बिहारमध्ये १५ जिल्ह्यांतील ४७ लाखांहून अधिक लोक पुरामुळे बाधित झाले आहेत. गंगा नदीसह अनेक नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत. उत्तर प्रदेशात २६ जिल्हे पुराचा सामना करत असून ४ लाख लोक बाधित झाले आहेत; २१ हजारांहून अधिक लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. कानपूर आणि उन्नावमध्ये गंगेची पाणी पातळी धोक्याच्या पातळीजवळ पोहोचली असून, नदीकाठच्या गावांमध्ये पुराचे पाणी १० फुटांपर्यंत वाढले आहे.मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये मान्सून पुन्हा सक्रिय झाला आहे. आज मध्य प्रदेशातील १५ जिल्ह्यांसाठी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, तर राजस्थानमधील २९ जिल्ह्यांत पावसाची शक्यता आहे. याआधी शुक्रवारी राजस्थानच्या अलवर, सवाई माधोपूर आणि दौसा जिल्ह्यांत झालेल्या मुसळधार पावसामुळे रस्त्यांवर पाणी साचले होते. मध्य प्रदेशातील भोपाळमध्ये पावसामुळे दृश्यमानता १०० मीटरपेक्षा कमी झाली होती, तर दमोहमधील सखल भागात पाणी साचले होते.

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

भेसळमुक्ततेची खात्री

खाद्यपदार्थातील भेसळ, बनावटगिरी, मुदत संपलेल्या खाद्यपदार्थांची विक्री आणि पदार्थ बनवण्याच्या जागी असलेली अस्वच्छता अशा विविध कारणांसाठी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यभर कारवाईचा कडक बडगा उगारल्याचे आपल्या सगळ्यांनाच दिसते आहे. मुंडे यांच्या या कारवाईला आम जनतेचाही मनापासून पाठिंबा आहे. पण, तरीही ही आम जनता आपल्याला रस्त्याच्या कडेला विकल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांच्या ठेल्यावर गर्दी करताना दिसतेच आहे. तिथे उभे राहून ठेल्यांवरचे कमी प्रतीचे, प्रसंगी आरोग्याला धोकादायक पदार्थ खाता खाताच लोक तुकाराम मुंढे आणि त्यांच्या कारवायांचे कौतुकही करत आहेत! ही माणस अडाणी, निरक्षर किंवा असमंजस नाहीत. तरीही आपल्या या परस्परविरोधी जगण्याचे त्यांना काही वाटत नाही. निव्वळ सवय आणि जिभेचे चोचले म्हणून लोक असे अस्वच्छ खाद्यपदार्थ तिथली सारी अनावस्था डोळ्यांआड करून खात असतील का? मुंडे यांचा धडाका सुरू होण्यापूर्वी समाजमाध्यमांवर अनेक ओंगळवाण्या चित्रफिती फिरत असत. पावाचं पीठ मळण्यासाठी घामेजल्या अस्वच्छ कामगारांनी ते पीठ पायाने तुडवणे, बेकरीचे पदार्थ तयार करताना कामगारांनी शारीरिक स्वच्छतेनंतर हात न धुताच ते वापरणे, पाणीपुरीवाल्याने गटारातले पाणी मिसळणे, रसायनाने तयार केलेले दूध चहासाठी वापरले जाणे, रासायनिक खरवस हातोहात खपणं, फळांवर चकाकी आणण्यासाठी फळ विक्रेत्याने थुकीचा वापर करणं या आणि यांसारख्या आणखीही अशाच चित्रफितींचा त्यात समावेश होता. त्यातील अनेक चित्रफिती असत्य, विशिष्ट उत्पादनांना किंवा समुदायाला बदनाम करण्यासाठी केल्या गेल्या होत्या, असा खुलासा त्याचवेळी केला गेला. या खुलाशाने त्या साऱ्या चित्रफितींचे गांभीर्य कमी झाले. लोकांनी त्याकडे शक्य तितके दुर्लक्ष केले, असे म्हणता येईल. पण, मग अन्न आणि औषध प्रशासनाने पुराव्यांसह असंख्य गैरप्रकार पकडून, त्याबाबत वैधानिक इशारे देऊनही लोक ते गांभीर्याने का घेत नाहीत? स्वतःचे आरोग्य, आरोग्याचे हक्क याविषयी आपण खरोखरीच एवढे बेफिकीर आहोत का? रस्त्याकडेला खाद्यपदार्थ विकणाऱ्या गरीब विक्रेत्यांचे सोडा. तो दोन्ही बाजूच्या गरिबांचा नाईलाज आहे, असे मानू, बहुराष्ट्र कंपन्याही आपणा भारतीयांना हातोहात फसवतात. जे सांगतात, ते पाळत नाहीत. जाहिरातींवर वारंवार खर्च केला, उत्तम वेष्टनात पदार्थ भरला, की भारतीय भुलतात असा त्यांचाही समज आहे. वरून चकचकीत, रंगीबेरंगी असले, परदेशी कंपनीचे नाव असले, की भारतीयांना तेवढे पुरते. त्यांचे अंधश्रद्धाळू मन तेवढ्याने भरून पावते. दिखाऊपणा, फसर्व दावे आणि स्वयंचलित यंत्राने पदार्थ सिद्ध केल्याचे सांगितले, की भारतीय ग्राहक समाधानी होतो. हा ग्राहक खरंच खूप भोळा, अज्ञानी आणि अंधश्रद्ध आहे, अशी बहुराष्ट्रीय कंपन्यांची खात्री झाली आहे. त्यामुळे, उत्पादनाच्या जाहिरातीत भावनिक आवाहन केले, अस्मितेला हात घातला आणि क्षणिक खोट्या सुखाचे आश्वासन दिले, की ग्राहक भुलतोच भुलतो, असा मोठमोठ्या जाहिरात कंपन्यांचा ठाम समज आहे. माध्यमांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना 'जाहिरात निर्मिती' या विषयात इथे हेच शिकवले जाते. पाकीटबंद अन्नपदार्थांच्या वेष्टनावर आतल्या पदार्थासाठी वापरलेले घटक, बाहेरून मिसळलेले घटक आणि पदार्थाचे पोषणमूल्य याची सविस्तर माहिती द्यावी, असे बंधन आहे. कायदेशीर बंधन आल्यानंतर वेष्ठनावर या सगळ्या गोष्टी आल्याही आहेत. पण, धड वाचताही येणार नाहीत, अशा आकाराच्या अक्षरांमध्ये. अशा चलाखीला परवानगी कोण आणि काय हेतूने देते? संबंधित यंत्रणांचा परवाना मिळवण्यासाठी पाठवलेला अन्नपदार्थाचा नमुना आणि त्यानंतर त्याचे होणारे उत्पादन याची तफावत कोणी का तपासत नाही? 'आमच्याकडे तेवढे मनुष्यबळ नाही आणि साधनेही नाहीत' अशी संबंधित यंत्रणांची ठरलेली तक्रार असते. भारतात 'लेबल लॉ' कोणीच गांभीर्याने घेत नाही; ती केवळ औपचारिकता आहे, असे आंतरराष्ट्रीय पातळीवर गृहीत धरले जाते. औषधनिर्मिती सारख्या संवेदनशील क्षेत्रातही जिथे हा नियम पाळला जात नाही, तिथे अन्नपदार्थांबाबतच्या बेफिकिरीचे काय? या साऱ्या गैरप्रकारांत तमाम भारतीयांची फसवणूक आणि लूट आहेच. पण, गरिबांची जास्त आहे. विषमुक्त सेंद्रिय अन्न असो, की घाण्यावरचे शुद्ध तेल; रंगात न बुडवलेल्या डाळी असोत, की मसाले मिरची पूड असो. वेगळा 'टॅग' लाऊन या सगळ्या गोष्टी बाजारात चढ्या दराने उपलब्ध आहेत. भाजीपाल्यापासून सुक्यामेव्यापर्यंत-प्रत्येक गोष्टीत शुद्धता, सकसता अकृत्रिमतेसाठी वेगळे, जास्त पैसे मोजण्याची तयारी ठेवावी लागते. तशी आर्थिक संपन्नता असेल, तरच तुम्हाला खात्रीशीर अन्नपदार्थ मिळण्याची अधिकाधिक शक्यता तयार होते. गरिबाला या सगळ्याची गरज नाही, की तो त्याचा हक्क नाही? भेसळयुक्त बनावट खाद्यान्नाने प्रकृतीचे गंभीर प्रश्न निर्माण झाले, की आरोग्य सेवेतही आपल्याकडे आर्थिक श्रेणीबद्धता आहेच! ज्याच्याकडे पैसे, त्याने ते ओतायचे; मग बरी सेवा-हा नियम तिथेही आहे. 'सारे भारतीय समान' हे शब्द शपथेपुरतेच. बाकी हक्कांमधली विषमता रोजच्या अन्नाच्या घासापासून सुरू होते. मुंढे जे करताहेत, त्याला एवढा गहन अर्थ आहे. त्यांच्या विभागात असे अधिकारी चुकून कधीतरी येतात, ते संपूर्ण व्यवस्था हलवून सोडतात. पण, ते गेले, की पुन्हा 'पहिले पाढे पंचावन्न' होतात, हे आपले दुर्दैव आहे.

तेलाचा भडका; रुपयाची कसोटी!

पश्चिम आशियातील संघर्षाची धग जागतिक तेल बाजाराला जाणवू लागली असून, कच्च्या तेलाचा दर १०० डॉलरच्या पुढे गेला आहे. या वाढत्या किमती भारतासाठी केवळ आयात खर्चाचा प्रश्न नसून, रुपयाची घसरण, महागाई आणि आर्थिक विकासावर एकाच वेळी दबाव आणणारे मोठे आव्हान ठरू शकतात.

इराणसमर्थित येमेनमधील हुथींनी सौदी अरेबियातील अनेक शहरांवर हल्ले केले. त्यानंतर अमेरिकेने इराणशी संबंधित तेलवाहू जहाजांवर कारवाई केली, तर इराणने जॉर्डनमधील अमेरिकी तळाला लक्ष्य केले. त्यामुळे तेलपुरवठ्यातील व्यत्यय दीर्घकाळ राहण्याची भीती वाढली आहे. पश्चिम आशियातील संघर्ष तीव्र होत असताना कच्च्या तेलाच्या दरांनी बुधवारी सलग चौथ्या सत्रात वाढ नोंदवली. ब्रेंट क्रूडचे वायदे १.५७ डॉलरने वाढून ९९.४९ डॉलर प्रति बॅरलवर गेले. डब्ल्यूटीआय क्रूडही १.६० डॉलरने वाढून ९४.६३ डॉलरवर पोहोचले. जूनअखेरनंतरचा हा सर्वोच्च स्तर आहे. गुरुवारी ब्रेंट क्रूड १०२ ते १०४ डॉलर प्रति बॅरल वर पोहोचल्याने जागतिक बाजारांबरोबरच भारतासाठीही आर्थिक जोखीम वाढली आहे. भारत जगातील प्रमुख कच्चे तेल आयातदार देशांपैकी एक असल्याने तेलाच्या दरातील प्रत्येक मोठी वाढ थेट आयात खर्च, रुपया आणि महागाईवर परिणाम करते. स्वाभाविकतः जागतिक तेल बाजारातील ही वाढ भारतासाठी महागाई आणि रुपयाच्या स्थिरतेसाठी कसोटीची ठरणार आहे.

जागतिक तेल बाजारात क्रूड ऑईल १०० डॉलरच्या आसपास टिकले, तर भारताचे डॉलरमधील आयात बिल वाढेल आणि चालू खात्यावरील तूट रुंदावेल. अंदाजानुसार वर्षभराच्या सरासरी कच्च्या तेलाच्या दरात १० डॉलरची वाढ झाल्यास भारताची चालू खात्याची तूट सुमारे ०.३ ते ०.४ टक्के सकल देशांतर्गत उत्पादनाने वाढू शकते. तेलाची सरासरी किंमत १००-१०५ डॉलर राहिल्यास चालू खात्याची तूट सुमारे १.९ ते २.२ टक्के जीडीपीपर्यंत जाऊ शकते. याचा दुसरा परिणाम रुपयावर होतो. महाग तेल खरेदी करण्यासाठी भारतीय आयातदारांना अधिक डॉलर लागतात. त्यामुळे डॉलरची मागणी वाढून रुपयावर दबाव येतो. मंगळवारी रुपया ३५ पैशांनी घसरून ९४.८३ प्रति डॉलरवर बंद झाला; बुधवारीही तेलाच्या दरवाढीमुळे त्याच्यावर दबाव कायम राहण्याची शक्यता आहे. रुपया कमजोर झाला, तर तेलाबरोबरच इतर आयातीही महागतात. परिणामी इंधन, वाहतूक, वीज, रसायने आणि उत्पादन खर्च वाढण्याची शक्यता असते. त्यातून महागाईचा दुसरा फेरा सुरू होऊ शकतो. तेलाच्या किमती ग्राहक महागाईवर किती परिणाम करतील, हे सरकार पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीचा किती भार ग्राहकांवर टाकते, यावरही अवलंबून राहील.

महागाई वाढल्यास घरगुती खर्चावर दबाव येतो आणि उपभोगाची मागणी कमी होऊ शकते. कंपन्यांचा वाहतूक व उत्पादन खर्च वाढल्याने नफ्यावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे तेलाची दरवाढ दीर्घकाळ टिकल्यास महागाई आणि विकास यांच्यातील समतोल साधणे रिझर्व्ह बँकेसाठी अधिक कठीण होईल. दरम्यान, आशियाई बाजार संमिश्र राहिले आहेत. जपानचा निक्केई ०.६ टक्क्यांनी, दक्षिण कोरियाचा कोस्पी १.६ टक्क्यांनी वाढला; मात्र, हाँगकाँगचा हँगसेंग ०.६ टक्क्यांनी घसरला. भारतीय शेअर बाजारावरही तेलाच्या वाढत्या दराचा परिणाम झाला असून, या आठवड्यात प्रारंभापासूनच शेअरबाजाराची घसरण सुरू आहे.

अमेरिकेच्या महागाईची आकडेवारी येणार आहे. त्यानंतर फेडरल रिझर्व्ह आणि बँक ऑफ जपानच्या व्याजदर निर्णयांकडे बाजाराचे लक्ष असेल. त्यामुळे सध्या भारतासाठी 'तेल १०० डॉलरवर किती काळ टिकेल?' हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण, अल्पकालीन धक्का भारत पचवू शकतो; मात्र दीर्घकाळ तेल महाग राहिल्यास त्याचा परिणाम रुपया, महागाई, कंपन्यांचे नफे आणि आर्थिक वाढ या सर्वांवर एकाच वेळी होऊ शकतो.

राजेंद्र जोशी

धोकादायक एआय ट्रेंड!

सध्या नेटकऱ्यांमध्ये आपले फोटो '८० च्या दशकातील' जुन्या शैलीतील रेट्रो लूकमध्ये बदलून ते सोशल मीडियावर पोस्ट करण्याची मोठी क्रेझ निर्माण झाली आहे. दिसायला हा ट्रेंड अतिशय मनोरंजक आणि निरुपद्रवी वाटत असला तरी त्यामागील छुपे सायबर धोके अत्यंत चिंताजनक आहेत. गेल्या काही दिवसातच अंदाजे ३ कोटी लोकांनी जुने कपडे आणि विशिष्ट हेअरस्टाईलमध्ये आपण कसे दिसू हे पाहण्यासाठी एकाच वेळी स्वतःचे फोटो अपलोड केले आहेत.

अशा प्रकारचे फोटो तयार करण्यासाठी वापरकर्ते थर्ड पार्टी एआय ॲप्सना आपल्या गॅलरीचे आणि कॅमेऱ्याचे संपूर्ण ॲक्सेस देतात. यामुळे आपले वैयक्तिक फोटो अनोळखी सर्व्हरवर अपलोड होतात. अनेकदा या ॲप्सचे प्रायव्हसी पॉलिसी नियम एकापेक्षा अधिक अर्थ असणारे अत्यंत संदिग्ध असे असतात.

त्यामुळे आपल्या चेहऱ्याचा डेटा गोळा करून त्याचा वापर भविष्यात 'डीपफेक' व्हिडिओ बनवण्यासाठी, सायबर गुन्ह्यांसाठी आणि डिजिटल ओळख चोरण्यासाठी केला जाण्याचा मोठा धोका असतो. स्वतःच्या सायबर गोपनीयतेचा बळी देऊन अशा प्रकारचा मिळणारा क्षणभराचा आनंद शेवटी शोकांतिकेत बदलू नये यासाठी सायबर तज्ज्ञांनीही या धोकादायक एआय ट्रेंडबाबत सतर्कतेचा इशारा दिला आहे.

अशावेळी सजग राहून अशा कोणत्याही एआय ट्रेंडला भुलून न जाता केवळ काही लाईक्स आणि कमेंट्स मिळवण्याच्या नादात आपण आपली सायबर सुरक्षा धोक्यात घालत आहोत याचे भान प्रत्येकाने ठेवणे गरजेचे आहे.

प्रदीप मोरे

संवाद

डीजे, लाऊडस्पीकर नावाखाली होणारा गोंगाट

आज धार्मिक उत्सव, मिरवणुका आणि विविध कार्यक्रमांमध्ये डीजे व लाऊडस्पीकरच्या अतिवापरामुळे निर्माण होणारा ध्वनीप्रदूषणाचा प्रश्न अत्यंत गंभीर बनत चालला आहे. धर्म हा माणसाला शांतता, संयम, प्रेम आणि मानवतेची शिकवण देतो. कोणताही धर्म गोंगाट, द्वेष किंवा दुसऱ्याला त्रास देण्याची शिकवण देत नाही. तरीही आज काही ठिकाणी धार्मिक श्रद्धेपेक्षा आवाजाची स्पर्धा अधिक दिसून येते. अतिउच्च आवाजाचा सर्वाधिक त्रास विद्यार्थी, वृद्ध, रुग्ण आणि लहान मुलांना होतो. परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होते, रुग्णांच्या विश्रांतीत अडथळा निर्माण होतो आणि वृद्ध नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. अनेकदा रात्री उशिरापर्यंत सुरू असणारा डीजे हा भक्तीपेक्षा इतरांच्या मूलभूत शांततेच्या अधिकारावर आघात ठरतो. दुर्दैवाची बाब म्हणजे धर्माच्या नावाखाली होणाऱ्या या गोंगाटाला जर एखाद्या व्यक्तीने विरोध केला तर त्या संबंधित व्यक्तीलाच धर्मविरोधी ठरवले जाते. पण इथे प्रश्न धर्माचा मुळीच नाही, तर तो सार्वजनिक शिस्त आणि सामाजिक जबाबदारीचा आहे. भारतात साजऱ्या होणाऱ्या महापुरुषाच्या जयंत्यांचे स्वरूप सुद्धा काही वेगळे नाही त्या जयंत्यांमध्ये सुद्धा डीजे आणि लाऊडस्पीकरचा अक्षरशः धुडगूस असतो.

महापुरुषाच्या जयंतीच्या दिवशी त्यांनी केलेल्या कामाची ओळख नवीन पिढीला व्हावी, महापुरुषांनी कश्याप्रकारे आपल्या सामान्य लोकांचे जीवन बदलले, कश्याप्रकारे सामान्य जनतेला न्याय मिळवून दिला, कश्याप्रकारे सामान्य माणसाला आणि या समाजाला अनिष्ट रूढी आणि परंपरेच्या जोखडातून मुक्त केले, कश्याप्रकारे माणसाला माणूस म्हणून जगायला शिकवले, स्वाभिमान जागृत करून आपल्या मातृभूमीला स्वातंत्र्य मिळवून दिले या अश्या माहितीचा प्रचार आणि प्रसार करणे आणि ह्या गोष्टीची माहिती आपल्या नवीन पिढीला सांगणे महत्वाचे आहे.

विकासराव देशमुख
वडनेर गंगाई
मो:-७५८८१५५४६४

फिरकीचा जादूगार शेन वॉर्न

शेन वॉर्न जाऊन आज साडेचार वर्ष झाली तरी या धक्क्यातून क्रिकेट रसिक अजूनही सावरू शकले नाही. वयाच्या अवघ्या ५२ व्या वर्षी या महान गोलंदाजाने जगाचा निरोप घेतला. शेन वॉर्न हा केवळ ऑस्ट्रेलियाचाच नाही तर जगातला सर्वोत्तम फिरकी गोलंदाज होता. आपल्या फिरकीच्या तालावर त्याने जगातील सर्वच दिग्गज फलंदाजांना नाचवले. जवळपास वीस वर्ष त्याने आपल्या फिरकीच्या बळावर क्रिकेट विश्वावर राज्य केले. जगातील सर्वच देशात त्याने अप्रतिम कामगिरी करीत बळी मिळवले मात्र त्याला भारतात म्हणावे तसे यश मिळाले नाही.

सचिन आणि वॉर्न यांचे क्रिकेट मैदानावरील द्वंद्व क्रिकेट रसिकांसाठी पर्वणी ठरायचे. शारजात झालेल्या मालिकेत सचिनने वॉर्नची चांगलीच पिटाई केली तेंव्हा सचिन मला स्वप्नातही दिसतो अशी कबुली त्याने दिली होती.

शेन वॉर्नच्या मृत्यू नंतर क्रिकेट विश्वाची मोठी हानी झाली. त्याच्या सारखा महान फिरकी गोलंदाज पुन्हा होणार नाही. फिरकीचा जादूगार शेन वॉर्नला जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

श्याम ठाणेदार

शेतीसाठी अनर्थकारी व्यापार शर्ती

मार्क्स म्हणतात, मागासलेल्या देशातील व्यापार शर्ती कृषी क्षेत्रासाठी खालावत जातात. कारण कुठल्याही वस्तूची किंमत तिच्या निर्मितीसाठी लागलेले साहित्य व श्रमावरून ठरविली गेली पाहिजे; परंतु शेतमालाची तशी ती ठरवली जात नाही. शेतमालाच्या किमती जाणीवपूर्वक दाबल्या जातात तर औद्योगिक वस्तूंच्या जाणीवपूर्वक अधिक ठेवल्या जातात. मार्क्स यांचे हे मत कुठल्याही फेरफाराविना भारताला तंतोतंतपणे लागू पडते असे म्हणायला जागा आहे. पर्यायी रोजगार संधीच्या अभावी कृषी क्षेत्रावर विसंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अशा स्थितीत तिची दुरवस्था टाळण्यासाठी व्यापार शर्ती कृषी क्षेत्राला पूर्णपणे अनुकूल बनविणे शक्य नसले तरी त्यातील असंतुलन किमान पातळीवर आणण्याची गरज आहे.

आपल्याकडील शेतीविषयीची चर्चा हमीभाव, कर्जमाफी, अनुदान या पलीकडे फारशी जात नाही. खरे पाहता याही पलीकडे काही बाबी आहेत की, ज्या शेती आणि शेतक?याच्या दुरवस्थेला कारणीभूत ठरताहेत, परंतु ज्या दुर्लक्षित आहेत त्यापैकी एक म्हणजे शेतमाल आणि उद्योगनिर्मित वस्तू यांच्यातील आपापसातील देवाणघेवाणीचा दर. तांत्रिक भाषेत ज्याला व्यापार शर्ती असे म्हटले जाते. शेतमाल किंमत निर्देशांक व औद्योगिक वस्तू किंमत निर्देशांक यांच्या गुणोत्तरावरून हा दर ठरतो. साध्या भाषेत सांगायचे तर शेतक-याला त्याचा शेतमाल विकल्यानंतर मिळणारी किंमत व त्याला कुटुंबाच्या तसेच शेतीच्या गरजा भागवण्यासाठी लागणा-या वस्तू व सेवांसाठी द्यावी लागणारी किंमत यांचा भागाकार म्हणजेच व्यापार शर्ती. खरे तर हा भागाकारच शेतक?याचे भवितव्य ठरवत असतो म्हणायला हरकत नाही.

स्वातंत्र्योत्तरकालीन व्यापार शर्तीचा विचार केला तर त्यात बरेच चढ-उतार पाहायला मिळतात. कधी त्या कृषी क्षेत्राला तर कधी त्या उद्योगाला अनुकूल असल्याचे लक्षात येते. त्यातही बहुतेक वेळा त्या उद्योगालाच अनुकूल असल्याचे पाहायला मिळते. स्वातंत्र्योत्तरकालीन व्यापार शर्तीचे अभ्यासकांनी काही टप्पे पाडले आहेत. नियोजनाचे पहिले दशक हा त्यातील पहिला टप्पा. टंचाईमुळे खाद्यान्नाच्या किमती या काळात वेगाने वाढत होत्या. तुलनेने औद्योगिक वस्तूंच्या किमतीच्या वाढीचा वेग कमी होता. साहजिकच व्यापार शर्ती कृषी क्षेत्राला अनुकूल होत्या असा दावा तज्ज्ञांकडून केला जातो.

हरित क्रांती ते आर्थिक सुधारणा पर्व (१९७०-१९९०) असा दोन दशकांचा दुसरा टप्पा अभ्यासक करतात. हरित क्रांतीमुळे खाद्यान्न व बहुतेक शेतमालांचे उत्पादन वाढल्याने टंचाईची जागा मुबलकतेने घेतली. त्यामुळे कृषी क्षेत्राकडे बघण्याच्या सरकारच्या दृष्टिकोनात बदल झाला. कृषी क्षेत्रातील वाढाव्याचा उपयोग उद्योग व सेवा क्षेत्राच्या विकासासाठी करण्याच्या उद्देशाने शेतमालाच्या किमती जाणीवपूर्वक कमी ठेवल्या जाऊ लागल्या किंवा निर्यात बंदी, निःशुल्क मुक्त आयात यांसारख्या साधनांचा वापर करून त्या पाडल्या जाऊ लागल्या. म्हणूनच की काय, या प्रदीर्घ काळातील व्यापार शर्ती उद्योगाला अनुपूल व कृषी क्षेत्राला प्रतिकूल होत्या. व्यापार शर्ती निर्देशांक या काळात ९०.२ (१९७४-१९७४) वरून ७२.२ (१९८५-८६) पर्यंत खाली आला. किमान हमी भावात भरघोस वाढ केलेली असताना ही स्थिती होती. १९९० नंतरचा कालखंड वैशिष्ट्यपूर्ण मानला जातो. कारण यात आर्थिक बाबतीत मूलगामी बदल करण्यात येऊन शिथिलीकरण, खासगीकरण व जागतिकीकरणाचे धोरण राबविण्यात आले. काही अपवादात्मक वर्षे वगळली तर या काळात व्यापार शर्ती कृषी क्षेत्राला अनुकूल असल्याचाच दावा तज्ज्ञांकडून केला जातो. सन २००४-०५ ते २०११-१२ यादरम्यान त्यात १७.३ टक्क्यांनी सुधारणा झाल्याचे सांगितले जाते. त्यानंतरच्या काळातही व्यापार शर्तींत सातत्याने सुधारणा होत गेल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. २०२०-२१ या वर्षी व्यापार शर्ती निर्देशांक १३०.२ पर्यंत वर गेला. पुढे त्यात घसरण होऊन २०२२-२३ साली तो १२६.६ वर आला. एकंदरीतपणे २००० सालानंतर व्यापार शर्तीत सतत सुधारणा होत गेल्याचा तज्ज्ञांचा दावा आहे. हमी भावात केलेली भरघोस वाढ व जागतिकीकरणामुळे शेतमालाच्या मागणीत झालेली वाढ या सुधारणेला कारणीभूत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

वास्तविकपणे एवढ्या प्रदीर्घ काळासाठी व्यापार शर्ती जर कृषी क्षेत्राला अनुकूल असतील तर शेतक-याचे उत्पन्न वाढून त्याच्या राहणीमानात सुधारणा होऊन कर्जबाजारीपणा कमी व्हावयास हवा होता, परंतु तसे काही घडले नाही. त्याच्या उत्पन्नाला लागलेली गळती थांबायला तयार नाही. असे असताना व्यापार शर्ती पृषी क्षेत्राला अनुकूल आहेत असे म्हणणे ही घोर फसवणूक म्हणावी लागेल. २००० सालानंतर हमी भावात केलेल्या भरघोस वाढीमुळे व्यापार शर्तीत सुधारणा होत गेल्याचा दावा तज्ज्ञांकडून केला जातो. जिला भरघोस वाढ म्हटले जाते, ती प्रत्यक्षात भरघोस कधीच नसते. ती कायमच उत्पादन खर्चापेक्षा कमी असते. शिवाय हमी भावाला केवळ सैद्धांतिक मूल्य आहे. व्यावहारिक मूल्य नसल्यात जमा. कारण बाजारभाव हमी भावाच्या खाली गेल्यानंतर सरकार बघ्याची भूमिका घेण्यापलीकडे काही करत नसल्याचे पाहायला मिळते. सरकारी खरेदीअभावी सोयाबीन, हरभरा किंवा अन्य शेतमाल हमी भावापेक्षा कमी भावात विकण्याशिवाय शेतकऱ्यांना पर्याय असत नाही. आजही आपल्याकडील शेतक-यांकडून शेतमालाची केली जाणारी विक्री आपत्तीजन्य या सदरात मिळते. त्यामुळे ती हमी भावापेक्षा कमी भावाला असणार हे उघड आहे. हमी भाव शेतक-यांना मिळतच नसेल तर त्याआधारे काढण्यात आलेल्या व्यापार शर्ती ग्राह्य मानणे इतपत योग्य आहे.

जागतिकीकरणानंतर मागणी वाढल्यामुळे भाव वाढल्याचे तज्ज्ञांकडून सांगितले जाते, परंतु या वाढलेल्या मागणी व पर्यायाने किमतीचा आपल्याकडील शेतक?याला कितपत फायदा होतो हे पाहणे तेवढेच आगत्याचे आहे. जरा कुठे ग्राहकाने गदारोळ केला की, सरकार जर निर्यात बंदी, निर्यात प्रमाण, किमान निर्यात किंमत यांसारख्या मार्गांचा अवलंब करत असेल तर वाढलेल्या आंतरराष्ट्रीय मागणीचा शेतक?याला लाभ होणार तरी कसा, असा प्रश्न पडतो.

भात, गहू, साखर, कापूस, कांदा ही त्याची अलीकडच्या काळातील उदाहरणं. तुटवडा किंवा अन्य कारणांमुळे देशांतर्गत बाजारपेठेत शेतमालाच्या किमती वाढल्या असतील तर त्याचाही लाभ शेतक?याला मिळू दिला जात नाही. भाव वाढल्याने ग्राहक गदारोळ करतात, माध्यमांकडून त्याची तीव्रता वाढवली जाते आणि दबावाला बळी पडून निःशुल्क मुक्त आयात यासारखे उपाय योजून सरकार वाढलेले दर खाली आणते.

एवढे सगळे असताना सरकार आणि तज्ज्ञांनी व्यापार शेतीला अनुकूल असल्याचा केलेला दावा फसवा वाटतो. क्रांतीनंतर निर्माण झालेल्या सोव्हिएत संघ राज्यात शेतमाल व औद्योगिक वस्तूंच्या किमतीबाबत मोठी चर्चा झाली. त्यात उद्योगाच्या उभारणीसाठी लागणारे भांडवल ते उभारण्याच्या पारंपरिक मार्गातून म्हणजे शेतमालाच्या किमती कमी ठेवून उभारण्याचे ठरले आणि त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात आली. सोव्हिएत संघराज्य सध्या अस्तित्वात नाही हे मान्य, परंतु त्यांनी अवलंबिलेल्या धोरणांची अंमलबजावणी भारताकडून केली जात असल्याचे म्हणायला जागा आहे. मार्क्स म्हणतात, मागासलेल्या देशातील व्यापार शर्ती कृषी क्षेत्रासाठी खालावत जातात. कारण कुठल्याही वस्तूची किंमत तिच्या निर्मितीसाठी लागलेले साहित्य व श्रमावरून ठरविली गेली पाहिजे परंतु शेतमालाची तशी ती ठरवली जात नाही.

शेतमालाच्या किमती जाणीवपूर्वक दाबल्या जातात, तर औद्योगिक वस्तूंच्या जाणीवपूर्वक अधिक ठेवल्या जातात. मार्क्स यांचे हे मत कुठल्याही फेरफाराविना भारताला तंतोतंतपणे लागू पडते असे म्हणायला जागा आहे.

पर्यायी रोजगार संधीच्या अभावी कृषी क्षेत्रावर विसंबून असणा?या लोकसंख्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अशा स्थितीत तिची दुरवस्था टाळण्यासाठी व्यापार शर्ती कृषी क्षेत्राला पूर्णपणे अनुकूल बनविणे शक्य नसले तरी त्यातील असंतुलन किमान पातळीवर आणण्याची गरज आहे.

प्रा. सुभाष बागल

रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

रुग्णालयाच्या दारातच खड्ड्यांचा जीवघेणा सापळा!

ज्या रस्त्यावरून ॲम्बुलन्सला सुद्धा ब्रेक लावण्याची आली वेळ, प्रशासनाला मोठ्या अपघाताची प्रतीक्षा आहे का?

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. १२ : शहरातील श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाकडे जाणारा रस्ता सध्या रुग्णांसाठीच संकटाचा मार्ग बनला आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेली भगदाडे, उखडलेले डांबर आणि पावसाचे साचलेले पाणी यामुळे या मार्गाची अक्षरशः चाळण झाली आहे.

रुग्णालयाच्या प्रवेशद्वारासमोरच मोठे भगदाड पडल्याचे चित्र समोर आले असून, रुग्णालयात जीव वाचवण्यासाठी येणाऱ्या रुग्णांना आधी खड्ड्यांच्या संकटातून जावे लागत आहे. या मार्गावर दिवसभर ॲम्बुलन्स, रुग्णवाहिका, रुग्णांचे वाहन तसेच नातेवाईकांची मोठी वर्दळ असते. गंभीर रुग्णाला घेऊन येणारी ॲम्बुलन्स या खड्ड्यांमधून जाताना वेग कमी करण्यास भाग पडते. खड्ड्यात पाणी साचल्याने त्याची खोलीही लक्षात येत नाही. दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांसाठीही हा मार्ग धोकादायक बनला आहे. एकीकडे शहरातील खड्डे बुजविण्याची मोहीम सुरू असल्याचे सांगितले जाते; मग रुग्णालयाच्या दारातील हा खड्डा प्रशासनाच्या नजरेस का पडत नाही? हा प्रश्न नागरिकांना पडला आहे. विशेष म्हणजे याच परिसरात विविध शासकीय कार्यालये, अधिकारी-कर्मचाऱ्यांची निवासस्थाने आहेत. दररोज या मार्गावरून शासकीय यंत्रणेतील अधिकारी-कर्मचारी ये-जा करतात. तरीही रस्त्याची ही अवस्था कायम राहणे म्हणजे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह आहे. एखादी ॲम्बुलन्स खड्ड्यात अडकून गंभीर रुग्णाचा वेळ वाया गेल्यानंतर प्रशासन जागे होणार का? एखादा नागरिक खड्ड्यात पडून जखमी झाल्यावरच डांबर टाकले जाणार का? रुग्णालयाकडे जाणारा रस्ता हा सामान्य रस्ता नाही; तो जीवन वाचविण्याचा मार्ग आहे. त्यामुळे केवळ थातूरमातूर डागडुजी न करता भगदाडाची कायमस्वरूपी दुरुस्ती करून हा मार्ग तातडीने सुरक्षित करावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. अपघाताची वाट पाहण्यापेक्षा प्रशासनाने वेळीच जागे व्हावे, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करीत आहेत.

मुकुटबन ग्रामीण रुग्णालयाचा विस्तार वाढविण्याची मागणी..

४०-४५ गावांचा आरोग्यसेवेचा प्रश्न ऐरणीवर, हजारो रुग्णांना ३५ किमी दूर वणीचा आधार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

झरी, दि. १२ : तालुक्यातील मुकुटबन येथील आरोग्यसेवेवर परिसरातील तब्बल ४० ते ४५ गावांचा भार असताना उपलब्ध सुविधांची मर्यादा रुग्णांसाठी मोठी अडचण ठरत आहे. दररोज सुमारे १०० ते १५० रुग्णांची ओपीडी, तर सोमवारी २०० हून अधिक रुग्ण उपचारासाठी येत असल्याने आरोग्य यंत्रणेवरील ताण स्पष्टपणे दिसून येत आहे.

मुकुटबन येथे ग्रामीण रुग्णालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम सुरू आहे. मात्र, वाढती रुग्णसंख्या लक्षात घेता ही इमारत केवळ उभी न राहता ग्रामीण रुग्णालयाच्या आवश्यक निकषांनुसार सक्षम करण्यात यावी, अशी मागणी मोहम्मद रफीक शेख बशीर कनोजे व नारायण शाहूजी गोडे यांनी पालकमंत्री संजय राठोड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. मुकुटबन पोलीस ठाण्यामुळे विविध प्रकरणांतील एमएलसी रुग्णही येथे येतात. गंभीर आजार, अपघात, प्रसूती किंवा अन्य आपत्कालीन स्थितीत मात्र रुग्णांना सुमारे ३५ किलोमीटर दूर वणी येथे हलवावे लागते. वेळेवर उपचार न मिळाल्यास रुग्णांच्या जीवितालाच धोका निर्माण होऊ शकतो. तज्ज्ञ डॉक्टर, आपत्कालीन सेवा, प्रयोगशाळा, वैद्यकीय उपकरणे, अतिरिक्त मनुष्यबळ, कर्मचारी निवास, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी व प्रतीक्षालय अशा सुविधा तातडीने उपलब्ध करण्याची मागणी करण्यात आली आहे. ४०-४५ गावांचा आरोग्याचा प्रश्न असूनही प्रशासन आणखी किती काळ प्रतीक्षा करणार, असा सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे.

थोडक्यात

मातोश्री विद्यालय; विज्ञान नाट्य स्पर्धेत तालुक्यात प्रथम

महागाव: समग्र शिक्षा अभियान व पंचायत समिती महागाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विज्ञान नाट्य स्पर्धेत मातोश्री विद्यालयाने तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला.विज्ञान जगताची जनजागृती व विज्ञान व मानव यांचे नाते अधिक मजबूत करण्यासाठी सदर स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत मातोश्री विद्यालयाने सादर केलेली नाटिका "सागरचा आक्रोश आणि नवसंजीवनी" लेखक विजय कदम, व मार्गदर्शक प्राचार्या अनुताई गावंडे यांच्या संकल्पनेतून साकार झालेली नाटिका तालुक्यात प्रथम क्रमांकात झळकली. नाट्य कलावंत व सहभागी स्पर्धक अंकिता नरवाडे, राजश्री देवरकर, कल्याणी वळसे, रिया आडे, सिद्धी अडकिने, खुशी जाधव, आराध्या सावंत, आराध्या ठाकरे या स्पर्धकांनी आपली नाट्यछटा अप्रतिम कलाकार म्हणून साकारली व तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला.
नाट्य कलाकारांचे संस्थापक दिगंबर जगताप यांनी स्वागत करून शुभेच्छा दिल्या. प्राचार्या व समस्त कर्मचारी वृंद यांनी सर्वांचे स्वागत करून सदिच्छा व्यक्त केल्या.

मुक्या जीवांच्या कष्टांना सलाम उटीत बैलजोडींचा सन्मान

महागाव : महागाव तालुक्यातील उटी येथे पोळ्यानिमित्त मुक्या प्राण्यांप्रती संवेदनशीलता जपत उत्कृष्ट बैलजोडी पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. स्व. जयवंतराव गावंडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने गेल्या १३ वर्षांपासून ही परंपरा जोपासली जात आहे. संत गजानन महाराज संस्थान येथे आयोजित कार्यक्रमात बैलजोडींसोबत त्यांच्या संगोपनासाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांचाही सन्मान करण्यात आला. उत्कृष्ट बैलजोडीचा प्रथम पुरस्कार संतोष जनार्दन जाधव, द्वितीय भीमराव किसन मोरे, तर तृतीय पुरस्कार समाधान गणेश गावंडे यांच्या बैलजोडीने पटकावला. विजेत्यांना शाल, टोपी, श्रीफळ, सन्मानपत्र, संस्थेचे टी-शर्ट, पुष्पगुच्छ व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. यावेळी विश्वकर्मा पंडित माहुलकर व मलेशियातील फार्मास्युटिकल कंपनीत पुरस्कार मिळविणारे भागवत प्रभाकर वानखेडे यांचाही सत्कार करण्यात आला. संस्थाध्यक्ष प्रशांत गावंडे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन दिगंबर वानखेडे यांनी, तर आभार प्राचार्य मारोतराव ठाकरे यांनी मानले.

सहकार क्षेत्रात 'गोदावरी अर्बन'ची दमदार वाटचाल

आधुनिक प्रशासकीय इमारतीची आमदार अर्जुन खोतकरांकडून पाहणी

यवतमाळ : बँकिंग क्षेत्रात अल्पावधीतच महाराष्ट्रासह पाच

राज्यांत विस्तार करून 'गोदावरी अर्बन'ने सहकार क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. ग्राहकांचा विश्वास कायम ठेवत बँकेने केलेली प्रगती उल्लेखनीय असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र विधिमंडळ अंदाज समितीचे प्रमुख तथा शिवसेनेचे उपनेते आमदार अर्जुन खोतकर यांनी केले.आमदार खोतकर यांनी शनिवारी (दि.१२) दत्त चौकातील 'गोदावरी अर्बन' शाखेला सदिच्छा भेट देत वीर वामनराव चौकात उभारण्यात येत असलेल्या बँकेच्या नवीन विभागीय प्रशासकीय इमारतीची पाहणी केली. बँकेची प्रगती, आधुनिक सुविधा व आगामी विस्ताराबाबत त्यांनी माहिती जाणून घेतली. यावेळी विधान परिषद सदस्य तथा बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष ना. हेमंत पाटील, भाजप जिल्हा सचिव प्रवीण कोकाटे, एजीएम रवी इंगळे, शाखा व्यवस्थापक अमित पिंपळकर आदी उपस्थित होते. जालना येथेही बँकेने शाखा सुरू करून सेवा देण्याची संधी द्यावी, अशी अपेक्षा खोतकर यांनी व्यक्त केली. यावेळी आकाश चोले, शीतल कदम, राजकुमार भीतकर तसेच फिडेस्टो प्रोजेक्ट्सचे विपुल गर्ग, चेतन राठोड, ईश्वर पवार उपस्थित होते.

रस्त्यांच्या कामाला विलंब नको,वाढीव प्रस्तावांना तातडीने मंजुरी द्या!

अमरावती प्रादेशिक विभागाची आढावा बैठक संपन्न.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

महागाव, दि. १२ : अमरावती प्रादेशिक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आढावा बैठकीत मतदारसंघातील प्रलंबित विकासकामे आणि पायाभूत सुविधांच्या प्रश्नांवर आक्रमकपणे पाठपुरावा करण्यात आला. महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत पुसद–उमरखेड–हरदडा तसेच विडूळ–देवसरी या महत्त्वपूर्ण रस्त्यांच्या कामांना गती देण्याची मागणी करण्यात आली.

HAM अंतर्गत सुरू असलेल्या या रस्त्यांच्या कामांचा ग्रामीण भागाच्या दळणवळणावर मोठा परिणाम होणार आहे. त्यामुळे प्रलंबित वाढीव प्रस्तावांना तातडीने प्रशासकीय मंजुरी देऊन कामे कोणत्याही विलंबाविना पूर्ण करावीत, अशी आग्रही मागणी बैठकीत करण्यात आली. रस्ते केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात दर्जेदार, टिकाऊ आणि सुरक्षित झाले पाहिजेत, तसेच सार्वजनिक निधीचा योग्य विनियोग व्हावा, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्याची मागणीही करण्यात आली. दरम्यान, वनविभागाच्या परवानग्यांअभावी बंदी भागातील अनेक विकासकामे रखडल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. या कामांसाठी वनमंत्र्यांच्या दालनात स्वतंत्र बैठक घेऊन आवश्यक वनपरवानग्या तातडीने मिळवून देण्याची मागणी करण्यात आली. या बैठकीस आ. प्रकाश भारसाकळे, आ. प्रविण पोटे पाटील, आ. हरिश पिंपळे, आ. उमेश यावलकर, आ. प्रताप अडसड, आ. राजेश वानखडे, आ. प्रविण तायडे, आ. संजय खोडके, आ. सुलभा खोडके तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

परंपरेला प्रोत्साहनाची जोड प्रभाग १७ मध्ये तान्हा पोळ्याचा जल्लोष

बालगोपालांच्या कलागुणांना बक्षिसांची दाद गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

राळेगाव, दि. १२ : प्रभाग क्रमांक १७ मध्ये तान्हा पोळा उत्साह, परंपरा आणि सामाजिक उपक्रमांच्या संगमातून साजरा करण्यात आला. नगरसेविका ज्योत्सना डंबारे व सामाजिक कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून आयोजित कार्यक्रमात बालगोपालांनी सजवून आणलेल्या आकर्षक बैलांच्या प्रतिकृतींनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. पावसामुळे ११ सप्टेंबरचा नियोजित कार्यक्रम १२ सप्टेंबरला घेण्यात आला.

पावसाची शक्यता असतानाही बालगोपालांचा उत्साह मात्र ओसंडून वाहत होता. रंगीबेरंगी सजावट, विविध देखावे आणि पारंपरिक वातावरणामुळे प्रभागात सणाचा उत्साह निर्माण झाला. तान्हा पोळ्याच्या माध्यमातून बालकांना आपल्या मातीतल्या संस्कृतीशी जोडण्याबरोबरच त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ देण्यात आले. सहभागी बालकांना विविध भेटवस्तू व आकर्षक बक्षिसे देऊन त्यांचा उत्साह वाढविण्यात आला. यावेळी शिक्षण, कला, क्रीडा आदी क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांचाही गौरव करण्यात आल्याने कार्यक्रमाला सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमाची जोड मिळाली. महिला, पालक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बालगोपालांचा उत्साह वाढविला. परंपरा केवळ जपायची नाही, तर नव्या पिढीपर्यंत पोहोचवायची, हा संदेश या उपक्रमातून अधोरेखित झाला. नागरिकांनी आयोजकांच्या पुढाकाराचे कौतुक केले.

यवतमाळचा राजा'च्या आगमनाची दणदणीत तयारी; १४ सप्टेंबरला भव्य शोभायात्रा, शहर भक्तिमय रंगात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. १२ : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात "यवतमाळचा राजा"च्या आगमनाची जोरदार तयारी सुरू असून यंदाची स्थापना शोभायात्रा अधिक भव्य, आकर्षक आणि देखणी ठरणार आहे. नवयुवक गणेश उत्सव मंडळ, मारवाडी चौक यवतमाळ यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली ही शोभायात्रा २०२६ मध्ये धार्मिक, सांस्कृतिक आणि पारंपरिक वैभवाचा अनोखा संगम सादर करणार आहे.

सोमवार, दि. १४ सप्टेंबर रोजी सकाळी १२ वाजता पेंटर बनकर, तलाव फेल येथून रॅलीची सुरुवात होणार असून शहरातील प्रमुख मार्गांवरून नगरभ्रमण करत मरवाडी चौक येथे समारोप होणार आहे. गणेश भक्तांसाठी ही रॅली यंदा विशेष आकर्षण ठरणार आहे. यावर्षीच्या शोभायात्रेत श्री खाटू नरेश यांचा भव्य दरबार, बाबा आरती, जोत आणि विविध धार्मिक देखावे सादर करण्यात येणार आहेत. देशाच्या विविध भागांतून आलेल्या कलाकारांच्या सहभागामुळे यात्रेला वेगळेच रंगतदार स्वरूप लाभणार आहे. संतोष बेंड पथक (यवतमाळ), दिलेर खालसा ग्रुप (अमृतसर), कटक (ओडिशा) येथील कलाकार, दिल्ली कॅर्निवल टीम, तसेच १० फूट उंच कॅरेक्टर फिगर्स, नंदी-भूत पिशाच्च देखावे, उडते हनुमान, शिव-पार्वती दर्शन, भव्य रथ आणि पारंपरिक ध्वज हे प्रमुख आकर्षण ठरणार आहेत. याशिवाय इंदूर व अमरावती येथील भजन मंडळे, तसेच सेठ सेवादेवी ट्रस्ट (इंदूर) यांचे विशेष सादरीकरण यात्रेला अधिक आध्यात्मिक उंची देणार आहे. संपूर्ण शहर "गणपती बाप्पा मोरया, मंगलमुर्ती मोरया"च्या जयघोषाने दुमदुमून जाणार असून भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळणार आहे.

नगरभ्रमणाचा मार्ग पुढीलप्रमाणे राहणार आहे

पेंटर बनकर, तलाव फेल, गणेश चौक, गांधी चौक, संतोषी माता चौक, सरदार वल्लभभाई पटेल चौक , टांगा चौक, तहसील चौक, बस स्टँड चौक, दत्ता चौक, जाजू चौक, सब्जी मंडी, शनि मंदिर चौक, सरदार चौक, मरवाडी चौक. आणि राहणार असल्याची माहिती यवतमाळ का राजा नवयुवक गणेश मंडळाचे अध्यक्ष अध्यक्ष मनोज पसारी यांनी ही माहिती दिली. विशेष म्हणजे मंडळाच्या वतीने कुठल्याही गुलालची उधळपट्टी न करता तसेच डीजे मुक्त ही विशाल शोभायात्रा राहणार आहे रॅलीदरम्यान नागरिकांनी शिस्त, स्वच्छता व वाहतूक नियमांचे पालन करावे, तसेच भक्तिभावाने सहभाग नोंदवावा, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.अशी माहिती यवतमाळ का राजा मंडळाचे प्रसिद्धी प्रमुख विजयकुमार बुंदेला यांनी दिली आहे.

अमोलकचंदच्या नूतनीकृत रसायनशास्त्र प्रयोगशाळेचे उत्साहात उद्घाटन..

पेटंट मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. १२ : अमोलकचंद महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाच्या नूतनीकृत अत्याधुनिक प्रयोगशाळेचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात झाले. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकातील ज्ञान न देता प्रत्यक्ष प्रयोगातून वैज्ञानिक दृष्टिकोन, कौशल्य आणि संशोधनवृत्ती विकसित करण्याच्या उद्देशाने प्रयोगशाळेचे नूतनीकरण करण्यात आले आहे.

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, माजी राज्यसभा सदस्य तथा लोकमत मीडिया समूहाचे अध्यक्ष डॉ. विजय दर्डा यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकारला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे सचिव सी. ए. श्री. प्रकाशजी चोपडा होते. यावेळी सेवानिवृत्त प्रा. ए. एस. अट्रावलकर, प्रा. सी. बी. देशपांडे, प्रा. एस. एस. काबरा, डॉ. जी. बी. पाचाडे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, प्राचार्य प्रा. डॉ. ए. बी. लाड व विभागप्रमुख प्रा. डॉ. टी. पी. चव्हाण उपस्थित होते. प्रा. डॉ. चव्हाण यांनी प्रयोगशाळेचे शैक्षणिक महत्त्व स्पष्ट केले. आधुनिक सुविधांचा विद्यार्थ्यांनी अधिकाधिक उपयोग करून प्रयोगशीलता व संशोधनाची आवड जोपासावी, असे आवाहन सी. ए. प्रकाशजी चोपडा यांनी केले. यावेळी 'कॅबिनेट ऑफ इलेक्ट्रोड फॉर इलेक्ट्रोकेमिकल ॲनालिसिस' या विषयावरील पेटंट मिळविणाऱ्या आचल पवार, वैभवी गोंडे व तेजस बेले यांचा गौरव करण्यात आला. प्रयोगशाळेच्या नूतनीकरणासाठी पुढाकार घेतल्याबद्दल प्रा. डॉ. प्रशांत मुस्कावार यांचाही सत्कार झाला. संचालन प्रा. वाय. व्ही. खंदारे यांनी केले.

विश्वबंधुत्व हाच मानवतेकडे जाणारा खरा धर्म

धर्माच्या भिंती नव्हे, मानवतेचा सेतू उभारण्याची गरज : प्रा. डॉ. अंजली लांडगे

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. १२ : धर्माच्या नावावर वाढत चाललेली संकुचितता, सामाजिक कलह आणि परस्परांतील दुरावा ही मानवते समोरील गंभीर आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत 'विश्वबंधुत्व हाच मानवते कडे जाणारा खरा धर्म' असून स्वामी विवेकानंदांचा सर्वधर्म समन्वयाचा विचार आचरणात आणणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्रा.डॉ.अंजली लांडगे यांनी केले. श्रीरामकृष्ण विवेकानंद सेवा संस्था, पुसद यांच्या वतीने विश्वबंधुत्व दिनानिमित्त आयोजित सार्वजनिक व्याख्यानात त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सौ. अर्चना हरीमकर होत्या. शिकागो सर्वधर्मपरिषदेत स्वामी विवेकानंदांनी 'माझ्या अमेरिकेतील भगिनींनो आणि बंधूंनो' या संबोधनातून जगाला बंधुभावाचा संदेश दिला. विविध नद्या अखेरीस समुद्राला मिळतात, त्याप्रमाणे सर्व धर्मांचे अंतिम ध्येय एकच आहे. त्यामुळे आपल्या धर्माचा अभिमान बाळगताना इतर धर्मांचाही आदर करावा, त्यातील चांगले विचार आत्मसात करावेत, असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात अर्चना हरीमकर यांनी मोबाईलच्या आहारी गेलेली युवा पिढी आणि ढासळणारे सामाजिक भान यावर चिंता व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदित्य सोनी यांनी केले. सूत्रसंचालन मुकुंद रायपूरकर, तर आभार संजय कोटूरवार यांनी मानले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

आदीवासी पँथर संघटनेच्या तक्रारीची अखेर दखल..!

चौकशी अहवालात दोषी कर्मचाऱ्यांचे वेतन वाढ रोखली.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. १२ : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पुसद अंतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रमशाळा वडगाव शिंदे आणि बोरीवन येथील विद्यार्थ्यांच्या आरोग्य, पिण्याचे पाणी, परिसर स्वच्छता आणि इतर गैरसोयींबाबत भारतीय आदिवासी पँथर संघटनेने केलेल्या तक्रारीची प्रकल्प अधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेतली आहे.

चौकशी अंती दोषी आढळल्यामुळे मुख्याध्यापक आर एम घड्याळे अधीक्षक जाधव जुलै २०२६ ची एक वेतन वाढ रोखण्यात आली आहे भारतीय आदिवासी पँथर संघटना महाराष्ट्र राज्य शाखा यवतमाळ जिल्हाध्यक्ष मा. देविदास च. डाखोरे आणि जिल्हा उपाध्यक्ष अशीष वाघमारे यांनी दि. २०/०७/२०२६ रोजी प्रकल्प कार्यालयाकडे लेखी तक्रार दिली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने प्रकल्प अधिकारी, पुसद यांनी दोन्ही आश्रमशाळांना भेट देऊन संबंधित सर्व कर्मचाऱ्यांचा आढावा घेतला. तक्रारीत नमूद बाबींची तात्काळ दखल घेण्यात आली असून भविष्यात विद्यार्थ्यांच्या आरोग्य, स्वच्छ पिण्याचे पाणी आणि इतर आवश्यक बाबींमध्ये अशा प्रकारच्या समस्या उद्भवणार नाहीत याबाबत सर्व कार्यरत कर्मचाऱ्यांना दक्ष राहण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच चौकशी अहवालानुसार शासकीय आश्रमशाळा वडगाव (शिंदे) येथील मुख्याध्यापक आर. एम. घडयाळे आणि पुरुष अधीक्षक जाधव यांची माहे जुलै २०२६ ची एक वेतनवाढ रोखण्यात आली असल्याचे पत्र जा.क्र. वैशा-२०२६/प्र.क्र/का-१/३४४६/ दिनांक ०८/०९/२०२६ अन्वये कळविण्यात आले आहे. या कारवाईमुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये समाधान व्यक्त केले जात असून, भारतीय आदिवासी पँथर संघटनेच्या या पाठपुराव्याला यश आल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

नांदगाव तालुका दुष्काळाच्या उंबरठ्यावर

शासनाने तालुका कोरडा दुष्काळग्रस्त घोषित करावा;नागरिकांची मागणी

नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर

यावर्षीच्या अनियमित पावसामुळे तालुक्यात सरासरी एक महिन्यापासून पावसाने ब्रेक दिला असून दडी मारली त्यामुळे तापमानात वाढ होऊन जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी झाला तेव्हा शेतातील पिके माना टाकून सुकायला लागली असल्याने नांदगाव तालुक्यात दुष्काळ सदृश्य स्थिती निर्माण झाली आहे.तालुका कोरड्या दुष्काळाच्या उंबरठ्यावर उभा आहे.

येत्या तीन-चार दिवसात समाधानकारक पाऊस आला नाही तर दुष्काळाची भयावह स्थिती तालुक्यात निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.तालुक्यात कोरडवाहू शेतीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्याने येथील शेती नैसर्गिक पावसावर अवलंबून आहे. ३० जुलै रोजी तालुक्यात ढगफुटी

सदृश्य अतिवृष्टी झाली होती. तेव्हापासून पावसाने ब्रेक दिला असून समाधानकारक तालुक्यात पाऊस झाला नाही. अपवाद वगळता काही भागात हलका पाऊस पडला ऑगस्टमध्येच पावसाने काढता पाय घेतला आणि सप्टेंबर मध्ये तापमानात अचानक वाढ झाली. त्यामुळे जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी झाला आणि कपाशी तूर सोयाबीन या प्रमुख पिकाला पावसाअभावी फटका बसला सोयाबीनच्या शेंगा भरण्याचे अवस्थेत पीक असताना पावसाने दगा दिला असून हलक्या प्रतीच्या जमिनीतील पिकावर अधिक प्रमाणात विपरीत परिणाम झाला व पिके करपले. सोयाबीनच्या झाडाला शेंगा धरल्या परंतु शेंगातील दाणे परिपकवच होण्याची शक्यता पावसा अभावी मावळत आहे तूर सोयाबीन कापूस या पिकाची वाढ खुंटली असून सोयाबीन चे पीक सुकण्याच्या मार्गावर लागले. आर्थिक भुर्दंड सहन करीत उमीदीने बळीराजने तयार केलेल्या हिरव्या स्वप्नाचा संसार उध्वस्त होण्याचे मार्गावर आहे. सोयाबीन हंगामातील कमी दिवसात येणारे पीक असून पावसाअभावी शेतकऱ्यांचे हातातून निघून जाण्याची भीती निर्माण झाली आहे. पीक वाढीच्या व सोयाबीनच्या शेंगा भरण्याचे अवस्थेत पावसाचा खंड पडल्याने शेतकऱ्यांची काळजी वाढली येत्या तीन-चार दिवसात समाधानकारक पाऊस झाला नाही तर तालुक्यात कोरड्या दुष्काळाचे सावट अधिक गळद होऊन त्याचा सर्वात मोठा फटका शेतकऱ्याला बसण्याची शक्यता आहे. तालुक्यात एक महिन्यापासून पाऊस नसल्याने शेतकऱ्यांचे हातून पिके आजच निघून गेल्याचे विदारक चित्र आहे पावसाअभावी शेती पिकाचे झालेले नुकसान पाऊस झाला तरी भरून निघणे अशक्य आहे तेव्हा शासनाने तालुका कोरडा दुष्काळग्रस्त घोषित करून हेक्टरी आर्थिक मदत द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे.

विदर्भ कुंभार समाज सुधार समितीतर्फे सत्कार

अमरावती-विदर्भ कुंभार समाज सुधार समिती, अमरावती यांच्या वतीने पदवी, पदविका, पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थी/विद्यार्थिनींचा सत्कार, तसेच कला, क्रीडा, सामाजिक व राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजबांधवांचा सत्कार सोहळा रविवार,२७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०:०० पासून आयोजित करण्यात आला आहे.कार्यक्रमात देविदासजी सोनाजी काळकर यांना 'जीवन गौरव पुरस्कार (२०२६)' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.अध्यक्षस्थान विदर्भ कुंभार समाज सुधार समिती, अमरावतीचे अध्यक्ष सुधाकर शेंडोकार राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे, आ. रविभाऊ राणा, माजी खासदार नवनीत राणा उपस्थीत राहणार आहे.

आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत विविध योजनांचे त्रयस्थ संस्थेमार्फत मूल्यमापन

७ दिवसांत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

अमरावती/क्रा.प्र.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचे त्रयस्थ संस्थेमार्फत मूल्यमापन व फलनिष्पत्ती करून घेण्यासाठी आवश्यक अनुभव असलेल्या शासकीय, निमशासकीय, मान्यताप्राप्त तसेच पात्र संस्थांकडून रीतसर प्रस्ताव मागविण्यात येत असल्याची माहिती सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी दिली आहे.

मूल्यमापन करण्यात येणाऱ्या प्रमुख योजनानांमध्ये जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणारी कामे व योजना,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीअंतर्गतच्या योजना,महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना, जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना,पेसा योजना,भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना,वन विभागाच्या संबंधित तीन महत्त्वाच्या योजना,स्वर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजना,जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या इतर संबंधित आवश्यक योजनांचा समावेश आहे.

योजनांचे मूल्यमापन करण्यासाठी तांत्रिक क्षमता आणि आवश्यक पात्रता असणाऱ्या इच्छुक संस्थांनी आपले सविस्तर प्रस्ताव सात दिवसांच्या आत सादर करणे बंधनकारक आहे. इच्छुक संस्थांनी आपले प्रस्ताव प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी, जि. अमरावती यांच्या कार्यालयात जमा करावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.सादर करावयाच्या प्रस्तावामध्ये संस्थेचा पूर्वअनुभव, यापूर्वी केलेल्या मूल्यमापन कामांचा सविस्तर तपशील, संस्थेकडील उपलब्ध मनुष्यबळ, तांत्रिक क्षमता, संबंधित कायदेशीर कागदपत्रे आणि आर्थिक प्रस्ताव आदी माहिती सादर करणे आवश्यक राहील, असे आवाहन सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पतर्फे करण्यात आले आहे.

अचलपूर तालुक्यात १७६ सार्वजनिक गणेश मंडळाची होणार स्थापना

अचलपूर/वार्ताहर

तालुक्यात एकूण १७६ सार्वजनिक गणेश उत्सवाची स्थापना केली जाणार आहे . अचलपूर-परतवाडा जुळ्या शहरासह ग्रामीण भागात तिन्ही पोलीस स्टेशनच्या हद्दीत दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा गणेश उत्सव मोठ्या आनंदात साजरा केला जाणार आहे.

यात अचलपूर पोलीस स्टेशन अंतर्गत ४६ सार्वजनिक गणेशोत्सवाची स्थापना, परतवाडा पोलीस स्टेशनह द्दीत ७७ सार्वजनिक गणेश मंडळ यामध्ये शहरात ६१ तर ग्रामीण भागात १६ गावात सार्वजनिक गणेश मंडळ आणि सरमसपुरा पोलीस स्टेशन अंतर्गत एकूण ५३ सार्वजनिक गणेश मंडळाची स्थापना केली जाणार असून १० गावामध्ये एक गाव एक गणपती हा उपक्रम राबविला जाणार आहे.उत्सवामध्ये अचलपूर-परतवाडा जुळ्या शहरात विविध

सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहे.तिन्ही पोलीस स्टेशन हद्दीतील गणेश उत्सव दहा दिवस शांततेत पार पडावा यासाठी अमरावती जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या नेतृत्वाखाली अचलपूर पोलिस उपविभागीय अधिकारी ईशानी आनंद,परतवाडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजय आखरे,अचलपूर पोलीस स्टेशनचे प्रभारी ठाणेदार कैलास भगत,सरमसपुरा पोलिस स्टेशन चे ठाणेदार इंगळे यांच्या सह चौख बंदोबस्त लावण्यात आला आहे. तसेच ज्या ज्या ठिकाणी सार्वजनिक गणेश उत्सवाची स्थापना केली जाणार त्या ठिकाणच्या मंडळाच्या अध्यक्ष व सदस्यांना सूचना देऊन शांतता,कायदा,सुव्यवस्था अबाधित राहील या दृष्टीने सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करून हा उत्सव साजरे करावे असे आव्हान सुद्धा पोलीस स्टेशनकडून देण्यात आले आहे.

'उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६' जाहीर

अमरावती/का.प्र.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने राज्य महोत्सवांतर्गत 'उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत जिल्ह्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सहभागी व्हावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

या स्पर्धेची व्याप्ती तालुका, जिल्हा, राज्य यासोबतच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत वाढविण्यात आली आहे. स्पर्धेसाठी इच्छुक व पात्र मंडळांनी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या ganeshotsav.pldmka.co.in या संकेतस्थळावर अर्ज सादर करावा. ही स्पर्धा विनामूल्य असून, केवळ संबंधित यंत्रणेकडे नोंदणीकृत संस्था अथवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येणार आहे. स्पर्धेचे समन्वयक म्हणून पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी कार्यरत राहणार आहे.

स्पर्धेत तालुकास्तरावर प्रथम क्रमांकासाठी २५ हजार रुपये, जिल्हास्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे ५० हजार, ४० हजार आणि ३० हजार रुपये, तर राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे ७ लाख ५० हजार, ५ लाख आणि २ लाख ५० हजार रुपये रोख पारितोषिक व सन्मानपत्र देण्यात येणार आहे.

जिल्हास्तरावरून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या अन्य मंडळांनाही शासन निर्णयानुसार प्रोत्साहनपर पारितोषिक देण्यात येणार आहे. ही निवड संबंधित स्तरावर गठित करण्यात आलेल्या निवड समितीमार्फत करण्यात येईल. जिल्ह्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी स्पर्धेच्या सविस्तर अटी,निकष,आवश्यक कागदपत्रे आणि अर्जाची प्रक्रिया जाणून घेण्यासाठी पोर्टलला भेट देऊन विहित मुदतीत अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

खडकपुरा पोळा उत्सव समितीतर्फे पोळा महोत्सव उत्साहात

पारंपरिक पोळ्याला आधुनिकतेची जोड;बालगोपालांचा उत्स्फूर्त सहभाग

चांदूर रेल्वे/वार्ताहर

आजच्या आधुनिक यांत्रिकीकरणाच्या युगात शेतीमध्ये बैलजोड्यांचा वापर दिवसेंदिवस कमी होत असला, तरी आपल्या पारंपरिक संस्कृतीचे जतन आणि पुढील पिढीपर्यंत ही परंपरा पोहोचविण्याच्या उद्देशाने पोळा उत्सव समिती, खडकपुरा, चांदूर रेल्वे यांच्या वतीने पारंपरिक जागेवर भव्य पोळा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. दोन दिवस चाललेल्या या महोत्सवाला शहरवासीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी बैलजोड्यांसाठी विविध आकर्षक बक्षिसांची स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये प्रथम क्रमांकाचे बक्षीस रोशन लांजेवार

यांच्या बैलजोडीने, तर द्वितीय क्रमांकाचे बक्षीस शुभम लाकडे यांच्या बैलजोडीने पटकावले. याशिवाय सहभागी बैलजोडीधारकांचा उत्साह वाढविण्यासाठी विविध बक्षिसांचे वितरण करण्यात आले. पोळ्यात सहभागी झालेल्या प्रत्येक बैलजोडीधारकास टोपी व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.

११ सप्टेंबर २०२६ रोजी तान्हा पोळ्याचे आयोजन करण्यात आले. यामध्ये बालगोपालांसह त्यांच्या पालकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. विविध आकर्षक वेशभूषा, सामाजिक संदेश देणारे फलक आणि पारंपरिक रूपांमुळे तान्हा पोळ्याला विशेष रंगत आली.काही बालकांनी आजच्या शेतीवर भाष्य करणारे संदेशफलक हातात घेतले होते, तर काहींनी शेतकऱ्याची वेशभूषा केली होती. तुकाराम मुंढे, कांतारा, महादेव-पार्वती, श्री गणेश आदी विविध व्यक्तिरेखा व धार्मिक-सांस्कृतिक विषयांवर आधारित वेशभूषांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

यामध्ये शंकर-पार्वती व गणपतीची वेशभूषा साकारणाऱ्या अनय पुडके यांना प्रथम क्रमांकाचे बक्षीस, तर तुकाराम मुंढे यांची भूमिका साकारणाऱ्या रुद्र भेंडे यांना द्वितीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले. तसेच कांताराची भूमिका साकारणाऱ्या श्रीशा वाघ यांना विशेष बक्षीस व शिल्ड देऊन गौरविण्यात आले.जवळपास ३० बालकांना विविध बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

या उपक्रमामुळे चांदूर रेल्वे शहरात आपल्या समृद्ध परंपरेचा सुंदर नमुना पाहायला मिळाला. महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी पोळा उत्सव समिती तसेच शहरातील नागरिकांनी विशेष परिश्रम घेतले. या आयोजनामुळे शेतकऱ्यांचे मनोबल वाढविण्यासोबतच बालगोपालांचा आनंद द्विगुणित झाला असून, परंपरा आणि संस्कृती जपण्याचा हा उपक्रम शहरवासीयांसाठी कौतुकाचा विषय ठरला आहे.

संक्षिप्त

पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी मनपाचे आवाहन

अमरावती-पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने अमरावती महानगरपालिकेने यंदा मातीच्या (शाडू) गणेशमूर्तींच्या विक्रीला प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याअनुषंगाने शहरातील नेहरू मैदान येथे मातीच्या गणेशमूर्तींच्या विक्रीसाठी स्वतंत्र दुकाने राखीव ठेवण्यात आली आहेत. नेहरू मैदान परिसरातील शाळेच्या बाजूला मातीच्या गणेशमूर्तींच्या विक्रीसाठी दुकाने उपलब्ध करून देण्यात आली असून, महानगरपालिकेकडे नोंदणीकृत मातीच्या गणेशमूर्ती तयार करणाऱ्या मूर्तिकारांकडूनच येथे मूर्ती विक्री करण्यात येणार आहे. यासाठी मूर्तिकार संघटनेकडून हमीप्राप्त दुकाने निश्चित करण्यात आली आहेत. या विक्रीला प्रोत्साहन मिळावे यासाठी महानगरपालिकेकडून आवश्यक सहकार्य करण्यात येत असून, नागरिकांच्या माहितीसाठी परिसरात मनपातर्फे फलकही लावण्यात आला आहे. गणेशोत्सवात पर्यावरणाचे संरक्षण व्हावे, तसेच प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींमुळे होणारे जलप्रदूषण टाळता यावे, यासाठी नागरिकांनी मातीपासून तयार केलेल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचीच खरेदी करावी, असे आवाहन महानगरपालिकेने केले आहे. 'गणेशभक्तांनी गणेशमूर्ती खरेदी करताना मातीपासून तयार केलेल्या पर्यावरणपूरक मूर्तींना प्राधान्य द्यावे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी नागरिकांनी मातीच्या गणेशमूर्तींची मागणी करावी,' असे आवाहन मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी केले आहे.

आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवाच्या अर्जासाठी २२ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

अमरावती-संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे आयोजित शैक्षणिक सत्र २०२६-२०२७ मधील आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवात (सांस्कृतिक स्पर्धा) सहभागी होण्यासाठी प्रवेश अर्ज व शुल्क भरण्यास २२ सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. महाविद्यालयांच्या तांत्रिक अडचणींमुळे ही मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी परिपत्रकाद्वारे दिली आहे.महोत्सवात १ जुलै २०२६ रोजी २५ वर्षांपेक्षा कमी वय असलेले विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. सहभागासाठी ऑनलाईन अर्ज विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in efkeâbkee http://sd.sgbau.ac.in या संकेतस्थळावर भरून त्याची प्रत व आवश्यक शुल्कासह विद्यापीठात सादर करणे आवश्यक आहे. महाविद्यालयांनी वेळेत ऑनलाईन अर्ज सादर करून आपला प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

तान्हा पोळा उत्सव

अचलपूर-स्वामी विवेकानंद विचार मंच बहुउद्देशीय संस्था,

अचलपूर व भागवताचार्य पंडीत नंदकीशोर शर्मा सार्वजनिक ग्रंथालय यांच्या वतीने श्री लक्ष्मी नारायण मंदिर संस्थान, टक्कर चौक तसेच प्रकाश जडीये यांच्या घरी गुप्ता नगर, कांडली येथे तान्हा पोळा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.या प्रसंगी उपस्थित बालगोपालांचे व त्यांनी आणलेल्या बैलांचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर बालगोपालांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. वाटप करण्यात आलेले शालेय साहित्याचा समावेश आहे.यावेळी उपस्थित मान्यवर म्हणून पंडित गजानन शर्मा,प्रा. सुनील ठाकरे,शुभम डवले, मनोहर भाऊ डवले, क्रिष्णा जडीये,पवन जडीये उपस्थित होते.या उपक्रमात स्वामी झाडे, कुणाल पुजारी,शिव बहोरीया,कोशल वाले, कार्तिक बुंदेले, शिवराज आवनकर, मल्हार खुजे, स्यांमान चौधरी,तेजस डवले,स्वरा सुने, हृदय रुमावत,शुभ्रा डवले, सार्थक सुने, शिवांश चौधरी, अंशुमन जडिये,स्वराज जडिये,हिंदवी जडिये, प्रियंशी मोभैये,प्रथमेश मोभैये,आदित्य बडोदे,रुषिकेश बडोदे,कुशल ठाकूर,वीर चौहान,चैतन्य तेजस,राघव जडीये यांचा समावेश होता.

आज क्रांतिज्योती सावित्रीआई फुले पतसंस्थेची आमसभा

अमरावती - येथील क्रांतिज्योती आई फुले नागरी सहकारी पतसंस्थेची द्वितीय वार्षिक आमसभा आज रविवार १३ सप्टेंबर रोजी दुपारी १ वा मोर्शी रोडवरील श्री गुरुदेव प्रार्थना मंदिर सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.सदर आमसभेपूर्वी पत संस्थेच्या आजीवन सभासदां करिता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन १२ वा करण्यात आले आहे. आम सभेचे इतिवृत वाचून कायम करणे,संस्थेच्या सन २५-२६ च्या आर्थिक पत्रकास मंजुरी देणे, तसेच २६-२७ च्या अंदाज पत्रकास मंजुरी प्रदान करणे,लेखापरीक्षकाची नेमणूक करणे,संचालक व नातेवाईक यांना कर्ज योजनेची माहिती देणे,लेखी स्वरूपात आलेले प्रश्न व करणे इतर आदी विषयावर चर्चा होणार आहे. करिता सदर आमसभे करिता नियोजित वेळी सर्व सभासद, संचालक, उप समिती पदाधिकारी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन संस्थेचे संस्थांपक अध्यक्ष ॲड. नंदेश अंबाडकर, सचिव डॉ. विजय भोजने, जन संपर्क अधिकारी ॲड.प्रभाकर वानखडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

२२ वर्षांचा वनवास संपला!

अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेत सहा शिक्षकांना नियुक्तीपत्रे

नगराध्यक्ष, मुख्याधिकाऱ्याच्या पाठपुराव्याला यश

अंजनगाव सुर्जी/वार्ताहर

नगरपरिषद शाळांमधील शिक्षणाच्या खालावलेल्या दर्जाबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आणि उदासीनता असताना अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेने शिक्षण व्यवस्थेला नवसंजीवनी देणारा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. सन २००४ पासून तांत्रिक कारणांमुळे रखडलेली शिक्षक भरती प्रक्रिया अखेर मार्गी लावत नगरपरिषदेने एकाच दिवशी सात पैकी सहा शिक्षकांना नियुक्तीपत्रे प्रदान केली.

नवनिर्वाचित नगराध्यक्ष इंजि. अविनाश गायगोले आणि नगरसेवकांनी पदभार स्वीकारताच शाळांचे नूतनीकरण, सोयी-सुविधा आणि सर्वात महत्त्वाचा

असलेला शिक्षकांचा तुटवडा हा विषय प्राधान्याने हाती घेतला होता.यासाठी मार्गदर्शक आमदार ज. मो. आभ्यंकर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक व अनुभवी शिक्षणतज्ज्ञ माजी प्रा. रविंद्र कोकाटे यांच्या नेतृत्वाखाली एका विशेष अभ्यासगटाची नियुक्ती करण्यात आली. या अभ्यासगटाने सर्व तांत्रिक बाबींचा सखोल अभ्यास करून शासनाकडून सर्व आवश्यक मान्यता मिळवून घेतल्या. मुख्याधिकारी विजय लोहकरे आणि माजी प्रा. रविंद्र कोकाटे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुरजोर प्रयत्नांतून अत्यंत किचकट प्रक्रियेत अडकलेला हा प्रश्न निकाली निघाला. पवित्र पोर्टलद्वारे प्राप्त झालेल्या उमेदवारांपैकी ६ शिक्षकांना नियुक्ती देण्यात आली.नगरपरिषदेच्या सभागृहात अत्यंत भावनिक आणि उत्साही वातावरणात हा नियुक्ती सोहळा पार पडला. नवनियुक्त शिक्षक आपल्या कुटुंबीयांसमवेत उपस्थित होते.

> खाजगी शाळांचे शिक्षण सर्वसामान्यांना परवडणारे नाही. त्यामुळे शहरातील विकासाच्या दृष्टीने पहिले प्राधान्य शिक्षणावर दिले आहे. इतर विकास कधीही होऊ शकतो मात्र विद्यार्थाचे शैक्षणिक नुकसान भरून निघत नसतो त्यामुळे पहिले प्राधान्य आमचे नगरपरिषदेच्या शाळेचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी होत आहे.
>
> **इंजि. अविनाश गायगोले नगराध्यक्ष**

या कार्यक्रमास नगराध्यक्ष इंजि. अविनाश गायगोले, उपनगराध्यक्षा प्रियंका मालठाणे, शिक्षण सभापती मो. मुनाफ मो. रेहान, मुख्याधिकारी विजय लोहकरे, बांधकाम सभापती शे. नईम, नगरसेवक मो. कलीम मो. कलाम, शोयब खान, प्रदीप देशमुख, राजु कुरेशी, अकबर शहा, जानिभाई, अजय पसारी, सुधीर देवगीरे, गजानन विजेकर,आसीफ ताज मोहम्मद,रहीम शहा,श्रीकांत जुनघरे इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.या निर्णयामुळे नगरपरिषद शाळांमधील शिक्षक भरतीचा २२ वर्षांचा वनवास संपला असून, सर्वसामान्य नागरिकांच्या मुलांना आता दर्जेदार शिक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

खोलापूरच्या दोन सख्ख्या भावांची जिल्हा परिषद शिक्षकपदी निवड

खल्लार/वार्ताहर

'इच्छा तिथे मार्ग' आणि 'कठोर मेहनतीला पर्याय नाही' हे खोलापूर येथिल जवंजाळ बंधूंनी आपल्या यशातून सिद्ध करून दाखविले आहे. गावातील एकाच सामान्य कुटुंबातील दोन सख्ख्या भावांनी आपल्या अथक प्रयत्न, जिद्द, चिकाटी आणि रात्रीचा दिवस करून केलेल्या अभ्यासाच्या जोरावर थेट जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक बनण्याचा बहुमान मिळविला आहे. सुरेश गणेश जवंजाळ आणि प्रशांत गणेश जवंजाळ अशी या दोन्ही यशस्वी भावांची नावे आहेत.जवंजाळ कुटुंबाची घरची परिस्थिती अत्यंत सर्वसाधारण आहे. मात्र, प्रतिकूल परिस्थितीवर मात करित मुलांनी शिक्षण घेऊन मोठे व्हावे, हेच आई-वडिलांचे स्वप्न होते. सुरेश आणि प्रशांत या दोन्ही भावांनी सुरुवातीपासूनच शिक्षणात सातत्य ठेवले. स्पर्धा परीक्षा आणि शिक्षक भरती परीक्षेचा अभ्यास करताना अनेक अडचणी आल्या, मात्र त्यांनी आपली जिद्द आणि आत्मविश्वास ढळू दिला नाही. दोन्हीं भावांनी अभ्यास करताना एकमेकांना खंबीर साथ दिली. दिवस-रात्र नियोजित अभ्यास, वेळेचे व्यवस्थापन आणि अभ्यासातील सातत्य यामुळेच त्यांनी पवित्र पोर्टलद्वारे जाहीर झालेल्या शिक्षक भरतीच्या निकालात यश मिळविले. सुरेश आणि प्रशांत या दोघांचीही जिल्हा परिषद शाळेवर शिक्षक म्हणून निवड झाली आहे.

गणेशोत्सव : तार्किक दोष

सुरु होत असलेला गणेशोत्सव व त्यात लावण्यात येणारे डीजेमुळे होणाऱ्या ध्वनी प्रदूषणाविरोधात पुण्यातील समाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांनी मांडलेले मुद्दे व त्यात लॉजिकल फॅलसीवापरलेला शब्द त्यामुळे त्यांच्या मुलाखतींची चर्चा राज्यभर सुरु झाल्या आहेत. तार्किक दोष म्हणजे काय हा विषय नव्याने जनतेला समजू लागला आहे. त्यांनी केलेली ध्वनी प्रदूषणाबाबतची तर्कशुद्ध मांडणी सोडून लोक धार्मिक विषयाकडे वळले आहेत. ध्वनी प्रदूषणाबाबत बापट यांनी संस्कृत सुभाषित मांडले. त्यांना अशी प्रसिद्धी नको असून त्यांना तर्कशुद्ध पद्दतीने मांडणी केली. माझ्याकडे लक्ष देण्यापेक्षा मुद्यांकडे लक्ष केंद्रीत करावे असे बापट यांचे मत आहे.

'घटं भिन्द्यात् पटं छिन्द्यात्
कुर्याद्रासभरोहणम्।
येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो
भवेत'

मडके फोडावे, कपडे फाडावे आणि गाढवावर बसावे; पण कोणत्याही प्रकारे माणसाने प्रसिद्ध व्हावे !अशी चुकीची प्रसिद्धी पेक्षा काम, कर्तव्य महत्वाचे आहे. हे त्यांनी मांडले. त्यांचे भाषा प्रभुत्व वाखण्याजोगे आहे. त्यामुळे ते काय बोलतात हे अनेकदा प्रश्न विचाणाऱ्यांना समजले नाही.

जगात ग्रीक तत्त्ववेत्ता ॲरिस्टॉटल तर भारतात महर्षी अक्षपाद गौतम ऋषी यांनी तर्कशास्त्रा विषयी काही मुद्धे मांडले. कोणत्याही गोष्टीला तर्क लावले तर त्याचे उत्तर निश्चित मिळते. परंतू असा तर्क जर धार्मिक, भावनिक गोष्टीत लावला तर लोकांना ते पटत नाही. लोक असा तर्क मांडणाऱ्याला मुर्खात काढतात. कोणत्याही धर्मात अशा अनेक भाकड कथा असतात. अशा कथांविषयी तर्क लावले तर हल्ले होण्याची शक्यता असते. त्यामुळे तर्कशास्त्र अवगत असणे गरजेचे आहे. बापट यांनी वारंवार वापरलेले शब्द लॉजिकल फॅलसी (Logical Fallacy) म्हणजे तार्किक दोष असे दोष आपणास नेहमी दिसू येतात.

ॲड होमिनेम (Ad Hominem) व्यक्तिकेंद्रित आक्षेप, व्यक्तीदोष दाखवणे किंवा व्यक्तीवर टीका करणे अनेकदा स्थानिक विषयात एखाद्या व्यक्तीने जर तार्किक मुद्धे मांडले तर समोरच्याला मूळ मुद्याला उत्तर न देता. मुद्धे मांडणाऱ्या व्यक्तचा स्वभाव, ओळख, त्याचा रहिवास, धर्म तसेच व्यक्तिगत आयुष्यावर हल्ला चढवला जातो. डीजे आणि ध्वनी प्रदूषण मुद्धा मांडल्यावर मुद्धा समजून न घेता हे पुण्याचे नसून बाहेरचे आहेत. हे सणांच्या विरोधात आहेत हे मुद्धे समोर आले.

व्हॉटअबाउटिझम (Whatabo utism) लक्ष विचलित करणे, लक्ष दुसरीकडे वळवणे एखाद्या गोष्टीविषयी मांडलेला मुद्दा न पाहता मूळ विषयावर थेट उत्तर देण्याचे टाळून जुना वाद उकरून काढला जातो. त्या गोष्टीच्या वेळी का नाही. मूळ मुद्दा पासून भरकटवण्यासाठी दबावही वाढवला जातो. डीजे काय फक्त आमच्या सणांत आहे का दुसरे धर्माचे वाजवतात तेंव्हा कुठे असता. हा प्रश्न उपस्थित केला जातो.

अपील टू इग्नोरन्स (Appeal to Ignorance) अज्ञानाचा गैरफायदा उठवणे, माहिती नसल्याचा फायदा घेणे, अज्ञानाधारित युक्तिवाद मांडणे. एखादा तर्क मांडल्यावर किंवा एखादी गोष्ट चुकीची आहे. हे सिद्ध करण्यासाठी पुरेशी माहिती नसणे, पुरावा नसणे म्हणून मग ती गोष्ट सत्यच किंवा खरीच आहे हे सांगत बसणे. ध्वनी प्रदूषणाचा कोणालाच त्रास नाही. कारण त्याचा पुरावा नाही असा चुकीच्या पद्धतीने अर्थ लावून पुढच्याला नामोहरम केले जाते.

स्लिपरी स्लोप (Slippery Slope) भीती दाखवणे, घाबरून सोडणे एखादी छोटी समोरच्याने मांडलेला तर्क किंवा गोष्ट चुकीची असून त्याचे भविष्यात गंभीर परिणाम होतील. अशी भीती मनात उत्पन्न केली की पुढे काय होणार या भीतीने त्या तर्कला विरोध होतो.

समजा डीजेवर बंदी घातली तर उद्या सण उत्सव यावरही बंदी येईल. या पद्धतीचा उपयोग गुन्हेगारी क्षेत्रात केला जातो. खंडणी दे नाहीतर तुला धंदा करता येणार नाही. अशी अनेक उदहारणे आपल्या समोर आहेत.

अपील टू ऑथॉरिटी (Appeal to Authority) अधिकाराचा चुकीचा आधार घेणे, मोठ्या नावाचा आधार घेणे मांडलेला मुद्दा तर्काच्या आणि पुराव्याच्या निकषांवर सिद्ध करण्याऐवजी, फक्त आमचा नेता, महाराज, एखादी मोठी प्रसिद्ध किंवा प्रभावी व्यक्ती किंवा संघटना हे असे सांगतात म्हणून ते खरे आहे. असे मानले जाते.

फॉल्स डायकोटॉमी (False Dichotomy) चुकीचे द्विविभाजन, आभासी द्विपार्याय, फक्त दोनच पर्याय आहेत. असे दाखवणारा चुकीचा तर्क मांडणे. एखादा क्लिष्ट विषय किंवा गुंतागुंतीचा विषय समजावून सांगताना केवळ दोनच पर्याय आहेत हे दाखवून देणे. जरी प्रत्यक्षात त्यापेक्षा अनेक पर्याय उपलब्ध असले तरी समोरच्याला म्हणजेच हे नाही तर तेच असे सांगणे होय.

आकारिक तार्किक दोष, अनाकारिक तार्किक दोष या मध्ये सर्व तार्किक दोष आपणास सापडतील. जगता विनाकारण वाद घालणारे, विरोधाला विरोध करणे, बदनामी करणे, खोट बोल पण रेटून बोल, बाष्फळ वक्तव्य करणे, स्वप्न दाखवणे या वृत्तीचे लोक भरपूर सापडतील. अशा लोकांना कितीही तर्क शास्त्रशुद्ध पद्धतीने सांगितले तरी ते मानण्यास तयार नसतात. त्यासाठी विज्ञान शिकणे आवश्यक आहे. तर्कशुद्ध आणि पुराव्यांवर आधारित युक्तिवादाने चर्चा करता आली पाहिजे. वैयक्तिक पातळीवर न घसरता आपण सुसंवादाने विषय सोडवले पाहिजे. यासाठी समर्थ रामदास म्हणतात की,

अभ्यासोनी प्रकोटावे। नाही तरी
झाकोनी असावे।
प्रकोटोनी नासावे। हे बरे नोहे।

कोणत्याही गोष्टीची, विषयाची सखोल माहिती, त्याविषयीचे ज्ञान, उपयोग, दुष्परिणाम यांचा सखोल अभ्यास असावा.

सखोल अभ्यास असल्या शिवाय आपले मत किंवा कला लोकांसमोर मांडू नये, अन्यथा मौन पाळणे उत्तम ठरते.

विठ्ठल वळसे पाटील
पुणे, मो.८४८४०६६०४२

गरबा, धार्मिक स्वायत्तता आणि राजकीय दुटप्पीपणा...

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गरबा आणि दांडिया आयोजनांमध्ये मुस्लिमांना प्रवेश बंदी, आधार कार्डद्वारे ओळख पडताळणी आणि कपाळी टिळा लावण्याच्या विश्व हिंदू परिषदेच्या आवाहनामुळे राजकीय व सामाजिक वर्तुळात तीव्र वाद पेटला आहे.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत यांच्यासह काही सामाजिक कार्यकर्त्यांनी या नियमांवर प्रश्न उपस्थित केले आहेत. मात्र, या वादाच्या मुळाशी केवळ राजकीय मतभेद नसून धार्मिक परंपरांचे पावित्र्य, सुरक्षा आणि राजकीय पक्षांचा दुटप्पीपणा हे महत्त्वाचे मुद्दे जोडलेले आहेत.

गरबा आयोजनांच्या काळात 'लव्ह जिहाद'सारखे प्रकार आणि अनुचित घटना घडत असल्याचा दावा हिंदू संघटनांकडून सातत्याने केला जातो.

या मुद्द्यावर संजय राऊत व आदित्य ठाकरे आणि काही सामाजिक विचारवंत ज्या वेगाने हिंदू आयोजकांना 'सर्वसमावेशकतेचे' तत्त्वज्ञान शिकवतात, तितक्याच वेगाने दुसऱ्या बाजूने घडणाऱ्या अनुचित घटनांच्या वेळी मौन बाळगतात, हा तीव्र आक्षेप आहे. जेव्हा जेव्हा विशिष्ट समाजातील युवकांकडून गंभीर गुन्हे घडतात, तेव्हा या नेत्यांची तोंडे बंद होतात. राजकीय सोयीनुसार एका बाजूला उपदेश करायचा आणि दुसऱ्या बाजूच्या मूलतत्त्ववादावर किंवा गुन्हेगारीवर सोयीस्कर मौन बाळगायचे, या दुटप्पी वृत्तीमुळे सामान्य नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होत आहे.

कोणत्याही सार्वजनिक किंवा धार्मिक उत्सवाचे पावित्र्य राखणे आणि उपस्थितांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे हा प्रत्येक समाजाचा आणि आयोजकांचा मूलभूत अधिकार आहे.

सुरक्षिततेचे कडक उपाय योजणे किंवा धार्मिक श्रद्धांचा आदर करणे म्हणजे भेदभाव नव्हे, तर ती काळाची गरज ठरू शकते.

राजकीय नेत्यांनी केवळ एकांगी आणि सोयीची भूमिका न घेता, सुरक्षेचे गांभीर्य आणि दोन्ही बाजूंच्या जबाबदारीची जाणीव ठेवूनच मते मांडली पाहिजेत. कारण खरी सुरक्षितता आणि सामाजिक समतोल हा केवळ एका बाजूने दाखवलेल्या औदार्याने निर्माण होत नसून, दोन्ही बाजूंनी दाखवलेला परस्पर आदर, प्रामाणिकपणा आणि जबाबदार वर्तनातूनच शक्य होतो.

अविनाश देशपांडे

गणेशोत्सवातील परंपरेला गालबोट लावणारे प्रकार घडणे अयोग्यच

देशातील महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक परंपरेचा एक सर्वात जास्त प्रमाणात साजरा होणारा सार्वजनिक उत्सव म्हणून गणेशोत्सवाचा उल्लेख केला जातो. राज्यामध्ये सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात १८९३ मध्ये झाली. गणपतीची पहिली सार्वजनिक प्रतिष्ठापना श्रीमंत भाऊसाहेब रंगारी यांनी पुण्यात केली. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी या उत्सवाला सार्वजनिक आणि व्यापक स्वरूप दिले. ज्यामुळे स्वातंत्र्य लढ्यासाठी लोकांना एकत्र आणता येईल. ब्रिटिशांच्या विरोधात राष्ट्रीय जाणिवा जागृत करणे, त्याचबरोबर सामाजिक ऐक्य घडवणे हा गणेशोत्सवाचा मूळ उद्देश होता.

सुरुवातीच्या काळात गणेशोत्सवात समाजकारण पुरेपूर भरलेले होते. त्या अनुषंगाने समाजाचे प्रबोधन करण्यासाठी विविध कार्यक्रम मोठ्या प्रमाणात गणेशोत्सव काळात घेतले जात होते. तसेच समाज सुधारण्यासाठी योग्य पावलेदेखील उचलली जात होती. त्यानंतरच्या काळात गणेशोत्सवामध्ये राजकारण येत गेले. परिणामी राजकीय लोकांनी गणेशोत्सवाचा फायदा उचलण्यास सुरवात केली. सामाजिक मंडळांमधून नवे नेतृत्व तयार होण्याबाबरोबरच मंडळातील कार्यकर्त्यांच्या मदतीने राजकीय गणितेदेखील साकार केली जाऊ लागली.

त्यापाठोपाठ सार्वजनिक गणेशोत्सवाचा सर्वदूर प्रसार आणि प्रचार झाला. त्यामुळे त्यात आत मोठ्या प्रमाणात अर्थकारण आलेले दिसते.

गणेशोत्सव हा महाराष्ट्रात केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक उत्सव राहिलेला नाही. त्यामागे मोठे अर्थकारण दडलेले आहे. मृतिकारांचा व्यवसाय ते मंडळातील कार्यकर्त्यांना मिळणारी हक्काची वर्गणी याशिवाय अनेक गोष्टींवर या उत्सवातील अर्थकारण उभे राहिले आहे. कोणाच्याही आर्थिक हितसंबंधाला धक्का लागला तर त्यांना सहन होणे आता अवघड झाले आहे. नुकतेच गणेशोत्सवातील विकृतींना विरोध करणाऱ्या पुण्यातील सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांच्यावर शारीरिक हल्ला करणाऱ्या प्रवृत्ती म्हणजे झुंडशाहीचाच प्रकार आहे. महाराष्ट्राच्या एका सुंदर परंपरेला गालबोट लावणारे प्रकार घडू नयेत यासाठी प्रयत्न करणाऱ्यांना मारहाण होणे हे पोलीस प्रशासनाचे अपयशच मानले पाहिजे.

एखाद्याचे विचार पटत नसल्यास त्याच्यावर हल्ला करणे किंवा त्याचा जीव घेण्याचा प्रयत्न करणे या गोष्टी लोकशाहीच्या व्याख्येत बसत नाहीत. सार्वजनिक मंडळांनी आवाजाची मर्यादा राखत आपल्या पारंपरिक वाद्यांनीशी गणेशोत्सव साजरा करण्यावर कोणाचाही आक्षेप नाही. परंतु प्रचंड आवाजात ढोल वाजवणे आणि डीजेचा वापर करणे हे प्रकार उन्मादाचेच आहेत.

त्यावर अंकुश घातलाच पाहिजे. म्हणून अलीकडेच राज्यतील सोलापूर शहरात डिजेमुक्त उत्सवाला सुरुवात झाली.

त्याचे अनुकरण राज्यातील पुण्यासह अन्य शहरांनी देखील केले पाहिजे.

प्रा. मधुकर चुटे

जीवन यालाच म्हणतात...

जीवन यालाच म्हणतात
जे पाण्याचा बुडबुडा, सागराची लाट किंवा मातीचे खेळणे आहे
मिळाल्यावर त्याची किंमत न जाणता मातीमोल समजतो
हरवल्यावर तेच सोन्यासारखे अनमोल वाटते
मिळणे आणि हरवणे यालाच जीवन म्हणतात..
सुख-दुःख या दोन्ही वेदना सत्य आहेत, आणि अनित्य आहेत
फक्त काही वेळेचे पाहुणे आहेत, येणे आणि जाणे हाच त्यांचा स्वभाव आहे
स्वभावाला समताभावाने पाहणे यालाच जीवन म्हणतात..
मनुष्य स्वतःच आपल्या राग-द्वेषाच्या बंधनात अडकतो
आणि दुःखाचा अनुभव घेतो
या बंधनातून मुक्तीतच खरे सुख शोधतो
बंधनांच्या वेदनांना तटस्थपणे जाणणे यालाच जीवन म्हणतात..
आई-वडील, पत्नी, मुलगा-मुलगी, भाऊ-बहीण, मित्र-सखा आणि कितीतरी
इतक्या सगळ्या नात्यांच्या बंधनात बांधला आहे मनुष्य
पण मनाचा मनाशी असलेला नाताच त्याला माहीत नाही
जीवनाला मोठी कठीण गोष्ट समजतो
पण अडचण काय आहे हेच त्याला माहीत नाही
बंधनांच्या आसक्तीतून मुक्ती, यालाच जीवन म्हणतात..
भूतकाळाच्या आठवणीत भविष्याची चिंता करतो
आणि वर्तमानात जगण्याची संधी गमावतो
म्हणून सर्व संवेदनांना साक्षीभावाने जाणून
अनुभूतीने वर्तमानात जगणे, यालाच जीवन म्हणतात..

संजय मा. यादगिरे, अमरावती

बाप्पा, आता तुम्ही



बाप्पा, आता तुम्ही
बॅग घ्या भरायला,

घरच्यांची परवानगी घेऊन
आमच्याकडे या राहायला..

तुमच्या आगमनाची आम्ही
घेतलीय तयारी करायला,

इकडे आल्यावर आम्ही
आहोत लाड पुरवायला..

फक्त प्रवास संपेपर्यंत
आणा फराळाचे खायला,

जवळ आला की कळवा,
वाजत-गाजत येऊ घ्यायला..

मोदक, लाडू, पेढे,
सुगंध जास्वंदाचा घ्यायला,

काय हवे ते सांगा,
पदार्थ घेतले बनवायला..

तुम्हालाही घेऊ आपण
नवीन मोबाईल वापरायला,

मोबाईलवर मॅप लावून
जाऊ बाहेर फिरायला..

आता मात्र रहा इथेच,
जायचा विचार करू नका,

तुमच्याशिवाय सांगेल कोण,
सांगा आम्हाला आमच्या
चुका...

अलका भवारी-कोंढवळे
मो. ९०११९४३८९०

सहकार भूमिचे वास्तव

सहकारातून स्वाहाकाराची
दिसून येतेय कुप्रवृत्ती

बोटावर मोजण्या इतक्याच
संस्था करताहेत प्रगती..

सुतगिरणी असो
की साखर कारखाने

नेहमी तोट्यातच
का जातात राम जाने..

अशा रक्तपिपासू -
गोचिडांना कराल
तडीपार

तरच अत्र तत्र सर्वत्र होईल
सहकाराचा
जय जयकार..!

प्रा. अशोक सारडा,
मेहकर
मो.९४२१३९४३३९

गणेशोत्सव - संस्काराची संधी

गणेशोत्सवाच्या काळात घरोघरी आणि मंडळांमध्ये श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठा केली जाते. अनंतचतुर्दशीपर्यंत हा उत्सव भक्तिभावाने साजरा केला जातो. श्री गणेशाची भावपूर्ण पूजा, आरती, नामजप, अथर्वशीर्षाची आवर्तने, नैवेद्य, भजन, कीर्तन, प्रवचन असे कार्यक्रम आयोजित केले जातात. गणेश उत्सवामध्ये लहान मुले सुद्धा आनंदाने सहभागी झालेली असतात. या सणाच्या काळात लहान मुलांवर संस्कार करण्याची एक संधीच असते. त्यामुळे लहान मुलांना श्री गणेशाची संपूर्ण माहिती सांगणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना गणेशाची जन्मकथा, गणेशाला दूर्वांची जुडी का वहातात? दूर्वांना किती पाती असावीत? गणेशाला लाल फुल का अर्पण करतात? गणेशाच्या आरतीची रचना कोणी केली आहे? आरती भाव ठेवून कशी म्हणावी? गणेशाच्या नावांचा अर्थ काय आहे? गणेशाचा नामजप कसा? आणि का करावा? त्याचप्रमाणे मुलांना देवतेच्या बाबतीत आपल्याकडून कळत-नकळत झालेल्या चुकांबद्दल क्षमा मागायला शिकवावी. त्यामुळे मुलांमध्ये नम्रता येते आणि कमीपणा घ्यायची सवय लागते. याचे ज्ञान मुलांना असल्यास मुलांमध्ये लहानपणापासूनच संस्काराचे बीज रोवल्यामुळे देवतेविषयी भक्तीभाव जागृत व्हायला सहाय्य होते. हे संस्कार मुलांमध्ये आयुष्यभरासाठी होतात. देवतेची भक्तीपूर्ण आराधना केल्यामुळे मुलांना त्यांच्या आयुष्यात अध्यात्मिक स्तरावर अधिकाधिक लाभ होतो. यासाठीच गणेशोत्सव ही मुलांवर संस्कार करण्याची एक संधीच आहे.

भीमराव साळुंखे

शिव पार्वतीची कृपा देणारे हरितालिका व्रत

हरितालिका व्रत भाद्रपद शुक्ल पक्ष तृतीयेला केले जाते. या व्रताची प्रधान देवता माता पार्वती आहे. या दिवशी उमा-महेश्वराची मूर्ती स्थापन करून विधीपूर्वक पूजा केली जाते. काही ठिकाणी तिळ व तुपाची आहुती देऊन हवनही केले जाते. हरिकाली, हस्तगौरी आणि कोटेश्वरी या पार्वतीच्या रूपांचेही व्रत केले जाते. विशेषतः स्त्रिया हे व्रत श्रद्धेने करतात. माता पार्वतीने भगवान शिवांना पतीरूपाने प्राप्त करण्यासाठी हे व्रत केले होते, अशी मान्यता आहे. योग्य वर मिळावा यासाठी विवाहयोग्य कन्या हे व्रत करतात. सौभाग्य अखंड राहावे आणि आध्यात्मिक उन्नती व्हावी, यासाठी विवाहित स्त्रियाही हे व्रत करतात. श्रद्धेने व्रतपालन केल्याने सांसारिक अडचणी दूर होऊन आध्यात्मिक लाभ प्राप्त होतो, अशी धार्मिक मान्यता आहे.



आदिती देखणे

हरितालिका व्रतः माहिती आणि महात्म्य

हरितालिका हा सण गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवशी (भाद्रपद शुद्ध तृतीया) अत्यंत उत्साहात आणि श्रद्धेने साजरा केला जातो. या दिवशी सवाष्ण स्त्रिया आणि कुमारिका अखंड सौभाग्य आणि मनासारखा वर मिळवण्यासाठी कडक उपवास करतात. पौराणिक कथेनुसार, देवी पार्वतीने महादेवांना पती म्हणून प्राप्त करण्यासाठी कठोर तपश्चर्या केली होती. तिने हेच व्रत करून शिवाला प्राप्त केले होते. तेव्हापासून स्त्रिया आपल्या वैवाहिक जीवनाचे रक्षण, अखंड सौभाग्य आणि इच्छित वर मिळवण्यासाठी हे व्रत करतात. या दिवशी सकाळी लवकर मंगलस्नान करून पार्वती आणि तिच्या सखीच्या मूर्तीची, तसेच मातीपासून बनवलेल्या शिवलिंगाची स्थापना केली जाते. यादरम्यान दिवसभर निरंकार उपवास केला जातो आणि रात्री भजन-कीर्तन करत जागरण केले जाते. दुसऱ्या दिवशी सकाळी उत्तरपूजा करून शिवपिंडी आणि मूर्तीचे पाण्यात विसर्जन केले जाते आणि उपवास सोडला जातो. हरितालिकेच्या पूजेत १६ नाममंत्रांचे पठण करत १६ प्रकारच्या पत्री (पाने) शिवपिंडीवर वाहिल्या जातात. या पूजेमुळे वातावरणात चैतन्य आणि शक्तीची स्पंदने पसरतात, ज्यामुळे मनाला आणि शरीराला आध्यात्मिक ऊर्जा मिळते. थोडक्यात सांगायचे तर, हरितालिका हे केवळ एक व्रत नसून स्त्रीच्या श्रद्धेचा, त्यागाचा आणि मानसिक आत्मबल वाढवण्याचा एक सुंदर उत्सव आहे.

वर्षा आवदे

लोकमान्य टिळकांची संकल्पना प्रत्यक्षात आणूया!

स्वातंत्र्य पूर्व काळात लोकमान्य टिळकांनी घरोघरी बसणाऱ्या गणपतीला सार्वजनिक स्वरूप दिले. ते देण्यामागचं कारणही सर्वांना माहिती आहे, की त्याकाळी आपण सर्व गुलामगिरीत होतो. लोकांच्या विचारांची देवाण-घेवाण होणे, सगळ्यांनी एकत्र येणे, संघटन होणे आणि त्याद्वारे इंग्रजांचा एकत्रितरीत्या सामना करणे. गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी सर्वांना प्रेरणा मिळावी, सामाजिक संवाद, प्रेम वाढावा या उद्देशाने लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणपतीची सुरुवात केली . एक गाव एक गणपती अशी भूमिका जर आपण ठेवली तर संपूर्ण गाव त्यानिमित्ताने एकत्रित येईल. त्यावेळी ढोल, ताशे, नगाडे इत्यादी पारंपारिक वाद्यांनी श्री गणेशाचे स्वागत व्हायचे . दहा दिवस भजने व्हायची. परंतु काळाच्या ओघांमध्ये टिळकांना अपेक्षित अशा सार्वजनिक गणपतीची संकल्पना लोप पावत गेली. पुढे जाऊन डीजे आला. त्यावर दारू पिऊन पिक्चरच्या गाण्यांवर हिडीस नृत्य करणे सुरू झाले. आध्यात्मिक असणारा कार्यक्रम, त्यात गणेशाची कृपा संपादन करण्याच्या ऐवजी गणेशाची अवकृपाच आपण संपादन करत आहोत असा काळ यायला लागला. डीजेमुळे ध्वनी प्रदूषण वाढले. अक्षरशा भिंती, दारे कंपन पावायला लागली. त्याच्या आवाजामुळे नवजात शिशु, लहान मुले, वृद्ध, रुग्ण, गरोदर स्त्रिया यांच्या तब्येतीवर परिणाम व्हायला लागला. फटाक्यांची मोठी लट लावल्यामुळे कानठळ्या बसायला लागल्या. त्यामुळे माझी सर्व गणेशोत्सव मंडळांना विनंती आहे की देवाचं कार्य हे शांततेने, त्याच्या नामजपात पार पडावं. त्यासाठी सिनेमाची गाणी नको. सिनेतारका यांना न बोलवता अध्यात्मिक गुरु, प्रवचन घेणारे, समाज प्रबोधनाचे कार्य करणाऱ्या व्यक्तींना बोलावून कार्यक्रम आयोजित करण्यात यावे. व्यसनमुक्तीसाठी प्रबोधन करण्यात यावे. गणेश मूर्ती ही खूप भव्य नको. ती शाडू मातीची असायला हवी. शास्त्रोक्त पद्धतीने तिची मांडणी आणि पूजाअर्चा व्हावी. तिचे वाहत्या पाण्यातच विसर्जन करावे.

डॉ. भारती हेडाऊ, यवतमाळ

सह्याद्रीच्या कुशीत बच्चू कडूंचा साहसी थरार

३०० फूट लिंग्या धबधब्यावर केले वॉटरफॉल रॅपलिंग

पुणे/प्रतिनिधीः-
जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करणारे माजी मंत्री तथा आमदार बच्चू कडू यांनी आता सह्याद्रीच्या कड्यांवरही आपल्या धाडसी वृत्तीची झलक दाखवली. पुणे जिल्ह्यातील लवासा परिसरापुढील लिंग्या घाटातील तब्बल ३०० फूट उंच लिंग्या वॉटरफॉलवर बच्चू कडू यांनी वॉटरफॉल रॅपलिंगचा थरारक अनुभव घेतला.

धबधब्याच्या फेसाळत्या प्रवाहातून दोरीच्या साहाय्याने उंच कड्यावरून खाली उतरण्याचे हे आव्हान अत्यंत रोमांचकारी होते. सुरक्षा साधने आणि प्रशिक्षित तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली बच्चू कडू यांनी कोणतीही भीती न बाळगता संपूर्ण आत्मविश्वासाने हे आव्हान पूर्ण केले.

विशेष म्हणजे, यापूर्वी बच्चू कडू यांनी एव्हरेस्ट बेस कॅम्प सर केला आहे. आता थेट एव्हरेस्टवर चढाई करण्याच्या तयारीचा एक भाग म्हणून आपल्या रोजच्या राजकीय आणि सामाजिक धकाधकीतून वेळ काढत अशा साहसी उपक्रमांच्या माध्यमातून स्वतःची शारीरिक व मानसिक तयारी सुरू असल्याचे दिसून येत आहे.

'आव्हान कितीही मोठं असो, मागे हटायचं नाही. जनतेच्या प्रश्नांसाठी संघर्ष करताना जसं धैर्य लागतं, तसंच एव्हरेस्ट चढतानाही जिद्द आणि आत्मविश्वास लागतो. सह्याद्रीतील हा अनुभव एव्हरेस्टच्या तयारीतील एक टप्पा आहे. लक्ष्य मोठं आहे आणि तयारीही त्याच ताकदीने सुरू आहे,' अशी भावना बच्चू कडू यांनी व्यक्त केली.

राजकीय संघर्षाच्या मैदानात आक्रमक भूमिका घेणारे बच्चू कडू साहसी उपक्रमांमध्येही आव्हान स्वीकारण्याची आपली वृत्ती कायम ठेवत असल्याचे या निमित्ताने दिसून आले. ३०० फूट खोल दरीत रॅपलिंगचा हा थरार आणि त्यापूर्वीचा एव्हरेस्ट बेस कॅम्पचा अनुभव पाहता, आता त्यांच्या साहसी वाटचालीचे पुढचे लक्ष्य एव्हरेस्ट असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

सह्याद्रीतील साहसी पर्यटनाला चालना देतानाच युवकांनी निसर्गाशी जोडले जावे, साहसाची जिद्द निर्माण करावी आणि कोणतेही आव्हान आत्मविश्वासाने स्वीकारावे, हा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला. साहसी पर्यटन करताना प्रशिक्षित तज्ज्ञांचे मार्गदर्शन, योग्य सुरक्षा साधने आणि हवामानाची परिस्थिती यांना प्राधान्य देणे आवश्यक असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले.

जनतेच्या प्रश्नांसाठी संघर्षाची वाट असो किंवा एव्हरेस्टची चढाई. आव्हान मोठं असेल तर ते स्वीकारायचं आणि शेवटपर्यंत लढायचं, हीच बच्चू कडूंची ओळख या साहसी उपक्रमातून पुन्हा एकदा ठळक झाली.

नेहरू मैदानात मातीच्या गणेशमूर्तींसाठी स्वतंत्र दुकाने

पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी मनपाचे आवाहन

अमरावती/प्रतिनिधीः-
पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने अमरावती महानगरपालिकेने यंदा मातीच्या (शाडू) गणेशमूर्तींच्या विक्रीला प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याअनुषंगाने शहरातील नेहरू मैदान येथे मातीच्या गणेशमूर्तींच्या विक्रीसाठी स्वतंत्र दुकाने राखीव ठेवण्यात आली आहेत.

नेहरू मैदान परिसरातील शाळेच्या बाजूला मातीच्या गणेशमूर्तींच्या विक्रीसाठी दुकाने उपलब्ध करून देण्यात आली असून, महानगरपालिकेकडे नोंदणीकृत मातीच्या गणेशमूर्ती तयार करणाऱ्या मूर्तिकारांकडूनच येथे मूर्ती विक्री करण्यात येणार आहे. यासाठी मूर्तिकार संघटनेकडून हमीप्राप्त दुकाने निश्चित करण्यात आली आहेत. या विक्रीला प्रोत्साहन मिळावे यासाठी महानगरपालिकेकडून आवश्यक सहकार्य करण्यात येत असून, नागरिकांच्या माहितीसाठी परिसरात मनपातर्फे फलकही लावण्यात आला आहे.

गणेशोत्सवात पर्यावरणाचे संरक्षण व्हावे, तसेच प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीमुळे होणारे जलप्रदूषण टाळता यावे, यासाठी नागरिकांनी मातीपासून तयार केलेल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचीच खरेदी करावी, असे आवाहन महानगरपालिकेने केले आहे.

'गणेशभक्तांनी गणेशमूर्ती खरेदी करताना मातीपासून तयार केलेल्या पर्यावरणपूरक मूर्तींना प्राधान्य द्यावे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी नागरिकांनी मातीच्या गणेशमूर्तींची मागणी करावी,' असे आवाहन मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी केले आहे.

नेहरू मैदानातील अधिकृत विक्री केंद्रातून मातीच्या गणेशमूर्ती खरेदी करून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या उपक्रमाला नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेने केले आहे.

नांदगावपेठ ते वलगाव चौपदरी रस्त्याची कामे उत्कृष्ट करा

मंत्री शिवेंद्रराजे भोसले, रस्त्याची केली पाहणी

अमरावती/प्रतिनिधीः-
शहराच्या बाहेरील भागांना जोडणारा व वाहतूक कोंडी कमी होवून आर्थिक विकासाला गती देणारा नांदगावपेठ टोलप्लाझा ते वलगाव या चौपदरी रस्त्याची कामे गुणात्कदृष्ट्या उत्कृष्ट करण्याचे निर्देश, आज सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिले.

या निर्माणाधीन रस्त्याच्या तोमोय शाळे शेजारील कामाची पाहणी करून मंत्री भोसले यांनी माहिती जाणून घेतली. आमदार सुलभा खोडके, राजेश वानखडे, संजय खोडके, प्रवीण पोटे, सार्वजनिक बांधकाम अमरावती प्रादेशिक विभागाच्या मुख्य अभियंता सुषमा बोंद्रे, अधीक्षक अभियंता रावबहादूर पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

राज्य महामार्ग-४७ अंतर्गत नांदगावपेठ टोलप्लाझा-कठोरा-तोमोयशाळा-रेवसा-वलगाव या जवळपास ७ कि.मी. रस्त्याच्या चौपदरीकरणाचे कार्य केंद्रीय रस्ते निधीतून (सीआरएफ) सुरु आहे. अभियांत्रिकी, सामग्री खरेदी व बांधकाम (ईपीसी) तत्वावर तयार होत असलेल्या या रस्त्याची पाहणी करून येत असलेल्या अडचणींची माहिती मंत्री भोसले यांनी जाणून घेतली व आवश्यक सूचना केल्या. अमरावती शहर व लगतील गावांच्या विकासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण असणाऱ्या या रस्त्याची कामे गुणात्मकदृष्ट्या उत्कृष्टपणे पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी संबंधित यंत्रणांना दिल्या. तत्पूर्वी, मंत्री भोसले यांच्या हस्ते तोमोय शाळे शेजारील निर्माणाधीन चौपदरी रस्त्याच्याकडेला पिंपळ वृक्षाचे रोपण करण्यात आले.

आचार्य विनोबा भावे यांच्या जयंतीनिमित्त 'पुस्तकदानातून ज्ञानदानाकडे'चा संदेश

-एमजीएम विद्यापीठात पुस्तकदान अभिनव सोहळा

-प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांचे प्रेरणादायी मनोगत

अमरावती/प्रतिनिधीः- आचार्य विनोबा भावे यांच्या जयंतीनिमित्त महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या वतीने शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता रुक्मिणी सभागृह संभाजीनगर येथे भव्य पुस्तकदान सोहळा व विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. 'भूदानातून पुस्तकदानाकडे पुस्तकदानातून ज्ञानदानाकडे!' या प्रेरणादायी विचाराला केंद्रस्थानी ठेवून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून वाचनसंस्कृती आणि ज्ञानवाटपाचा संदेश देण्यात आला.

या कार्यक्रमात 'आचार्य विनोबा भावे : एक आधुनिक राजकीय विचारवंत' या विषयावर सुप्रसिद्ध लेखक मिलिंद बोकील यांचे विशेष व्याख्यान झाले. विनोबा भावे यांच्या विचारांचा आधुनिक संदर्भ, त्यांचे सामाजिक योगदान, ग्रामस्वराज्य, सर्वोदय आणि समाजपरिवर्तनाची भूमिका यावर बोकील यांनी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावतीच्या प्राचार्य डॉ. स्मिता रावसाहेब देशमुख उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी आपल्या मनोगतात 'पुस्तकदानातून ज्ञानदानाकडे' या संकल्पनेचे महत्त्व अधोरेखित केले.कार्यक्रमाला एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू कर्नल प्रा. डॉ. विलास सपकाळ आणि कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. जॉन चेल्लादुराई, अधिष्ठाता, आंतरविद्याशाखीय अध्ययन यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली.प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख म्हणाल्या की, वाचनातून विचार, अनुभव, संस्कार मिळावेत आणि पुस्तक दानातून ज्ञानदान हे अमूल्य ठरावे. 'मोबाईल तुम्हाला माहिती देतो, पण पुस्तक तुम्हाला दृष्टी देते.' शिक्षणामुळे वाचनातून ज्ञान समृद्ध संशोधनक्षम विकासाभिमुख समाज निर्माण व्हावा यासाठी अनेक जाणकारांनी केलेले पुस्तकदान विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञानाची नवी वाट निर्माण करू शकते. त्यामुळे पुस्तकदानाची चळवळ ही केवळ पुस्तके देण्यापुरती मर्यादित न राहता समाजाला ज्ञानदानाच्या व्यापक दिशेने घेऊन जाणारी चळवळ ठरली पाहिजे.

'आपण एक पुस्तक दान केले, तर कदाचित एखाद्या विद्यार्थ्याच्या आयुष्याला नवी दिशा मिळू शकते,' असा भावनिक संदेशही त्यांनी यावेळी दिला.

विनोबा भावे यांनी भूदान चळवळीच्या माध्यमातून गरजवंताला भूमीचे वाटप आणि सामाजिक समतेचा विचार समाजासमोर मांडला. त्याच विचाराचा आधुनिक विस्तार करत पुस्तकदानातून ज्ञानाची समान संधी निर्माण करण्यासाठी कुलगुरू डॉ विलास सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली एमजीएम विद्यापीठाच्या उपक्रमात सहभागी झाल्याचा आनंद व्यक्त केला. आज शिक्षक आणि विद्यार्थी दोघांना वाचनाची गरज असल्याचे डॉ. देशमुख यांनी नमूद केले.

गावंडे महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धा संपन्न

-आर.एल.टी. कॉलेज ऑफ सायन्स अकोला विजेता; माऊली इंजिनिअरिंग कॉलेज शेगाव उपविजेता

साखरखेर्डा/प्रतिनिधीः-
येथील स्व.भास्करराव शिंगणे कला, प्रा.नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ. निलेश गावंडे यांच्या मार्गदर्शनात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या झोन 'ए' अंतर्गत सत्र २०२६-२७ मधील आंतरमहाविद्यालयीन टेबल टेनिस (महिला) स्पर्धा दि. ९ ते ११ सप्टेंबरदरम्यान उत्साहात पार पडल्या. स्पर्धेत एकूण २१ संघांनी सहभाग घेतला. अंतिम सामना आर.एल.टी. कॉलेज ऑफ सायन्स, अकोला आणि माऊली इंजिनिअरिंग कॉलेज, शेगाव यांच्यात झाला. चुरशीच्या लढतीत आर.एल.टी. कॉलेज ऑफ सायन्स, अकोला संघाने विजेतेपद पटकावले, तर माऊली इंजिनिअरिंग कॉलेज, शेगाव संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. बक्षीस वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी नेहरू युवा क्रिडा व सांस्कृतिक मंडळ चिखलीच्या अध्यक्षा प्रा. डॉ. मीनल गावंडे होत्या. यावेळी अध्यक्षीय भाषणात त्यांनी विजेत्या व उपविजेत्या संघांचे अभिनंदन करून, 'क्रीडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाची असून, खेळामुळे शिस्त, आत्मविश्वास, एकाग्रता व संघभावना विकसित होते. विद्यार्थिनींनी शिक्षणासोबत क्रीडा क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे,' असे आवाहन केले. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. रवींद्र झनके व प्रा. गणेश काकडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आशिष बरडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. राजेश चौरपागर यांनी केले, तर आभार डॉ. राजू पोपळघट यांनी मानले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

आमदार प्रविण पोटे पाटील यांच्या निवासस्थानी मंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची सदिच्छा भेट

अमरावती/प्रतिनिधीः-
छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज, भारतीय जनता पार्टीचे नेते तथा महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत शिवेंद्रसिंह राजे अभयसिंहराजे भोसले यांनी आज अमरावती येथे आमदार प्रविण पोटे पाटील यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.यावेळी आमदार प्रविण पोटे पाटील यांनी सहपरिवारिक शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच भारतीय जनता पार्टी अमरावती शहर व जिल्ह्याच्या वतीने उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शाल, श्रीफळ, पुष्पहार तसेच छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती भेट देऊन त्यांचा सन्मान केला.या प्रसंगी शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी उपस्थित भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधला. यावेळी अमरावती जिल्ह्यातील विविध विकासकामे, सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित विषय तसेच संघटनात्मक आणि विविध सामाजिक विषयांवर चर्चा करण्यात आली.या सदिच्छा भेटीमुळे भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.यावेळी आमदार प्रताप अडसड, आमदार राजेश वानखडे, आमदार प्रविण तायडे, महापौर श्रीचंद तेजवानी, शिवराय कुळकर्णी, जयंत डेहनकर, किरण पातूरकर, तुषार भारतीय, चेतन गावंडे, चेतन पवार यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे शहर व जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक १०
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

चांदूर रेल्वे शहरात मुलांचा तान्हा पोळा उत्साहात

हजारो रुपयांच्या भेटवस्तूंचे मुलांमध्ये वाटप

चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-
चांदूर रेल्वे येथील इंदिरा नगर, राजे वीर संभाजी मंडळ आणि पोळा उत्सव समितीच्या वतीने पारंपारिक तान्हा पोळा मोठ्या उत्साहात आणि आनंदात संपन्न झाला.

या प्रसंगी चिमुकल्या बालगोपालांनी आपल्या नंदी बैलांना रंगीबेरंगी कपडे, फुलांच्या माळा, घुंगरू आणि आकर्षक सजावटीने सजवून मैदानात आणले. लहान-लहान मुलांच्या हातातील माती आणि लाकडापासून बनवलेले सजलेले नंदी पाहून संपूर्ण परिसर भक्तिमय आणि उत्सवमय झाला होता.

सर्वप्रथम रुद्रेश्वर हनुमान मंदिरात सामूहिक आरती करण्यात आली, त्यानंतर लाकडी आणि मातीच्या बैलांची विधिवत पूजा-अर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे परीक्षक शिक्षक सुनील सवई आणि मनिष गुल्हाने यांनी तीनही गटांमधून उत्कृष्ट सजावट निवडून प्रथम, द्वितीय, तृतीय श्रेणी काढली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्या मुलांना आकर्षक भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले.

आयोजकांच्या वतीने तान्हा पोळ्यामध्ये सहभागी झालेल्या प्रत्येक मुलाला प्रोत्साहनपर बक्षीस म्हणून कलर बॉक्स आणि खाऊचे वाटप करण्यात आले. तसेच उत्कृष्ट सजावट करणाऱ्या मुलांना विशेष बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. मुलांच्या चेहऱ्यावर पोळ्याचा आनंद आणि उत्साह ओसंडून वाहत होता.

या कार्यक्रमाला इंदिरा नगरातील नागरिक, महिला, युवा वर्ग आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तान्हा पोळा उत्सव समितीचे पदाधिकारी प्रा. सोनू कडू, स्वप्निल मानकर, मोनू मुरायते, गोपाल अविनाशे, निखिल बावणे, राजू मोरे, सुनील सदावर्ते, शुभम देशमुख, डफली वादक प्रशांत वाल्दे, गौरव शिंदे, अंश दिक्षित, लक्की पाटील,

शिवराज शर्मा यांनी अथक परिश्रम घेतले.

तान्हा पोळयात शेकडो मुलांचा उत्स्फूर्त सहभाग

नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः- बैलाप्रति कृतज्ञता का व्यक्त केली पाहिजे, मोठ्यांच्या पोळ्यांची परंपरा लहान मुलांनाही समजावी आणि त्यांना शेती बैल व संस्कृतीची ओळख व्हावी यासाठी नगरसेवक प्रकाश मारोटकर यांनी तान्हा पोळ्याचे आयोजन केले होते. प्रथम बक्षीस सायकल नगरसेवक प्रीती इखार, द्वितीय बक्षीस सायकल नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर, तृतीय बक्षीस स्टडी टेबल रवी ठाकूर, स्मार्ट वॉच गोपाल बनकर यांच्यातर्फे तर प्रोत्साहन पर पाच स्टडी टेबल मनोज बनारसे,राहुल चांदणे, नितीन दुधे, सुमित गुरमुळे, ऋषिकेश चांदुरकर यांच्यातर्फे देण्यात आले. यावेळी २०७ सहभागी मुलांना प्रकाश मारोटकर यांच्यातर्फे नोटबुक भेट देण्यात आले. यावेळी प्रथम बक्षीस मितांश देशमुख, द्वितीय बक्षीस राघव भगवे, तृतीय बक्षीस अधिरा इखार, चतुर्थ बक्षीस गार्गी तरोणे, पाचवा क्रमांक यश ठाकरे यांना देण्यात आला. यावेळी छत्रपती पुरस्कार प्राप्त सदानंद जाधव, ठाणेदार आनंद पिहूरकर, सुभाषराव मंगळे, पंजाबराव दुधे, पत्रकार विशाल ढवळे जयश्री सुहागपुरे इत्यादी उपस्थित होते.

दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील
किरकोळ (R.M.J.C.) क्र.२३४/२०२६ ने.ता.१६.०९.२०२६

अर्जदार : १. शिला शंकरराव गुल्हाने
२. मंगेश शंकरराव गुल्हाने
३. रोशन शंकरराव गुल्हाने
४. किरण शंकरराव गुल्हाने, रा.पापळ. ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती
५. रुपेश शंकरराव गुल्हाने,
रा.वार्ड नं.२ पापळ. ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी मयत **शंकर नारायण गुल्हाने** यांचा मृत्यू दि.**२५.०६.२०२६** रोजी **पापळ,** ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे झाला. मयताचे अर्जदार २, ३, ५ ही मुले असून अर्जदार नं.४ ही मुलगी आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १४ ऑगस्ट २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

संक्षिप्त

जि.प.मुलांची शाळा येथे तान्हा पोळा

शिराळा- येथील जिल्हा परिषद मुलांच्या शाळेत दरवर्षी प्रमाणे यावर्षी स्व.आप्पासाहेब उर्फ जानरावजी देशमुख यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली त्यानिमित्ताने लायन्स क्लब अमरावती व्दारे मुलांची चित्रकला स्पर्धा व मातीचे बैल स्पर्धा आयोजित करण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी शिक्षक पी.टी.भस्मे हे लाभले होते.प्रमुख अतिथी म्हणून लायन्स क्लबचे अध्यक्ष संजयजी बनकर, सचिव प्रसाद नुलकर व सदस्य पंजाबराव खंडारे,जयंतराव हरणे,तसेच ग्रामस्थ नानासाहेब देशमुख, दुशन देशमुख, अँड समिर देशमुख, लाभले होते.चित्रकला स्पर्धा प्रथम बक्षीस प्रथमेश चव्हाण,व्दितीय बक्षीस शौर्य उघडे,तर तृतीय बक्षीस हर्ष भिवगडे यांना प्राप्त झाले.मातीचे बैल स्पर्धा प्रथम बक्षीस शौर्य उघडे,व्दितीय बक्षीस हर्षल परतेकी,तृतीय बक्षीस मल्हार नवरे यांना प्रदान करण्यात आले.लायन्स क्लब वतीने यावेळी सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.कार्यक्रमाचे संचालन मामनकर यांनी केले.तर आभार पवार यांनी केले.कार्यक्रमाला मोलाचे सहकार्य मनोज देशमुख, शहजादखा पठाण यांनी केले.

बैलपोळा उत्सव समितीतफे पोळा

शिराळा - भाजपाचे अनिल उर्फ राजूभाऊ गंधे यांच्या मार्गदर्शनात राजमाता अहिल्यादेवी चौक शिराळा येथे बैलपोळ्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी कार्यक्रमाचे उदघाटन म्हणून तिवसा मतदार संघांचे लोकप्रिय आ.राजेश वानखडे. तर प्रमुख अतिथी म्हणून ग्रामगिताचार्य श्री ह.भ.प.रायजीप्रभू शेलोटकर महाराज गुरुकुंज मोझरी लाभले. विशेष आकर्षण म्हणजे याठिकाणी ह.भ.प.परमेश्वरी दीदी शेलोटकर व ह.भ.प. श्रीज्योती दिदी शेलोटकर यांनी आपली लाठी व तलवार यांची प्रात्यशिक सादर केले. यावेळी गावकरी लोकांची लक्षनीय उपस्थिती लाभली हे विशेष.बैलपोळ्यामध्ये सजावटी नुसार बैलजोडी व शेतकरी यांचा आ.राजेश वानखेडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.कार्यक्रमला भाजपाचे मा. तालुका अध्यक्ष राजू गंध,जयंत आमले,तालुका उपाध्यक्ष आशिष खैरकर,संजय लव्हाळ,जानरावजी लव्हाळे, विजयराव देशमुख,शिवाजीराव खाडे,मनोज ठाकर,सागर लव्हाळे,अक्षय जवंजाळ,मनोज पोहने,निलेश म्हस्के,संजय भस्मे,प्रवीण भागवत, भरत लव्हाळे व गावातील असंख्य नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते.

चिमुकल्यांच्या उत्साहात तान्हा पोळा

कुऱ्हा- तिवसा तालुक्यातील मुर्तीजापूर (तरोडा) येथील आठवडी बाजार चौकात सत्य साई मंडळ व मूर्तिजापूर मित्र परिवाराच्या वतीने तान्हा पोळा उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. चिमुकल्या बालगोपालांनी सजविलेल्या नंदीबैलांच्या जोड्या घेऊन कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून विश्वनाथ पाटील, (पत्रकार) अशोक पवार, दिलीपरश ढवळी, प्रवीण आळसपुरे व गणेश वाणी उपस्थित होते.यावेळी प्रोत्साहनपर बक्षिसांचे मानकरी म्हणून सोहम नेवारे, अनुज कांबळे, युवराज वेरुळकर, हर्षल यादव, स्वरा वेरुळकर, कृष्णदेवी शिंदे व कान्हा सुमित मते यांची निवड करण्यात आली.मानाच्या बैलजोडीचा मान स्वराज संजय कांबळे यांच्या बैलजोडीला मिळाला. कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्व बालगोपालांना प्रोत्साहन म्हणून शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.तान्हा पोळा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अमोल वेरुळकर, विष्णुपंत ठवकर, शुभम नरोडे, संकेत वेरुळकर, गोपी वेरुळकर, आकाश मोहोड, अनिल बनते, रवींद्र तिरमारे व विनोद्रराव वेरुळकर यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे संचालन व आभार संजयराव कांबळे यांनी केले. चिमुकल्यांचा उत्साह, सजविलेल्या बैलजोड्या आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे तान्हा पोळा कार्यक्रम आनंददायी वातावरणात संपन्न झाला.

'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा, मात्र विकासकामांपासून कोसो दूर

▶ खंडेश्वर संस्थानकडे प्रशासनासह लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष?
▶ विकासकामांना गती देण्याची भाविक व नागरिकांची मागणी

अमरावती/का.प्र.

संपूर्ण तालुका वासियांचे आराध्य दैवत असलेल्या नांदगाव खंडेश्वर येथील खंडेश्वर संस्थानला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळालेला असतानाही मंदिर परिसराचा अपेक्षित विकास अद्याप झालेला नसल्याची भावना भाविक व नागरिकांकडून व्यक्त होत आहे. तीर्थक्षेत्राच्या दर्जामुळे परिसराच्या विकासाला चालना मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात मूलभूत सुविधा आणि पायाभूत विकासाच्या बाबतीत अद्याप मोठी कामे होणे बाकी आहे.अत्यंत जागृत असलेल्या खंडेश्वर संस्थानला धार्मिक आणि स्थानिक पातळीवर अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

महाशिवरात्रीसह श्रावण महिन्यात विविध सण, उत्सव आणि धार्मिक कार्यक्रमांच्या काळात येथे भाविकांची मोठी गर्दी होते. त्यामुळे मंदिर परिसरातील रस्ते, स्वच्छता, पिण्याचे पाणी, प्रकाशव्यवस्था, पार्किंग तसेच भाविकांसाठी आवश्यक अन्य सुविधांचा नियोजनबद्ध विकास होणे गरजेचे आहे. या मंदिराला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाल्यानंतर शासनाकडून कोणती विकासकामे मंजूर झाली त्यासाठी किती निधी उपलब्ध झाला आणि त्यापैकी किती कामे पूर्ण झाली, याबाबत स्पष्ट माहिती नागरिकांसमोर येणे आवश्यक आहे.मात्र ती माहिती कुणीही द्यायला तयार नाहीत. मंदिर विकासकामांचा प्रस्ताव, मंजूर निधी आणि प्रत्यक्ष झालेली कामे याबाबत संबंधित प्रशासनाने माहिती जाहीर केल्यास या विषयावरील संभ्रम दूर होण्यास मदत होऊ शकते.

प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडून अपेक्षा

खंडेश्वर संस्थानच्या विकासासाठी या भागातील लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन शासनस्तरावर पाठपुरावा करावा अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. विविध प्रसंगी संस्थानला भेट देताना विकासाबाबत फक्त आश्वासने दिली जात असल्याचे नागरिक सांगतात मात्र त्यानंतर प्रत्यक्षात कोणती कामे मार्गी लागली, याबाबत समाधानकारक माहिती उपलब्ध नसल्याची त्यांची तक्रार आहे.

धार्मिक स्थळाचा विकास हा केवळ मंदिरापुरता मर्यादित विषय नसून त्याचा स्थानिक पर्यटन, रोजगार आणि व्यवसायावरही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे उपलब्ध शासकीय योजनांचा प्रभावी वापर करून संस्थान आणि परिसराचा टप्प्याटप्प्याने विकास करण्याची गरज आहे.

लेखाजोखा स्पष्ट करा

श्री खंडेश्वर संस्थानच्या विकासासाठी आतापर्यंत झालेल्या कार्यवाहीचा आढावा घेऊन पुढील कामांसाठी ठोस आराखडा तयार करण्याची मागणी होत आहे.मंजूर निधी, प्रलंबित प्रस्ताव आणि प्रस्तावित विकासकामांची माहिती सार्वजनिक केल्यास नागरिकांनाही विकासाच्या प्रक्रियेची दिशा स्पष्ट होईल.

'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाल्यानंतरही अपेक्षित बदल दिसत नसल्याने या विभागातील लोकप्रतिनिधी विषयी नाराजी व्यक्त होत आहे. आता प्रशासन आणि लोकप्रतिनिधी या विषयाकडे किती गांभीर्याने पाहतात आणि प्रत्यक्ष विकासकामांना कधी सुरुवात होते,याकडे भाविकांसह नांदगाव खंडेश्वरवासीयांचे लक्ष लागले आहे.

बैलजोडी सजावट स्पर्धेत प्रणय सहारे प्रथम; ४२ शेतकरी बांधवांचा सन्मान

चांदूर रेल्वे/वार्ताहर

शिक्षणासोबतच ग्रामीण संस्कृती, परंपरा आणि शेतकरी बांधवांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते जपण्याची परंपरा श्रीमती कमलाबाई ब. टावरी बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नागपूर यांच्या वतीने यंदाही कायम ठेवण्यात आली. स्व. डॉ. बद्रीदास टावरी (बाबुजी) व स्व. गणेशप्रसाद जयस्वाल यांच्या स्मृतीप्रित्यर्थ घुईखेड येथे बैलपोळा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या उत्सवाच्या माध्यमातून टावरी परिवाराने शेतकरी बांधवांच्या आनंदात सहभागी होत त्यांच्या कष्टाचा आणि ग्रामीण संस्कृतीचा सन्मान केला. बैलपोळ्यानिमित्त आयोजित बैलजोडी सजावट स्पर्धेत शेतकरी बांधवांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. स्पर्धेत प्रणय अनिल सहारे यांनी प्रथम क्रमांक पटकावत कृष्णकुमार टावरी यांच्या वतीने देण्यात आलेले ३ हजार ५०१ रूपयाचे प्रथम,द्वितीय ३ हजार रूपयाचे पारितोषिक अरुण जयस्वाल यांच्या वतीने संजय कुकडे यांनी पटकावले. तृतीय क्रमांकाचे २ हजार रूपयाचे पारितोषिक डॉ. हेमंत जाधव यांच्या वतीने बबन खोब्रागडे यांनी तृतीय क्रमांक मिळविला. चतुर्थ क्रमांकाचे एक हजार रूपयाचे पारितोषिक दीपक जयस्वाल यांच्या वतीने अंकुश दानी यांनी हे पारितोषिक पटकावले. तर प्रोत्साहनपर पाचशे रूपयाचे पारितोषिक लक्ष्मण पवार यांच्या वतीने सचिन गवई यांनी ते प्राप्त केले. यावेळी परिसरातील एकूण ४२ बैलजोडी मालक शेतकरी बांधवांचा सन्मान करण्यात आला. प्रत्येक शेतकरी बांधवाला रोख दोनशे रूपये तसेच शेला व टोपी देऊन गौरविण्यात आले.शेतकऱ्यांचा सन्मान, बैलांप्रती कृतज्ञता आणि ग्रामीण संस्कृतीचा उत्सव या त्रिसूत्रीमुळे घुईखेडचा बैलपोळा यंदा विशेष ठरला.

श्रद्धा-भक्तीचा जागर; ऋषीपंचमी उत्सवाचे आयोजन

अमरावती- दरवर्षीप्रमाणे यंदाही ऋषीपंचमी निमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, मंगळवार १५ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता हा भक्तिमय सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून भाविक, नागरिक व आप्तेष्टांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आग्रही निमंत्रण आयोजकांनी दिले आहे.

हा कार्यक्रम न्यू बायपास रोड, मंगलधाम कॉलनी, राधिका नगर येथील विठ्ठल-रुख्मिणी मंदिराजवळ, अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे आयोजन श्रीमती लताताई दिवाकरराव ठाकरे, प्रणव दिवाकर ठाकरे व पूजा प्रणव ठाकरे यांनी केले आहे.

न्यू गोल्डन इंग्लिश हायस्कूलमध्ये घनकचरा व्यवस्थापन कार्यशाळा

अमरावती/का.प्र.

स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत माहिती शिक्षण प्रसार व जनजागृती या उपक्रमाचा एक भाग म्हणून न्यु गोल्डन इंग्लिश हायस्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी घनकचरा व्यवस्थापन विषयक जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना केवळ माहिती देणे नसून प्रत्यक्ष कृतीतून घनकचरा व्यवस्थापनाचे महत्त्व समजावून देणे हा होता. कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांना कचऱ्याचे प्रकार, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, ओला व सुका कचरा वेगळा करणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट, पुनर्वापर व पुनर्चक्रण याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबतची जाणीव अधिक दृढ होऊन आपली शाळा, परिसर व शहर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारी स्वीकारावी याबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले.

सदर कार्यशाळेमध्ये वैशाली गवई यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. शाळेच्या वतीने या उपक्रमासाठी आवश्यक सहकार्य करण्यात आले. शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी कार्यशाळेतून मिळालेली माहिती आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणून 'स्वच्छ शाळा-स्वच्छ परिसर -स्वच्छ शहर' या संकल्पनेला बळ देण्याचा संकल्प केला. सदर कार्यशाळेला मुख्याध्यापिका जयश्री आसलकर,सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

१५ सप्टेंबरला विद्यापिठात व्याख्यान

अमरावती- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या महानुभाव अध्यासन केंद्र आणि सर्वज्ञ सेवा महिला मंडळ, हर्षराज कॉलनी यांच्या संयुक्त विद्यमाने 'श्रीचक्रधरस्वामी अवतार दिनानिमित्य विशेष प्रबोधन व्याख्यानाचे आयोजन मंगळवार १५ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकर मेमोरियल रिसर्च सेंटर सभागृहात करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे भूषविणार असून, सांगोला (जि. सोलापूर) येथील प्रख्यात वक्ते ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज बंडगर हे आपल्या ओघवत्या वाणीने श्रीचक्रधरस्वामींच्या जीवनकार्यावर व विचारांवर विस्तृत प्रबोधन करणार आहे. या प्रसंगी डॉ. व्ही.एम. मेटकर, सुभाषराव पावडे, डॉ. अमोल ठाकरे , डॉ. अण्णा वैद्य उपस्थिती राहणार आहे.

पोळ्यासह तान्हा पोळ्यावरही मंदीचे सावट

पावसाच्या खंडाने ग्रामीण अर्थचक्र विस्कळीत; सणाचा उत्साह मंदावला

आसेगाव पूर्णा/वार्ताहर

गेल्या तीन आठवड्यांपासून पावसाने दडी मारल्याने ग्रामीण जनजीवनासह अर्थचक्रावरही परिणाम झाला आहे. पावसाअभावी खरीप पिकांच्या वाढीची चिंता वाढल्याने शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून, त्याचा परिणाम यंदाच्या पोळा सणावरही दिसून आला. शेतकऱ्यांचा आनंदाचा सण असलेला पोळा अनेक कुटुंबांनी साधेपणाने साजरा केला.

पावसाच्या खंडामुळे उत्पादन खर्च आणि आगामी उत्पन्नाचे गणित बिघडण्याची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. त्यामुळे बैलांची सजावट, झुली, रंगरंगोटी व पूजेच्या साहित्याच्या खरेदीवरही काही प्रमाणात मर्यादा आल्या.

लहान मुलांचा आवडता तान्हा पोळादेखील यंदा मंदीच्या सावटातून सुटला नाही. लाकडी बैल, खेळणी, सजावटीच्या वस्तू व मिठाईच्या खरेदीत अपेक्षित उत्साह दिसून आला नाही.

शेतकऱ्यांच्या खर्चात कपात झाल्याने ग्रामीण बाजारपेठेतील उलाढालीवरही परिणाम जाणवत आहे. छोटे व्यावसायिक, कारागीर व दुकानदारांची मोठ्या प्रमाणात उलाढाल शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर अवलंबून असल्याने पावसाच्या खंडाचा फटका संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेलाच बसत असल्याचे चित्र आहे. पिकांचे भवितव्य आणि आगामी उत्पन्नाची चिंता असल्याने सर्जा-राजाची पूजा करतानाही शेतकऱ्यांच्या मनात आनंदापेक्षा चिंताच अधिक दिसून आली. आता शेतकऱ्यांचे लक्ष आभाळाकडे लागले असून, दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे.

'पावसाने तीन आठवड्यांपासून दडी मारल्याने सोयाबीन, कापूस व इतर पिकांची चिंता वाढली आहे. हातात पैसा नसल्याने पोळा सण नेहमीसारखा उत्साहात साजरा करता आला नाही. पाऊस लवकर झाला नाही तर पुढील परिस्थिती आणखी बिकट होण्याची भीती आहे.

मनोहरराव गवई, शेतकरी

'पोळ्याच्या दिवशी बैलांची पूजा करून सण साजरा केला; मात्र मनात आनंदापेक्षा पिकांची आणि पुढील खर्चाची चिंता आहे. पावसाच्या खंडामुळे शेतकऱ्यांसह गावातील दुकानदार, छोटे व्यावसायिक आणि बाजारपेठेवरही परिणाम झाला आहे.

राजेंद्र नवले, शेतकरी

पी.आर.पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपतर्फे गणेशोत्सव सजावट स्पर्धा

अमरावती/का.प्र.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून पर्यावरणपूरक सजावट, सामाजिक प्रबोधन आणि सर्जनशीलतेला चालना मिळावी, या उद्देशाने पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप, अमरावती तर्फे दरवर्षी प्रमाणे 'भव्य गणेशोत्सव सजावट स्पर्धा २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, व्यावसायिक गणेशोत्सव मंडळ आणि घरगुती गणेशोत्सव अशा तीन विभागांत ही स्पर्धा होणार आहे. स्पर्धेची अधिकृत घोषणा व नियमावलीचे विमोचन ग्रुपचे उपाध्यक्ष श्रेयश पोटे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या मंडळांनी व नागरिकांनी पर्यावरणपूरक तसेच सामाजिक संदेश देणारी सजावट करणे अपेक्षित आहे. सजावटीचे फोटो व व्हिडीओ आयोजकांकडे सादर करण्यासाठी www.prpotepatilengg.ac.in या

संकेतस्थळावर जाऊन 'गणेशोत्सव सजावट स्पर्धा' या आयकॉनवर क्लिक करून गुगल फॉर्मद्वारे माहिती भरावी लागणार आहे.

स्पर्धेचा कालावधी १४ ते २५ सप्टेंबर २०२६ असा आहे. या कालावधीतच स्पर्धकांनी आपल्या गणेशोत्सव सजावटीचे फोटो व व्हिडीओ पाठवायचे आहेत.२६ सप्टेंबरनंतर प्राप्त होणारे साहित्य स्पर्धेसाठी ग्राह्य धरले जाणार नाही, असे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या विभागात प्रथम क्रमांकासाठी ११ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ९ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी ७ हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. याशिवाय सहभागी सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना प्रोत्साहनपर बक्षीस दिले जाणार आहे. व्यावसायिक गणेशोत्सव सजावट स्पर्धेत प्रथम क्रमांकास ३१००/- रुपये, द्वितीय क्रमांकास २१००/- रुपये आणि तृतीय क्रमांकास ११००/-रुपये रोख पारितोषिक मिळणार आहे. घरगुती गणेशोत्सव सजावट स्पर्धेत २१ रोख बक्षिसे व मानचिन्हे देण्यात येणार असून, सहभागी सर्व स्पर्धकांना आयोजकांच्या वतीने ई-प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

गणेशोत्सवातील सजावटीच्या माध्यमातून सामाजिक संदेश आणि पर्यावरण संवर्धनाची भावना अधिक व्यापक व्हावी, यासाठी आयोजित या स्पर्धेत अमरावती जिल्ह्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, व्यावसायिक गणेशोत्सव मंडळे तसेच घरगुती गणेशोत्सव साजरा करणाऱ्या नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपच्या वतीने करण्यात आले आहे.

एनर्जी लिडरशिप परिषदेत अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र यांना 'एनर्जी लिडरशिप अवॉर्ड'

महावितरणला 'ॲडॉप्टिंग एआय इन एनर्जी' पुरस्कार

अमरावती/का.प्र.

ऊर्जा परिवर्तनाची प्रभावी अंमलबजावणी, सौर ऊर्जेद्वारे शेतीला दिवसा वीज तसेच ग्रामीण अर्थकारणाला बळ, गुंतवणूक व रोजगार संधी, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, आर्थिक शिस्त आदींच्या माध्यमातून महावितरणने देशाच्या वीज क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला आहे. या उल्लेखनीय कामगिरीच्या नेतृत्वासाठी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचा 'एनर्जी लिडरशिप अवॉर्ड'ने तसेच वीज मागणीच्या अचूक अंदाजासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावी तंत्रज्ञानासाठी महावितरणचा 'ॲडॉप्टिंग एआय इन एनर्जी अवॉर्ड'ने गुरुवारी गौरव करण्यात आला. भारताच्या वाढत्या ऊर्जा गरजा आणि भविष्यातील दिशा यावर मंथन करण्यासाठी '६ व्या ईटी एनर्जी लीडरशिप समिट २०२६' चे नवी दिल्ली येथे आयोजन करण्यात आले.या परिषदेत सेवानिवृत्त केंद्रीय ऊर्जा सचिव अनिल राजदान यांच्याहस्ते अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. तर महावितरणचा पुरस्कार लोकेश चंद्र यांच्यासह कार्यकारी संचालक भुजंग खंदारे, मुख्य अभियंता संतोष सांगळे, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) भूषण कुलकर्णी यांनी स्वीकारला.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर आणि अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र यांचे तसेच महावितरणच्या सर्व अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

यासोबतच पीएम कुसुम-बी अंतर्गत देशात आजमितीस १७ लाख ४२ हजार सौर कृषिपंप कार्यान्वित झाले आहेत. त्यापैकी एकट्या महाराष्ट्रात तब्बल ६५ टक्के म्हणजे ११ लाख ५४ हजार सौर कृषिपंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. पीएम सूर्यघर योजनेसाठी महावितरणला केंद्र शासनाचे नुकतेच आठ पुरस्कार मिळाले असून राज्यात आतापर्यंत ७ लाख ७७ हजार ५१६ घरांवर २९४७ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहे.

महावितरणने वीज मागणीच्या अचूक अंदाजासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशिन लर्निंग तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर सुरु केला आहे. यासाठी विकसित केलेल्या 'एआय/एमएल-ड्रिव्हन डिमांड फोरकास्टिंग इंजिन' या तंत्रज्ञानाच्या कामगिरीची दखल घेत महावितरणला 'ॲडॉप्टिंग एआय इन एनर्जी अवॉर्ड'ने सन्मानित करण्यात आले. महावितरणने १२ सप्टेंबर २०२४ पासून हे 'एआय'चे स्वयंचलित तंत्रज्ञान पूर्ण क्षमतेने कार्यान्वित केले आहे. या

तंत्रज्ञानामुळे वीज खरेदी खर्च, मागणी-पुरवठ्यातील तफावत, ग्रीड स्थैर्य, थेट आर्थिक नियोजन आदींमध्ये मोठे यश मिळवले आहे आणि आतापर्यंत वीज खरेदीमध्ये तब्बल १२०० कोटी रुपयांची बचत झाली आहे.

CHANGE IN SPOUSE NAME
Passport No:-P2378748
FILE NO:-NG1060679932417
SPOUSE OLD NAME
SUMAIYYA NAAZ ABDUL NISAR
SPOUSE NEW NAME
SUMAIYA NAAZ ABDUL NISAR
Address
AT. POST. PATHROT TQ. ACHALPUR, DIST AMRAVATI-444808

शहरात तब्बल ५९० गणेशमूर्तींची स्थापना

‘गणरायाच्या स्वागताला पोलिसांचा तगडा बंदोबस्त!’

२ हजारांहून अधिक पोलीस रस्त्यावर, सोशल मीडियावरही करडी नजर

अमरावती/प्रतिनिधीः- गणरायाच्या आगमनासाठी अमरावती शहर सज्ज होत असतानाच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अमरावती शहर पोलिसांनीही कंबर कसली आहे. १४ ते २७ सप्टेंबरदरम्यान होणाऱ्या गणेशोत्सवासाठी शहरात तब्बल ५९० गणेशमूर्तींची स्थापना अपेक्षित असून, उत्सवादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी २ हजारांहून अधिक पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि होमगार्ड तैनात राहणार आहेत.

शहरातील गणेश मंडळांना परवानगी देण्यासाठी राबविण्यात आलेल्या ‘एक खिडकी’ योजनेत आतापर्यंत ५६७ मंडळांचे ऑनलाइन अर्ज प्राप्त झाले आहेत. उर्वरित मंडळांनी तातडीने आवश्यक परवानगी घ्यावी. विनापरवानगी गणेशमूर्तीची स्थापना करू नये, असे आवाहन पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी केले आहे.

गणेशोत्सव काळात सोशल मीडियावर सायबर पोलिसांच्या विशेष पथकाची सतत नजर राहणार आहे. गणेशोत्सवाच्या काळात कायदा-सुव्यवस्थेला धोका निर्माण करणाऱ्या सराईत गुन्हेगारांवर पोलिसांची विशेष नजर राहणार आहे. धार्मिक तेढ निर्माण करणारे समाजकंटक तसेच जातीय दंगलीतील आरोपींना ताब्यात घेऊन प्रतिबंधात्मक कारवाई करण्याच्या सूचना पोलीस आयुक्तांनी सर्व पोलीस ठाणे प्रभाऱ्यांना दिल्या आहेत.

मिरवणूक मार्ग, गर्दीची ठिकाणे तसेच संवेदनशील भागांमध्ये सीसीटीव्ही आणि व्हिडीओग्राफरच्या माध्यमातून निगराणी केली जाणार आहे. गणेश स्थापना व विसर्जन मिरवणुकीत ज्वलनशील पदार्थ, शस्त्रे, काठ्या बाळगण्यास तसेच आक्षेपार्ह गाणी व देखावे सादर करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

चौका-चौकांत☞(पान २ वर)

‘शांततेत उत्सव साजरा करा’

‘अमरावतीकरांनी यापूर्वी जातीय सलोखा आणि सामाजिक एकोपा कायम ठेवून पोलिसांना सहकार्य केले आहे. आगामी गणेशोत्सव व अन्य धार्मिक सणही शांततेत आणि उत्साहात पार पाडण्यासाठी नागरिकांनी असेच सहकार्य करावे,’ असे आवाहन पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी केले.

मोझरी बायपासवर अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक; तरुण ठार

पुण्याची नोकरी सोडून नागपूरला निघाला होता उत्कर्ष

तिवसा/प्रतिनिधीः- पुण्याची नोकरी सोडून नागपूरला परतणाऱ्या २३ वर्षीय युवकाचा राष्ट्रीय महामार्गावरील मोझरी बायपासवर झालेल्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला.

शनिवारी (१२ सप्टेंबर) सकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास अज्ञात वाहनाने दुचाकीला दिलेल्या धडकेत हा अपघात झाला. उत्कर्ष संदीप मेश्राम (वय २३, रा. नागपूर) असे मृत युवकाचे नाव आहे. उत्कर्ष हे पुणे येथील एका खासगी कंपनीत नोकरी करीत होते. त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेची तयारीही सुरू होती. नोकरीचा राजीनामा दिल्यानंतर ते दुचाकी क्रमांक एमएच-४९ बीएक्स-४६३६ने पुण्याहून नागपूरकडे निघाले होते. अमरावतीमार्गे नागपूरकडे जात असताना मोझरी बायपासवर त्यांच्या दुचाकीला भरधाव अज्ञात वाहनाने धडक दिली.

धडक एवढी जोरदार होती की उत्कर्ष दुचाकीसह रस्त्यावर कोसळले. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने घटनास्थळीच त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर धडक देणारे वाहन घटनास्थळावरून पसार झाले.

अपघाताची माहिती मिळताच तिवसा पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह तिवसा उपजिल्हा रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला.

अज्ञात वाहनाचा शोध सुरू

दरम्यान, अपघातानंतर वाहनचालक पसार झाल्याने पोलिसांसमोर अज्ञात वाहनाचा शोध घेण्याचे आव्हान उभे ठाकले आहे. अपघाताच्या परिसरातील उपलब्ध माहितीच्या आधारे वाहनाचा माग काढण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहेत.

तडीपार गुन्हेगाराकडून पिस्टल जप्त

-सायन्सकोअर मैदानातून दोघे ताब्यात -चाकूसह २५ हजारांचे पिस्टल हस्तगत

अमरावती/प्रतिनिधीः- सणासुदीच्या पार्श्वभूमीवर अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध कारवाईसाठी गस्त घालत असलेल्या गुन्हे शाखेच्या पथकाने सायन्सकोअर मैदान परिसरातून दोन तरुणांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून पिस्टल व चाकू असा सुमारे २५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यातील एक जण रेकॉर्डवरील तडीपार गुन्हेगार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

११ सप्टेंबर रोजी गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी शहरात पेट्रोलिंग करीत असताना सायन्सकोअर मैदान परिसरात तडीपार गुन्हेगार अवैध अग्निशस्त्र घेऊन फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहितीची खात्री करून पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत दोघांना घेराव घालून ताब्यात घेतले. त्यांची अंगझडती घेतली असता कमरेच्या पाठीमागील बाजूस पॅन्टमध्ये लपवून ठेवलेले एक पिस्टल व एक चाकू आढळून आला. पोलिसांनी दोन्ही शस्त्रे जप्त केली. जप्त मुद्देमालासह आरोपींना पुढील कारवाईसाठा☞(पान २ वर)

बोडणा वळणावर अनियंत्रित स्कूल बस झाडावर आदळली

२५ विद्यार्थ्यांपैकी काहींना किरकोळ दुखापत

अमरावती/प्रतिनिधीः- भरधाव वेगातील स्कूल बस अचानक नियंत्रणाबाहेर गेली आणि रस्त्यालगतच्या झाडावर जाऊन आदळली. सुदैवाने झाडाला बसलेली धडक मोठ्या दुर्घटनेत रूपांतरित झाली नाही. बसमधील सुमारे २५ विद्यार्थ्यांपैकी काहींना किरकोळ दुखापत झाली. ही घटना शुक्रवारी सकाळी चांदूर रेल्वे मार्गावरील बोडणा गावाजवळ घडली.

चांदूर रेल्वे रोडवरील एक्सल इंटरनॅशनल पब्लिक स्कूलची एमएच-२७/ए-९८५२ क्रमांकाची बस विद्यार्थ्यांना घेऊन शाळेकडे जात होती. तपोवनेश्वर मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावरील वळणावर अचानक बस अनियंत्रित झाली. चालकाने नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला; मात्र बस थेट रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जाऊन आदळली. अपघातानंतर बसमधील विद्यार्थ्यांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. जखमी विद्यार्थ्यांना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे सांगण्यात आले आहे.

अपघाताच्या पार्श्वभूमीवर बसच्या चालकाबाबतही चर्चा सुरू झाली आहे. या मार्गावर नियमितपणे बस चालविणारा चालक रजेवर असल्याने त्याच्या जागी दुसऱ्या मार्गावरील चालकाची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती आहे. संबंधित चालकाला बोडणा परिसरातील वळणांची पुरेशी माहिती होती का, याचीही चौकशी होण्याची शक्यता आहे. मात्र, अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांनी घटनास्थळी ☞(पान २ वर)

अवैध धंद्यांवर ग्रामीण पोलिसांची कारवाई

६४ दारू प्रकरणे; ३.०९ लाखांचा मुद्देमाल जप्त

अमरावती/प्रतिनिधीः- सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील अवैध दारूविक्री आणि जुगाराच्या अड्ड्यांवर ग्रामीण पोलिसांनी कारवाईचा सपाटा लावला आहे. ११ सप्टेंबर रोजी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत तब्बल ६४ दारूविक्रीचे गुन्हे दाखल करून ६७ जणांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईत ८८२ देशी दारूच्या पावट्या, १० लिटर गावठी दारू व अन्य साहित्य असा एकूण ३ लाख ९ हजार ९३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशाने ‘ऑपरेशन कवच’ अंतर्गत जिल्हाभर ही मोहीम राबविण्यात आली. सणांच्या काळात अवैध दारूविक्री आणि जुगारामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी ठाणेनिहाय कारवाई करण्यात आली. दारूविक्रीसोबतच धारणी, परतवाडा आणि चांदूर बाजार परिसरातील जुगार अड्ड्यांवरही पोलिसांनी कारवाई केली. धारणी पोलिसांनी चार ठिकाणी वरली-मटका जुगारावर कारवाई करत प्रसन्न ऊर्फ बॉबी सुरेंद्र नाथ, सईद खान अहमद खान, सुधीर साबुलाल बेठेककर आणि किशोर हिरा चिलाटे यांच्यावर कारवाई केली. त्यांच्याकडून १ हजार ६६० रुपयांचे साहित्य जप्त करण्यात आले. परतवाडा पोलिसांनी धीरज सुरटे, अनिल अढाऊ, मिलिंद मोहितीरे, बबलू शहारे आणि सूर्यनारायण किराये यांच्यावर कारवाई करून ७ हजार ८९० रुपयांचे साहित्य जप्त केले. चांदूर बाजार पोलिसांनी शिरजगाव बंड येथे कारवाई करत मिलिंद मोहोड, अमोल मोहोड, आशिष वाकोडे, शेख जाफर आणि राजू तायवाडे यांच्यावर कारवाई केली. त्यांच्या ताब्यातून जुगार व अन्य साहित्य असा ४८ हजार ७३० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक दत्ता ☞(पान २ वर)

घरफोडीतील सोने वितळवून केला गोळा; चौघांना अटक

सोनोरा-भिलटेकमधील घरफोडीचा पर्दाफाश -पुण्यातून मुख्य आरोपीला ताब्यात घेत चौघांना अटक

अमरावती/प्रतिनिधीः- चांदूर रेल्वे तालुक्यातील सोनोरा भिलटेक येथे घरात वृद्ध महिला एकटी असताना भिंतीवरून प्रवेश करून सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपीला पुण्यातील भोसरी एमआयडीसी परिसरातून ताब्यात घेण्यात आले, तर त्याच्या तीन साथीदारांनाही चांदूर रेल्वे येथून अटक करण्यात आली. आरोपींकडून ८.९४० ग्रॅम वजनाचा सोन्याचा गोळा आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा एकूण १ लाख ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सोनोरा भिलटेक येथील फिर्यादी आशिष संजय कावरे यांच्या घरी ४ ते ६ मार्चदरम्यान ही घरफोडी झाली होती. घरात त्यांची आजी एकटी असल्याची संधी साधून तीन अज्ञात इसमांनी घराच्या मागील भिंतीवरून प्रवेश केला. त्यानंतर कपाटातील सोन्याचे दागिने चोरून आरोपी पसार झाले होते.

याप्रकरणी चांदूर रेल्वे पोलिस ठाण्यात कलम ३०५ (अ), ३३१ (४) बीएनएसनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेकडून समांतर तपास सुरू असताना तांत्रिक माहिती, गोपनीय बातमीदारांकडून मिळालेली माहिती आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे आरोपींची ओळख पटविण्यात आली. त्यानुसार आरोपी चेतन नरेंद्र चव्हाण (२५) याचा शोध घेऊन त्याला भोसरी एमआयडीसी, पिंपरी-चिंचवड, पुणे येथून ताब्यात घेण्यात आले. चौकशीत चेतन याने साथीदारांच्या मदतीने घरफोडी केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर प्रतीक राजेंद्र बागडे (२३), शेख नदीम शेख नबी (२४) आणि रोहित रवी इमले (२५) यांनाही चांदूर रेल्वे येथून ताब्यात घेण्यात आले. चोरी केलेले सोने आरोपी रोहित इमले याने सोनाराकडे विक्री करण्याचा प्रयत्न केला. मात्र, विना पावतीचे सोने स्वीकारण्यास सोनाराने☞(पान २ वर)

रेल्वे फाटकावर अडकली रुग्णवाहिका

भातकुली अंडरब्रिजचे काम तात्काळ पूर्ण करण्याची मागणी

अमरावती/प्रतिनिधीः- भातकुली रोडवरील रेल्वे फाटकावर गंभीर रुग्णाला घेऊन जाणारी रुग्णवाहिका तब्बल १० ते १५ मिनिटे अडकून पडल्याची धक्कादायक घटना दुपारी घडली. या घटनेमुळे रुग्णाच्या जीवावर बेतण्याची वेळ आली असून, प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

माहितीनुसार, एक रुग्णवाहिका गंभीर रुग्णाला घेऊन अमरावतीच्या दिशेने येत होती. त्याच वेळी भातकुली रोडवरील रेल्वे फाटकावरून ट्रेन जाणार असल्याने फाटक बंद करण्यात आले. ट्रेन जाण्याच्या प्रतीक्षेत रुग्णवाहिकेला १० ते १५ मिनिटे फाटकावरच थांबावे लागले. आपत्कालीन परिस्थितीत काही मिनिटे देखील रुग्णासाठी अत्यंत महत्त्वाचे असतात, अशा वेळी रुग्णवाहिका अडकल्याने चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.या घटनेला प्रहार संघटनेचे रोशन देशमुख यांनी विरोध केला आणि लवकरात लवकर

ओवरब्रिजचे काम पूर्ण करण्याची मागणी केली आहे.भातकुली रोडवरील अंडरब्रिजचे बांधकाम गेल्या ३ ते ४ वर्षांपासून सुरू आहे. एकीकडे अंडरब्रिजचे काम अपूर्ण आहे आणि दुसरीकडे महत्त्वाच्या मार्गावर रेल्वे फाटक असल्याने नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः आपत्कालीन परिस्थितीत ही समस्या अधिक गंभीर रूप धारण करू शकते.आजची घटना ही प्रशासनासाठी एक चेतावणी आहे. भविष्यात☞(पान २ वर)

त्या वाघिणीचा मृत्यू हृदय आणि श्वासोच्छवास बंद पडल्याने

शवविच्छेदन अहवालातून सत्य आले समोर

अमरावती/प्रतिनिधीः- चार नागरिकांचा बळी घेणाऱ्या आणि वनविभागाच्या पथकाने जेरबंद केलेल्या नरभक्षक वाघिणीचा मृत्यू नेमका कसा झाला यावरून सुरू असलेल्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे. वाघिणीचा मृत्यू हा हृदय आणि श्वासोच्छवास बंद पडल्यामुळेच झाल्याचे शवविच्छेदन अहवालात स्पष्ट झाले आहे. वनविभागाने या शवविच्छेदन अहवालातील महत्त्वाचे निष्कर्ष प्रसिद्धी पत्रकाद्वारे शुक्रवारी अधिकृतपणे जाहीर केले आहेत. मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत परतवाडा येथील ट्रॅन्सिट ट्रीटमेंट सेंटर मध्ये तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीने या वाघिणीचे शवविच्छेदन केले. या अहवालानुसार, वाघिणीचा मृत्यू अचानक हृदय व श्वासोच्छवास बंद पडल्याने झाला.

याशिवाय, वाघिणीच्या डोक्याच्या मागील भागावर मार लागल्याची खूण आढळली असून, तिच्या मेंदूत रक्तस्राव आणि सूज निर्माण झाली होती. तसेच तिच्या पोटात पट्टकृमींचा अत्यंत गंभीर प्रादुर्भाव होता आणि शरीरावर मोठ्या प्रमाणात गोचड्या आढळून आल्या होत्या, ज्यामुळे ती आधीच आजारी व अशक्त असावी.

वाघिणीच्या मृत्यूचे वैद्यकीय व अचूक सूक्ष्म वैज्ञानिक कारण शोधण्यासाठी तिचे विविध अवयव आणि जैविक नमुने देशातील नामांकित प्रयोगशाळांमध्ये पाठवण्यात आले आहेत.नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय हिस्टोपॅथॉलॉजिकल चाचणी साठी, डब्ल्यूआरटीसी, गोरेवाडा मॉलिक्युलर चाचणीसाठी फॉरेन्सिक सायन्स लॅब, अमरावती विषशास्त्र चाचणीसाठी पाठविण्यात आले आहे. नरभक्षक वाघिणीने वर्धा व अमरावती जिल्ह्यात मोर्शी आणि चांदूरबाजार तालुक्यात प्रचंड धुमाकूळ घालत ४ नागरिकांचा बळी घेतला होता, तर अनेक पशुधनावर हल्ले केले होते. त्यामुळे तिला पकडण्यासाठी मोठे रेस्क्यू ऑपरेशन राबवून ७ सप्टेंबर रोजी शिरजगाव परिसरातून जेरबंद करण्यात आले होते. मात्र, जेरबंद केल्यानंतर नागपूरच्या गोरेवाडा केंद्रात हलवत असताना मोर्शीजवळ तिला अचानक श्वास घेण्यास त्रास होऊ ☞(पान २ वर)

चिखलदऱ्यात ५.५० लाख पर्यटक

पर्यटकांचा ओघ; पोलिसांचा चोख बंदोबस्त

८२ किमी मार्गावर नजर, ड्रोन अन् दामिनी पथकही तैनात

अमरावती/प्रतिनिधीः- जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ चिखलदरा येथे पावसाळी पर्यटनासाठी पर्यटकांचा मोठा ओघ सुरू असून, १ जुलैपासून आतापर्यंत तब्बल ५ लाख ५० हजार पर्यटकांनी चिखलदऱ्याला भेट दिल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. पर्यटकांची वाढती गर्दी, वाहतूक कोंडी आणि सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेता अमरावती ग्रामीण पोलिसांकडून चिखलदरा व परिसरात विशेष बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, या कालावधीत चिखलदऱ्यात सुमारे ६० हजार कार, क्रूझर, मिनीबस व ट्रॅव्हल्स तसेच सुमारे २५ हजार दुचाकी दाखल झाल्या आहेत. पर्यटकांचा ओघ अद्याप कायम असल्याने पोलिसांनी वाहतूक व्यवस्थेसह सुरक्षेवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. परतवाडा ते चिखलदरा तसेच चिखलदरा-घटांगमार्गे परतवाडा या सुमारे ८२ किलोमीटरच्या मार्गावर ठिकठिकाणी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी पोलिसांची गस्त वाढविण्यात आली असून, कोंडी झाल्यास ती तातडीने दूर करण्यासाठी १४ मोटारसायकलींवर २८ पोलिस अंमलदारांची स्वतंत्र गस्त ठेवण्यात आली आहे.

पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या चालकांची तपासणीही सुरू आहे. विशेषतः चिखलदऱ्याकडे जाणाऱ्या आणि परतणाऱ्या मार्गावर वाहनचालकांवर पोलिसांकडून☞(पान २ वर)

८ दिवसापूर्वी विवाह जुळलेल्या तरुणाचा मृत्यू

तिवसा/प्रतिनिधीः- आठ दिवसापूर्वी विवाह जुळलेल्या तरुणाच्या आकस्मिक मृत्यूने एकच खळबळ उडाली आहे. अंकुश महादेव लावरे (वय ३२, तळेगाव ठाकूर) असे मृत तरुणाचे नाव आहे. माहितीनुसार नागपूर महानगरपालिकेत वाहनचालक म्हणून कार्यरत असलेल्या अंकुश महादेव लावरे यांचा एका आठवड्या पूर्वीच विवाह निश्चित झाला होता. मात्र पोळ्याच्या रात्री अचानक हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मावळल्याची अत्यंत दुःखद घटना घडली आहे.

पोळ्यानिमित्त अंकुश हे सावंगा कच्यारी येथे आपल्या आत्याकडे गेले होते. ११ सप्टेंबर रोजी पहाटे अचानक त्यांच्या छातीत दुखू लागले. त्यानंतर रात्री सुमारे ९ वाजताच्या सुमारास हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांचे निधन झाले.

लग्न ठरल्याच्या आनंदात असलेल्या कुटुंबावर अचानक काळाने घाला ☞(पान २ वर)

गणेशोत्सवापूर्वी गुन्हेगारांना शहरबंदी

१७४ जण उत्सवकाळासाठी तडीपार, ३२ जण दोन वर्ष हद्दपार

अमरावती/प्रतिनिधीः- गणेशोत्सवाच्या काळात शहरातील शांतता भंग करणाऱ्या संभाव्य उपद्रवी घटकांवर पोलिसांनी आधीच लगाम कसला आहे. परिमंडळ-१ मधील सहा पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील २०६ जणांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून, यातील १७४ जणांना गणेशोत्सवाच्या संपूर्ण कालावधीसाठी तर ३२ जणांना तब्बल दोन वर्षांसाठी अमरावती शहर व जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. १४ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला सुरुवात होत असून २५ ते २८ सप्टेंबरदरम्यान गणेशमूर्तींचे विसर्जन होणार आहे. या काळात

मोठ्या प्रमाणावर होणारी गर्दी, मिरवणुका आणि संवेदनशील ठिकाणांची परिस्थिती लक्षात घेता पोलिसांनी सराईत तसेच उपद्रवी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाईला प्राधान्य दिले आहे.

सहा ठाण्यांतील व्यक्तींवर कारवाई- गाडगेनगर, नागपुरी गेट, वलगाव, फ्रेजरपुरा, नांदगाव पेठ आणि बडनेरा या सहा पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील संबंधित व्यक्तींवर ही कारवाई करण्यात आली. गंभीर स्वरूपाचे गुन्हे, जुन्या वादातून निर्माण होणारा तणाव तसेच जातीय तेढ निर्माण होण्याची शक्यता असलेल्या प्रकरणांचा विचार करून कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईसाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १६३(२) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील संबंधित तरतुदींचा आधार घेण्यात आला आहे.

प्रतिबंधित क्षेत्रात दिसल्यास कारवाई- तडीपार करण्यात आलेल्या व्यक्तींना आदेशातील कालावधीत ☞(पान २ वर)

अजय देवगणचा बहुप्रतिक्षित दृश्यम

या चित्रपटाचा अधिकृत ट्रेलर बुधवारी प्रदर्शित करण्यात आला आहे. हा चित्रपट येत्या २ ऑक्टोबर रोजी देशभरात प्रदर्शित होणार आहे.

२ मिनिटे ५२ सेकंदांचा हा ट्रेलरमध्ये पुन्हा एकदा विजय साळगावकर अडचणीत येताना दिसतोय. यावेळी त्याच्या विरोधात नवीन पुरावे पोलिसांना सापडले आहेत. त्यामुळे आपल्या कुटुंबाचे कित्येक वर्षांचे गुपित लपवून ठेवण्यासाठी तो पुन्हा एकदा धडपडताना ट्रेलरमध्ये दिसत आहे. तसेच आतापर्यंत त्याला आयजी मीरा देशमुखसोबत लढावे लागत होते मात्र यंदा यात आणखी दोन दुश्मनांची भर पडली आहे. या तिर्स ?या भागात जयदीप अहलावत आणि ज्येष्ठ अभिनेते प्रकाश राज यांची एन्ट्री झाली असून, यामुळे विजयविरुद्धच्या तपासाला अधिक धार आल्याचे दिसते.

या वेळी विजय साळगावकरसमोर आधीपेक्षा कितीतरी मोठे संकट उभे ठाकल्याचे ट्रेलरवरून स्पष्ट होते. सुरुवातीला केवळ बुद्धीची लढाई वाटणारा हा खेळ आता विजय आणि पोलिसांमधील जगण्या-मरण्याच्या संघर्षात बदलला आहे. स्वतः विजयही पोलिसांकडे ठोस पुरावे असल्याचे मान्य करतो. क्राइम ब्रँचचे एसपी म्हणून जयदीप अहलावत या प्रकरणाचा तपास करत असून, ते विजयची रणनीती आणि बुद्धिमत्ता चांगल्या प्रकारे ओळखून आहेत.ट्रेलरमध्ये विजयचा उल्लेख 'गोव्याचा सर्वात कष्टाळू गुन्हेगार' असा करण्यात आला आहे. त्यामुळे आतापर्यंत पोलिसांना चकवण्यात यशस्वी ठरलेल्या विजयचे जुने प्लॅन्स नव्या संकटांसमोर तग धरू शकणार का, याची उत्सुकता प्रेक्षकांमध्ये ताणली गेली आहे.

५० किलोमीटर धावणे, चहा-कॉफी नाही अबब...

बॉलीवूडचा 'खिलाडी' अक्षय कुमार त्याच्या कडक शिस्तबद्ध दिनचर्येसाठी आणि फिटनेससाठी ओळखला जातो. 'द कपिल शर्मा शो'मध्ये रितेश देशमुख आणि अक्षयबरोबर आलेल्या अभिषेक बच्चनने अक्षयच्या सेटवरील अनोख्या 'पार्टी'बद्दल सांगून सगळ्यांना हसवले होते. 'अक्षय ८ तासांपेक्षा जास्त काम करत नाही. काम संपल्यावर ५० किमी दूर हॉटेलवर चालत जायला सांगतो आणि जेवणात फक्त उकडलेले गाजर, अंडी आणि पालक खातो,' असा मजेशीर किस्सा अभिषेक बच्चनने शेअर केला.'द कपिल शर्मा शो'मध्ये अक्षय कुमार आणि रितेश देशमुख यांच्याबरोबर 'हाऊसफुल्ल' चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान अभिषेकने हा किस्सा सांगितला होता. कपिल शर्माने अभिषेकला विचारलेलं की, शूटिंगदरम्यान ते अक्षयबरोबर कधी पार्टी करतात का? त्यावर अक्षय हा पार्टीसाठी रात्री उशिरापर्यंत जागणारा माणूस नाही, असं उत्तर अभिषेक बच्चनने दिलं होतं.

अक्षय सेटवर एका कडक नियम पाळतो. तो त्याचे काम आठ तासांच्या आत पूर्ण करतो आणि त्यानंतर त्याच्या फिटनेस रुटीनकडे वळतो, असं अभिषेकने सांगितलं होतं. 'अक्षय कुमारकडे पाहा, असं वाटतं जणून गेली ५-६ वर्षे तो जेवलाच नाहीये. तो कॉफी, चहा किंवा कोल्ड ड्रिंक्स पीत नाही. तो गोड पदार्थही खात नाही. अक्षयबरोबर पार्टी करणं हा वेगळाच प्रकार असतो. शूटिंग संपणं हा अक्षयचा सर्वात आवडता क्षण असतो. तो ८ तासांपेक्षा जास्त वेळ काम करत नाही. सकाळी ७ वाजता सेटवर आल्यापासून पुढील ८ तासांत तो सगळी कामे उरकतो. काम संपल्यानंतरच्या पार्टीसाठी तो तुम्हाला सायकल चालवत किंवा चालत हॉटेलवर जाण्यास सांगतो,' असं अभिषेक बच्चन म्हणाला.

अक्षय कुमार ५० किलोमीटर चालायला सांगतो - अभिषेक बच्चन

'शूटिंग संपल्यानंतर हॉटेल जर ५० किलोमीटर दूर असेल, तरीही तो आम्हाला तिथे चालत जायला सांगतो. यातून त्याला सर्वाधिक आनंद मिळतो. तो अगदी सहज पोहोचायचा, पण मी आणि रितेश मधेच थांबून टॅक्सी करायचो. तिथे पोहोचल्यावर तो आम्हाला ५० लॅप्स



स्विमिंग करायला सांगायचा. रितेश १० लॅप्सनंतर थकून जायचा, मग मी त्याला मदत करायचो आणि मीही थकायचो, शेवटी ट्रेनरलाच आमची मदत करावी लागायची. या सगळ्यानंतर जेवणाच्या वेळी मी आणि रितेश बटर चिकनचा विचार करायचो. पण अक्षय मात्र उकडलेले गाजर, पालक आणि अंडी खायचा. पोळी किंवा भातही नाही. मग तो म्हणायचा की उद्या सकाळी आपण चालत सेटवर जाऊ. ही त्याची पार्टी असते,' असं अभिषेक बच्चन म्हणाला.

अक्षयबरोबर एक दिवस घालवल्यावर तुम्ही इतके थकता की रात्री ९ वाजता झोपण्याशिवाय दुसरा पर्यायच नसतो, असं अभिषेकने सांगितलं.

दरम्यान, अक्षय कुमार दिवसातील ८ तास काम करतो आणि रात्री ९ वाजता झोपतो. 'संध्याकाळी जेवणं खूप महत्त्वाचं आहे. जेव्हा आपण रात्री झोपतो, तेव्हा आपले डोळे, पाय, हातड्डशरीराचा प्रत्येक भाग विश्रांती घेत असतो. पण ज्याची विश्रांती होत नाही ते म्हणजे आपला पोट, कारण आपण उशिरा जेवलेलो असतो. त्यामुळे लवकर जेवल्याने जेवण व्यवस्थित पचतं आणि पोटाला पुरेसा आराम मिळतो,' असं अक्षय कुमार सांगतो.

सलमान खान-नयनताराच्या आगामी चित्रपट

सलमान खान आणि नयनतारा यांच्या आगामी चित्रपटाची सर्वांना उत्सुकता आहे. या चित्रपटात सध्या गाजत असलेला 'हनुमान अंश' फेम सिलमान खान आणि नयनतारा यांच्या आगामी चित्रपटाची सर्वांना उत्सुकता आहे.

काहीच दिवसांपूर्वी या चित्रपटाची घोषणा करण्यात आली होती. सलमान खान-नयनतारा यानिमित्ताने पहिल्यांदाच एकत्र काम करणार आहेत.

या चित्रपटात सध्या गाजत असलेला 'हनुमान अंश' फेम चित्रपटातील अभिनेता चंदन आनंद झळकणार आहे. गेल्या काही दिवसांपासून सलमान खानच्या या चित्रपटाच्या नावाबद्दल उलटसुलट चर्चा रंगल्या होत्या. आता चंदनने याविषयी खुलासा केला आहे.

सलमान खानने या वर्षी मार्चमध्ये सोशल मीडियावर या चित्रपटाची घोषणा केली होती. एका रिपोर्टमध्ये चित्रपटाचं नाव 'द मेसेंजर्स' असल्याचं सांगितलं गेलं, तर नुकत्याच आलेल्या दुसऱ्या रिपोर्टनुसार या चित्रपटाचे नाव 'मॉन्स्टर' असणार आहे, असं बोललं गेलं.

त्यामुळे नक्की या चित्रपटाचं नाव काय, असा प्रश्न सर्वांना पडला आहे. आता स्वतः चंदनने या चित्रपटाचं नाव 'मॉन्स्टर' आहे असं सांगितलं आहे..चंदन नुकताच 'हनुमान अंश' चित्रपटात दिसला होता.

'गुजरात काय पाकिस्तानात आहे का?



राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार हा भारतीय सिनेसृष्टीतील अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार मानला जातो. १९५४ पासून सुरू झालेल्या या पुरस्कारांचा ७२वा सोहळा यंदा राजधानी दिल्लीऐवजी गुजरात मधील केवडिया येथे आया`जित करण्यात येणार आहे. येत्या २२ सप्टेंबरला हा भव्य पुरस्कार सोहळा पार पडणार आहे. मात्र, पुरस्कार सोहळ्याचं ठिकाण बदलल्याने यावर काही प्रश्नही उपस्थित केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर अभिनेते परेश रावल यांनी गुजरातमध्ये राष्ट्रीय पुरस्कार सोहळा आयोजित करण्याच्या निर्णयाचं समर्थन केलं आहे.

अछखशी बोलताना परेश रावल म्हणाले, 'गुजरात बांगलादेश किंवा पाकिस्तानमध्ये आहे का?

गुजरातही आपल्या देशाचाच एक भाग आहे.

मग असे कार्यक्रम गुजरातमध्ये का होऊ नयेत? गुजरातमध्येही अशा राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमांचं आयोजन व्हायला हवं. एवढंच नाही तर देशातील प्रत्येक राज्यात अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले गेले पाहिजेत. त्यात काहीही चुकीचं नाही'.

७२व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये अनेक दिग्गज कलाकार आणि सिनेमांचा गौरव करण्यात येणार आहे.

'आर्टिकल ३७०'ला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या चित्रपटातील अभिनयासाठी यामी गौतमला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला आहे.

एके दिवशी संपूर्ण चित्रपटच....

आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता वापर सध्या जगभरातील चित्रपट निर्मितीची समीकरणे बदलत असताना, बॉलिवूडचे आघाडीचे दिग्दर्शक राजकुमार हिरानी यांनी यावर महत्त्वाचे भाष्य केले आहे. 'भविष्यात असा एक दिवस नक्की येईल, जेव्हा संपूर्ण चित्रपट केवळ एआय तंत्रज्ञानाच्या मदतीनेच तयार केला जाईल,' असे राजकुमार हिरानी म्हणाले आहेत. मात्र तंत्रज्ञान कितीही पुढे गेले तरी मानवी भावना आणि प्रत्यक्ष कथा सांगण्याची कला यांची जागा कोणतीही यंत्रणा घेऊ शकत नाही, असेही ते म्हणाले.

मनोरंजन

क्षेत्रातील तंत्रज्ञानाच्या प्रभावावर बोलताना हिरानी म्हणाले की, चित्रपटसृष्टी सध्या एका मोठ्या तांत्रिक संक्रमणातून जात आहे. स्क्रिप्ट रायटिंग, व्हिज्युअल इफेक्ट्स, एडिटिंग ते संगीतापर्यंत आज सर्वच टप्प्यांवर एआयचा प्रभावी वापर सुरू झाला आहे. येत्या काळात हे तंत्रज्ञान इतके प्रगत होईल की, स्वतंत्रपणे संगणकावर संपूर्ण चित्रपटाची निर्मिती करणे सहज शक्य होईल. यामुळे नव्या पिढीतील तंत्रज्ञांना आणि लेखकांना मर्यादित बजेटमध्ये आपली कल्पकता मोठ्या पडद्यावर मांडण्याची अभूतपूर्व संधी मिळणार आहे.

तंत्रज्ञानाच्या या वेगाचे स्वागत करतानाच त्यांनी त्याच्या मर्यादांवरही बोट ठेवले. हिरानी म्हणाले, एआय हा केवळ एक अत्याधुनिक टूल म्हणून काम करू शकतो. चित्रपटाचा खरा आत्मा हा मानवी अनुभव, संवेदनशील विचार, अंतःप्रेरणा आणि भावनांशी जोडलेला असतो.

एखादी कथा प्रेक्षकांच्या थेट काळजाला भिडवण्यासाठी दिग्दर्शकाची मूळ दृष्टी आणि मानवी दृष्टिकोनच अंतिम ठरतो. ते काम कोणतेही अल्गोरिदम स्वतःहून करू शकत नाही.

लाईम ग्रीन सिल्क साडीत मृणाल ठाकूरचा रॉयल लूक

अभिनेत्री मृणाल ठाकूरने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून शेअर केलेल्या ताज्या फोटोंमध्ये तिचा अत्यंत आकर्षक, पारंपारिक आणि ट्रेंडी एथनिक लूक पाहायला मिळत आहे. या फोटोंमध्ये तिने लाईम ग्रीन शेडमधील सिल्क साडी नेसली असून त्यावर बारीक बुटीचे नक्षीकाम आहे.

या साडीवर तिने मॅचिंग एम्ब्रॉयडरी अनब कटवर्क डिझाईन असलेला स्लीव्हलेस व्ही-नेक ब्लाउज परिधान करून लूकला मॉडर्न टच दिला आहे.

या एथनिक लूकची शोभा वाढवण्यासाठी तिने हेवी ट्रेडिशनल मीनाकारी स्टेटमेन्ट झुमके आणि त्याला मॅचिंग असे रॉयल ब्लू मीनाकारी वर्क व मोत्यांची किनार असलेले ब्रॉड कडे घातले आहे. चेहाऱ्याभोवती काही लटा मोकळ्या सोडून मागे बांधलेला सॉफ्ट मेसी बन, मिनिमल न्यूड मेक-अप, सॉफ्ट ब्राऊन आयशॅडो, न्यूड पिंक लिपस्टिक आणि कपाळावर लावलेली छोटीशी नाजूक टिकली तिच्या या सौंदर्यात अधिकच भर घालत आहे.

हनुमान अंश ची बॉक्स ऑफिसवर धूम

बॉक्स ऑफिसवर सध्या 'हनुमान अंश' या चित्रपटा ची जोरदार चर्चा सुरू आहे. अत्यंत कमी बजेटमध्ये तयार झालेल्या या चित्रपटाने प्रदर्शनाच्या चौथ्या आठवड्यातही दमदार कमाई करत अनेक मोठ्या चित्रपटांना मागे टाकले आहे. विशेष म्हणजे चौथ्या आठवड्यात सर्वाधिक कमाई करणार्‍?या बॉलिवूड चित्रपटांच्या यादीत 'हनुमान अंश'ने 'धुरंधर २'लाही मागे टाकत दुसरे स्थान मिळवले आहे.

नीम करोली बाबा यांच्या जीवनावर आधारित असल्याचे सांगितल्या जार्णा ?या 'हनुमान अंश'ने प्रदर्शनाच्या २८ व्या दिवशी म्हणजेच चौथ्या गुरुवारी तब्बल ११ कोटी रुपयांची कमाई केल्याचे सॅकनिल्कच्या आकडेवारीत नमूद करण्यात आले आहे. २७ व्या दिवशी चित्रपटाने ७.७५ कोटी रुपयांची कमाई केली होती. त्याच्या तुलनेत २८ व्या दिवशी चित्रपटाच्या कमाईत तब्बल ४१.९४ टक्क्यांची वाढ झाली.

'हनुमान अंश'ने चौथ्या आठवड्यात तब्बल ६१ कोटी रुपयांची नेट कमाई केली. तिसऱ्या आठवड्यातील १०.४ कोटी रुपयांच्या कमाईच्या तुलनेत चौथ्या आठवड्यात चित्रपटाच्या कमाईत तब्बल ८६.५४ टक्क्यांची वाढ झाली. प्रदर्शनाच्या २८ दिवसांत चित्रपटाने भारतीय बॉक्स ऑफिसवर ७२.८८ कोटी रुपयांची नेट कमाई केली असून, त्याचे ग्रॉस कलेक्शन सुमारे ८६ कोटी रुपयांवर पोहोचल्याचे वृत्त आहे. चौथ्या आठवड्यात ६१ कोटी रुपयांची कमाई करत 'हनुमान अंश'ने बॉलिवूडच्या चौथ्या आठवड्यातील कमाईच्या विक्रमांच्या यादीत दुसरे स्थान पटकावले आहे. या यादीत 'धुरंधर २'ने चौथ्या आठवड्यात ५६ कोटी रुपयांची कमाई केली होती. 'हनुमान अंश'ने हा आकडा

आकड्यांच्या पलीकडे तथ्याचे आकलन

अधिकृत जीडीपी च्या अंदाजातून दिसून येणारी सध्याची आर्थिक वाढीची गती कायम असल्याचे समर्थन करतात तेव्हा अशा प्रकारची दिशाभूल करणारी भाष्ये आणि व्यापक निष्कर्ष अधिकच अयोग्य ठरतात.

आर्थिक वर्ष २०२६ साठी ५ जून २०२६ रोजी घोषित झालेले भारताच्या जीडीपी अर्थात सकल राष्ट्रीय उत्पन्नाचे दर पाहता आणि ३१ ऑगस्ट म्हणजे अगदी अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीतील अंदाजावरुन भारतीय अर्थव्यवस्थेबद्दल भरभरुन भाष्य केले जात आहे. यातील बरेचसे हे भारताच्या आर्थिक गतिमानतेबद्दल केलेले सकारात्मक भाष्य आहे. मात्र काही तज्ज्ञांचा गट, राष्ट्रीय लेखा पद्धतीमधील त्रुटींकडे लक्ष वेधत असूनही या आशावादाच्या पाठी असलेल्या तथ्यांच्या आणि पुराव्यांच्या विश्वासार्हतेबद्दल साशंक आहे.

आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीत नोंदवलेली ७.८ टक्के वास्तविक जीडीपी वाढ ही अनेक उच्च वारंवारता असलेल्या व्यापक निर्देशकांवर आधारित असून त्यातून आर्थिक विस्ताराच्या विश्वासार्हतेला आणि व्याप्तीला पुष्टी मिळते. व्यावसायिक वाहनांच्या विक्रीत १८.३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. ही मागणी अशीच कायम राहील या अपेक्षेने कंपन्या आपल्या वाहनांच्या ताफ्यात वाढ करत असून मालवाहतूक आणि व्यावसायिक मागणी मजबूत होत असल्याचे हे संकेत आहेत. भांडवली वस्तूंच्या उत्पादनात १५.२ टक्क्यांनी तर यंत्रसामग्री आणि उपकरणांच्या आयातीत ५१.५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. पहिल्या तिमाहीत सिमेंट उत्पादन, तयार पोलादाचा वापर आणि पायाभूत सुविधा/बांधकाम साहित्यामध्येही जोरदार वाढ झाली.

ई–वे बिल निर्मितीमध्ये दुहेरी अंकी वाढ कायम राहिली, तर मोठ्या प्रमाणात करदरांचे सुसूत्रीकरण करण्यात आले असतानाही एकूण जीएसटी संकलनात ८.४ टक्क्यांची वाढ झाली. या दोन्ही बाबी एकत्रितपणे पाहता, अर्थव्यवस्थेतील मूलभूत आर्थिक घडामोडी आणि व्यवहारांची स्थिती मजबूत आणि लवचिक असल्याचे संकेत मिळतात.

याशिवाय खर्चाच्या बाबतीत देखील लवचिकता दिसून येत असून घरगुती वाहने तसेच तीनचाकी वाहनांच्या नोंदणीत झालेली वृद्धी आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीत लोकांच्या ऐच्छिक खर्चाच्या मागणीत वाढ होत असल्याचे दर्शवते. मार्च महिन्यात १५.९ टक्के असलेला बिगर अन्नधान्य क्षेत्रातील वर्षनिहाय बँक कर्जपुरवठा जून महिन्याच्या अखेरीस १८.३ टक्क्यांची वृद्धी दर्शवत असून यामध्ये कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रांमध्ये सर्वसमावेशक वाढ दिसून आली. भक्कम गुंतवणूक, लवचिक खर्च, वस्तूंची चैतन्यदायी वाहतूक आणि विस्तारणारी बँक हमी यांचा एकत्रित परिणाम वाढ शाश्वत आहे, हेच सांगतात.

आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीत उत्पादनाच्या किमतीतील वाढीच्या तुलनेत कच्या मालाच्या किमतींमध्ये झालेल्या जास्त वाढीमुळे जी व्ही ए डिफ्लेटर कमी राहण्यास हातभार लागला. तसेच, काही सेवा क्षेत्रांमध्ये किमतींची वाढ कमी राहिल्याने जी व्ही ए डिफ्लेटर आणि मुख्य ग्राहक किंमत निर्देशांक / घाऊक किंमत निर्देशांक महागाईदरम्यानची तफावत आणखी वाढली. स्थिर किंमतीवरील जी व्ही ए चे अंदाज हे एकूण महागाई निर्देशांकांवर आधारित नसतात; तर ते अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांतील कच्चा माल आणि अंतिम उत्पादनांसाठी ३०० हून अधिक उत्पादक किंमत निर्देशांकांच्या अतिशय तपशीलवार पद्धतीने वापरुन तयार केलेले असतात. ग्राहक किंमत निर्देशांक, घाऊक किंमत निर्देशांक किंवा इतर काही मोठे आकडे दाखवून जी व्ही ए च्या आकडेवारीबाबत जनतेच्या समजात दिशाभूल केल्याबद्दल त्याला दोष देता येणार नाही.

उत्पादकतेला प्राधान्य

आता आपण उत्पादकतेतील जी व्ही ए वर लक्ष केंद्रित करुया, ज्यावर बहुतांशवेळा लोकांचेही अधिक लक्ष असते. येथे एक स्पष्टीकरण आवश्यक आहे कारण उत्पादकता जी व्ही ए डिफ्लेटर जर बिगर उत्पदकता जीव्ही ए च्या नजीक असेल तर एकूण डिफ्लेटर हा लोकांच्या धारणेच्या जवळपास आला असता.

मग योग्य पर्यायी तुलना काय आहे? अनेक विश्लेषणांमध्ये उत्पादकता औद्योगिक उत्पादन निर्देशांकाची वाढ आणि वास्तविक उत्पादकता जी व्ही ए ची वाढ यांची तुलना केली जाते. परंतु औद्योगिक उत्पादन निर्देशांक हा उत्पादनाच्या प्रमाणातील बदल मोजणारा निर्देशांक असल्यामुळे, त्याची योग्य तुलना म्हणजे स्थिर किंमतींवरील उत्पादकता जी व्ही ओ म्हणजेच एकूण उत्पादनाचे मूल्य होय. आर्थिक वर्ष २४ आणि २५ मध्ये दोन्ही परिमाणांनी उल्लखनीय दृष्ट्या समान सरासरी वाढ नोंदवली – वास्तविक जी व्ही ओ मध्ये ६.७ टक्के, तर औद्योगिक उत्पादन निर्देशांकामध्ये ६.६ टक्के. यावरून उत्पादन क्षेत्रातील आर्थिक उलाढाल मोजणाऱ्या या दोन्ही मोजमापांमध्ये लक्षणीय एकरूपता किंवा सुसंगती असल्याचे दिसून येते.

उत्पादनाच्या किमती आणि उत्पादनासाठी लागणाऱ्या इनपुटच्या किंवा कच्या मालाच्या किमती एकाच दिशेने आणि जवळपास समान वेगाने बदलत असतील, तर अल्पकालीन कालावधीत उत्पादकता औद्योगिक उत्पादन निर्देशांक आणि उत्पादकता जी व्ही ए यांच्या वाढीची तुलना केल्यासही ती तुलनेने योग्य आणि समर्थनीय निष्कर्ष देऊ शकते. मात्र तरीही औद्योगिक उत्पादन निर्देशांक आणि जी व्ही ए यांच्यात तुलना करताना सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे इनपुट आणि आउटपुट किंमतींमधील भिन्न गतिशीलतेच्या परिस्थितीत उत्पादकता डिफ्लेटरचा अर्थ लावताना अधिक काळजीपूर्वक विश्लेषण करणे गरजेचे आहे. खालील मुद्दा महत्त्वाचा आहे: उत्पादन क्षेत्र अतिशय महत्त्वपूर्ण आहे – मध्यवर्ती कच्या मालाचा प्रमुख पुरवठादार आणि वापरकर्ता या दोन्ही भूमिकांमध्ये. उत्पादन क्षेत्रातील उत्पादनाचा वाटा जवळपास ८१ टक्के असून, त्यामुळे सकल मूल्यवर्धन, जी व्ही ए म्हणून १९ टक्के शिल्लक राहतात. त्यामुळे, उत्पादन आणि निविष्ठांच्या किमती आणि प्रमाणातील तफावतींमुळे वास्तविक सकल मूल्यवर्धनात असंतुलित चढ–उतार निर्माण होऊ शकतात.

आर्थिक वर्ष २०२५ मध्ये आणि आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीतहीड्ढे स्पष्ट झाले, याठिकाणी निविष्ठा–किंमत महागाई, उत्पादन महागाईपेक्षा जास्त झाली, ज्यामुळे एक नकारात्मक अप्रत्यक्ष जी व्ही ए डिफ्लेटर निर्माण झाला. ही बाब सांख्यिकीयदृष्ट्या भक्कम असून आर्थिकदृष्ट्याही तिचे स्पष्टीकरण तर्कसंगत आहे. दरम्यान, स्थिर किमतींवर जी व्ही ओ च्या तुलनेत मध्यवर्ती उपभोगाच्या गुणोत्तरातील हळूहळू होणारी घट, निविष्ठा–वापर कार्यक्षमतेत सुधारणा होत असल्याचे दर्शवते, हे उत्पादन बाजारपेठा आणि घटक बाजारपेठांमध्ये सुरू असलेल्या सुधारणांशी सुसंगत आहे.

आकडेवारीच्या पद्धतीबाबत केलेली अतार्किक टीका २०१४ नंतरच्या भारताच्याआर्थिक कामगिरीची तुलना एका कृत्रिमरीत्या तयार केलेल्या तुलनात्मक देशाशी करणारे अलीकडच्या काळातील विश्लेषणही आपण पाहिले आहे. हा तुलनात्मक देश अशा इतर देशांना एकत्र करून तयार करण्यात आला आहे.

तब्बल १८ अब्ज डॉलर्सचा समझोता

मेटा खरोखरच किशोर वयीन मुलांसाठी प्रभावी नियंत्रण आणि स्क्रीन मर्यादा लागू करू शकेल का? की हा केवळ कायदेशीर कारवाईपासून पळ काढण्याचा दिखावा आहे?

मुलांच्या हातात स्मार्टफोन देताना पालकांना वाटते, आपण त्यांना जगाशी जोडत आहोत. प्रत्यक्षात त्या छोट्याशा पडद्यामागे एक प्रचंड उद्योग त्यांचे लक्ष, वेळ, भावना आणि वर्तन यांचा मागोवा घेत असतो. मुलाने काय पाहावे, किती वेळ पाहावे, पुढे कोणता व्हिडिओ यावा आणि पुन्हा त्याच अँपवर तो कधी परतावा हे बरेचदा मुलगा किंवा मुलगी ठरवत नाही. ते अल्गोरिदम ठरवतो.

याच वास्तवाला अमेरिकेत प्रथमच मोठ्या कायदेशीर धक्क्याला सामोरे जावे लागले आहे. मेटा या कंपनीने अमेरिकेतील जवळपास सर्व राज्यांशी केलेल्या समझोत्यात मुलांच्या ऑनलाइन सुरक्षेसंदर्भातील दावे निकाली काढण्यासाठी १८ अब्ज डॉलरपर्यंतची रक्कम देण्याचे मान्य केले आहे. त्याबदल्यात फेसबुक आणि इन्स्टाग्रामवरील किशोरवयीन वापरकर्त्यांसाठी दैनंदिन वापरावर मर्यादा, रात्रीचा प्रवेश बंद करणे, शाळेच्या वेळेत नोटिफिकेशन्स कमी करणे आणि वय पडताळणी अधिक कठोर करणे अशा उपाययोजना कराव्या लागणार आहेत. हे प्रकरण केवळ अमेरिकेचे नाही. हा डिजिटल जगासाठी एक इशारा आहे. समझोत्यातील सर्वाधिक चर्चेचा मुद्दा म्हणजे १८ वर्षांखालील वापरकर्त्यांसाठी फेसबुक आणि इन्स्टाग्रामचा एकत्रित वापर दिवसाला दोन तासांपर्यंत मर्यादित करण्याची तरतूद. मध्यरात्री ते सकाळी सहा या काळात वापरावर बंदी असेल. शाळेच्या वेळेत बहुतांश पुश नोटिफिकेशन्स बंद केली जातील. वरकरणी हे स्वागतार्ह आहे. निदान किती वेळ? या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न तरी झाला आहे. पण येथेच थांबणे धोकादायक ठरेल. कारण सोशल मीडिया ही फक्त वेळ खाणारी नाही तर लक्ष खेचणारी यंत्रणा आहे. दोन तासांत मुलाला कोणती सामग्री दाखवली जाते, त्याला कोणत्या प्रकारच्या व्हिडिओंच्या मालिकेत नेले जाते, कोणत्या पोस्टशी तुलना करायला भाग पाडले जाते आणि कोणत्या भावनिक प्रतिक्रियांना उत्तेजित केले जाते, हे अधिक महत्त्वाचे आहे.

मुलाने दोन तास दर्जेदार शैक्षणिक सामग्री पाहिली आणि दोन तास शरीराविषयी न्यूनगंड, हिंसक सामग्री किंवा धोकादायक आव्हाने पाहिलीड्ढदोन्ही वापरांना दोन तास या एकाच मापाने मोजता येणार नाही. म्हणून स्क्रीनटाइमची मर्यादा हा उपाय असू शकतो; तो अंतिम उपाय नाही.

सोशल मीडिया कंपन्यांच्या व्यवसायाचा पाया वापरकर्त्याचे लक्ष आहे. वापरकर्ता जितका जास्त वेळ अँपवर, तितक्या जाहिराती; जितका अधिक डेटा, तितके अधिक अचूक लक्ष्यीकरण; आणि जितके अचूक लक्ष्यीकरण, तितका अधिक महसूल. मग या व्यवस्थेत मुलाला अँपपासून दूर जायला प्रवृत्त करणारी रचना कंपनी का करेल? हा मूलभूत विरोधाभास आहे. एका बाजूला कंपनी म्हणते, 'मुलांची सुरक्षितता आमच्यासाठी सर्वोच्च आहे'; दुसऱ्या बाजूला तिचे व्यावसायिक मॉडेल वापरकर्त्याने अधिकाधिक वेळ प्लॅटफॉर्मवर घालवावा यावर उभे आहे.

> लेबनॉन म्हटलं की डोळ्यांसमोर येतो तो बैरूटचा महानगरी थाट; पण या देशाच्या गावागावांत इतिहास, निसर्ग आणि संस्कृतीचा अनोखा संगम अनुभवायला मिळतो. बायब्लॉसच्या प्राचीन अवशेषांपासून जेइटा ग्रोटोच्या अद्भुत गुहांपर्यंत, मुसाच्या स्वप्नातील किल्ल्यापासून सेडरच्या हिमाच्छादित जंगलापर्यंतचा हा प्रवास मनाला मोहवून टाकणारा आहे.

लेबनॉनचा गावरान गंध

बैरूटला महानगराचा थाट आहे. राजधानीची ऐट आहे; मात्र लेबनॉनमधील इतर जागांना मनाला मोहून टाकणारा गावरान गंध आहे. लेबनॉनच्या पश्चिम किनाऱ्यावर वसलेलं, नव्या–जुन्या संस्कृतीचा संगम असलेलं बंदराचं गाव म्हणजे बायब्लॉस! फेनेशियन ही आता अस्तित्वात नसलेली संस्कृती तिथे मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात होती. असं म्हणतात की इसवीसनपूर्व सहाव्या शतकापासून आजतागायत या गावात मानवाचं वास्तव्य आहे. निर्मनुष्यतेचा शाप या प्राचीन गावानं कधीच सहन केला नाही. म्हणून असेल कदाचित, जुन्या शहरातही पडझड फारशी कुठे दिसली नाही. भूमध्य समुद्राच्या निळ्याभोर पडद्याची पार्श्वभूमी लाभलेला हा भूभाग. भिंतीचा कोट असलेल्या टेकाडावरील जुन्या शहरात बाराव्या शतकात बांधलेल्या क्रुसेडरांच्या किल्ल्यातून प्रवेश करावा लागतो. जुन्या शहरातील मुख्य आकर्षण म्हणजे ओबेलिस्क टेम्पल. ३२०० वर्षांहून अधिक प्राचीन अशा या मंदिरात छोटे छोटे दगडी स्तंभ आहेत. इतिहासाची आवड असणारे काही पर्यटक त्यांच्या पुस्तकाची खुणा करून ठेवलेली पानं उलटत या मंदिराकडे आणि रोमन अवशेषांकडे भारावून पाहत होते. जणू काहीतरी भव्यदिव्य पाहतोय! जुन्या बाजारातील दगडी गल्ल्यांतील एका स्थानिक कॅफेमध्ये बसून त्या अवशेषांकडे पाहताना मला जाणवलं की या प्राचीन मोडक्या तुटक्या दगडी इमारतींची एक वेगळीच मोहिनी आहे. या विस्कळीत इमारतींच्या मोकळ्या जागेत, कल्पनेनं आपण ठोकळे बसवू लागतो तेव्हा ती पूर्ण इमारत त्याच्या मूळ स्वरूपात आपल्या मनःचक्षूंसमोर उभी ठाकते आणि तिची भव्यता पाहिली की दिपून जायला होतं.

प्राचीन इतिहासातील एक महत्त्वाचं पान इथे 'लिहिलं' गेलं होतं. आधुनिक जगातील ग्रीक, लॅटिन आणि इंग्रजी लिपींची जननी मानली जाणारी बावीस अक्षरांची पहिली वर्णमाला इथेच विकसित झाली. बायबल शब्दाशीही या शहराचं एक वेगळं नातं आहे. पापायरस या वनस्पतीपासून तयार केलेल्या कागदावर पूर्वी चित्रं आणि चित्रलिपी रेखाटत असत. या कागदाला ग्रीक भाषेत बायब्लॉस म्हटलं जातं. या शहरातूनच मोठ्या प्रमाणावर पापायरसचा व्यापार होत असल्यामुळे या शहराला तेच नाव पडलं आणि याच शब्दावरून पुढे बायबल आणि 'बिब्लोग्राफी' हे शब्द जन्माला आले. या शहराच्या अतुलनीय ऐतिहासिक महत्त्वामुळे १९८४मध्ये युनेस्कोने याला जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केलं.

खलील जिब्रान या लेबनॉनच्या भूमिपुत्राचा एक हुबेहूब आणि जिवंत वाटणारा पुतळा येथील वॅक्स म्युझियममध्ये पाहिला. टेबलापाशी बसून लिखाणात व्यग्र असलेल्या जिब्रानचा पुतळा माझ्यातल्या उभरत्या लेखिकेला फारच भावला. 'द प्रॉफेट' या प्रसिद्ध पुस्तकाचा हा लेखक, कवी हृदयाचा असला तरी त्याला तत्त्वज्ञानातही तितकाच रस होता. जिब्रान उत्तम चित्रकारही होता. बहुगुणसंपन्न! बाकीचे मेणाचे पुतळे यथातथाच असले तरी पूर्वापार चालत आलेलं लेबनॉनचं सामाजिक जीवन आपल्यासमोर उलगडून ठेवण्यात ते यशस्वी होतात.

दक्षिण–पश्चिम किनाऱ्यावरील सिडॉन या गावातील समुद्रकिल्ला फारच सुंदर आहे. समुद्रापेक्षा, उंच पर्वतराजींवर प्रेम करणाऱ्या मला लेबनॉनमध्ये या समुद्राने वेड लावलं.

राखाडी रंगाचे दगड डकवलेला हा किल्ला आणि तिथून पाहिलेला सूर्यास्त माझ्या मनात कायमचा कोरून ठेवला गेला. तो पाहत असताना चालकाच्या आग्रहावरून आम्ही तिथला 'नाहना चहा' प्यायलो. बिनदुधाच्या या कोऱ्या चहात नाहना म्हणजे चक्क बचकभर पुदिन्याची पानं टाकतात. पुढे कितीतरी टपऱ्यांवर थांबून आम्ही वेगळ्याच चवीच्या या चहाचा मनमुराद आस्वाद घेतला.

लेबनॉनमध्ये निसर्गाचा एक चमत्कार दृष्टीस पडतो. जेइटा ग्रोटो! बैरूटच्या उत्तरेकडे अठरा किलोमीटर अंतरावर या चुनखडीच्या गुहा आहेत. एक डोंगरमाथ्यावर, तर एक पायथ्याशी. खालच्या गुहेच्या तळाशी पाणी असल्यामुळे नावेत बसूनच ती पाहता येते. वरच्या गुहेत मात्र पायी चालावं लागतं. या गुहेतील निसर्गाची करामत आपल्याला थक्क करून सोडते. गुहेच्या आत छतामधून जे निवळीयुक्त पाणी पडत असतं, त्याचं बाष्पीभवन होऊन खाली निमुळते होत जाणारे, बर्फाच्या सुयांच्या आकाराचे, लटकणारे लाइम कार्बोनेटचे थर जमतात. यांना म्हणतात स्टॅलेक्टाइट. यातून पडणाऱ्या थेंब थेंब पाण्यामुळे जमिनीवर शंकूच्या आकाराचे थर जमतात. त्यांना म्हणतात स्टेलेग्माईट. कधी कधी हे दोन्ही थर वाढत जाऊन एकमेकांना टेकतात आणि त्यांचा एक स्तंभ तयार होतो. मात्र या सगळ्या प्रक्रियेला वर्षानुवर्षं लागतात. म्हणजे ब्रह्मदेवाचा दिवस मोजावा लागतो. या 'थेंबे थेंबे तळे साचे' प्रक्रियेत वेगवेगळ्या आकृत्या तयार होतात.

कुठे घड्याळाचा मोठा लंबक; तर कुठे छान कातरलेलं झुंबर! एके ठिकाणी तर हुबेहूब चर्चमध्ये उच्च आसनावर बसून प्रवचन देत असलेला बिशप दिसला आम्हाला. या सगळ्या आकृत्या पाहून मला लहानपणीचा 'स्टॅचू' हा खेळ आठवला.

वाटलं, धावता धावता यांना सवंगड्यांनी स्टॅचूची आज्ञा दिली आणि तेव्हापासून हे तसेच स्तब्ध उभे आहेत. या गुहा खूप मोठ्या आहेत. अगदी आतपर्यंत खोल पसरलेल्या. जगातील नैसर्गिक आश्चर्यात समावेश व्हावा इतक्या सुंदर! मी इतर देशातही अशा चुनखडीच्या गुहा पाहिल्या आहेत; पण या सम याच!

लहानपणी पाहिलेली भाबडी स्वप्नं साकार करण्यासाठी धडपडणारी किती माणसं असतील या जगात? बालिशपणा म्हणून अशी स्वप्नं कधीच अडगळीत टाकली जातात किंवा मनाच्या एका हळुवार कोपऱ्यात निद्रिस्त अवस्थेत पडून राहतात.

'ह्युमन रिझर्व्ह' गरजेचेच, पण....

महेश कोळी

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाया पसाऱ्यामुळे 'माणसाच्या कामाची किंमत भविष्यात किती राहणार?' हा वर्तमानातला कळीचा प्रश्न बनला आहे. मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक बिल गेट्स यांनी याच प्रश्नाला 'ह्युमन रिझर्व्ह'ची कल्पना मांडून वेगळी धार दिली आहे. समाजातील काही कामे जाणीवपूव।क माणसांसाठी राखून ठेवावी लागतील, असे त्यांचे म्हणणे आहे.

धर्मादाय देणगी द्या

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे भविष्यात मोठ्या प्रमाणावर रोजगार नष्ट होऊ शकतात आणि म्हणून काही कामे केवळ माणसांसाठी राखीव ठेवण्याची वेळ येईल, असा इशारा बिल गेटसब यांनी दिला आहे. 'ह्युमन रिझव्ह।' ही त्यांची कल्पना वरकरणी मानवी हिताची वाटते, पण या निमित्ताने एक अस्वस्थ करणारा प्रश्न विचारायला हवा. जगाला कृत्रिम बुद्धिमत्तेच्या शय।तीत ढकलणाऱ्या, अब्जावधी डॉलर गुंतवून अधिकाधिक शक्तिशाली यंत्रणा उभारणाऱ्या आणि त्यातून प्रचंड आथि।क व सामरिक सामथ्य। मिळिवणा ?या विकसित देशांना माणसाच्या रोजगाराची चिंता नेमकी आता का वाटू लागली?

आधुनिक डिजिटल अथ।व्यवस्थेचा इतिहास पाहिला तर तंत्रज्ञानाच्या प्रत्येक मोठ्या लाटेत अमेरिका आणि अन्य विकसित देशांनी आपली आघाडी आथि।क वच।स्वात रूपांतरित केली. संगणक, इंटरनेट, शोधयंत्रे, समाज माध्यमे, लाऊड कम्प्युटिंग, स्मार्टफोन परिसंस्था आणि आता कृत्रिम बुद्धिमत्ता या प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचे नियंत्रण काही मोजक्या जागतिक कंपन्यांच्या हातात केंद्रित झाले. युरोपीय संसदेच्या अभ्यासा नुसार खासगी एआय गुंतवणुकीत अमेरिका आघाडीवर असून जनरेटिव्ह एआयमधील व्हेंचर कॅपिटलमध्येही अमेरिकेचे वच।स्व आहे. म्हणजे एआय ही केवळ वैज्ञानिक क्रांती नाही; ती आथि।क सत्तेची नवी रचनाही आहे. या शय।तीचा वेग आज किती प्रचंड आहे, याचे उदाहरण म्हणजे अमेरिका आणि युरोपमधील वाढती गुंतवणूक दरी. प्रचंड भांडवल एआयच्या दिशेने वळत असताना ही शय।त केवळ समाज कल्याणासाठी सुरू आहे, असे मानणे भाबडेपणाचे ठरेल.

आता बिल गेट्स म्हणतात की, सध्याच्या रोजगारांपैकी ४० टक्क्यांपर्यंत रोजगार माणसांसाठी राखून ठेवण्याचा विचार समाजाने केला पाहिजे. एआय वापरून मानवी श्रमांची जागा घेणाऱ्या कंपन्यांच्या उत्पन्नावर कर लावून सामाजिक सुरक्षा व्यवस्था उभी करण्याची कल्पनाही त्यांनी मांडली आहे. एवढेच नव्हे तर धोकादायक एआयवर नियंत्रण ठेवण्यासाठी जागतिक देखरेख यंत्रणा निर्माण करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली आहे. प्रश्न त्यांच्या चिंतेच्या प्रामाणिकपणाचा नाही; प्रश्न वेळेचा आहे. ही चर्चा एआय कंपन्यांचे मूल्यांकन अब्जावधी डॉलरपर्यंत पोहोचल्यानंतर आणि तंत्रज्ञानाने रोजगार बदलण्याची क्षमता सिद्ध केल्यानंतर अधिक तीव्र होत आहे.

धमा।दाय देणगी द्या

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अभ्यासा नुसार, जगातील जवळपास ४० टक्के रोजगार एआयच्या प्रभाव क्षेत्रात येतात. विकसित अर्थव्यवस्थांमध्ये हे प्रमाण सुमारे ६० टक्के आहे, तर उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमध्ये ४० टक्के आणि कमी उत्पन्नाच्या देशांमध्ये २६ टक्के आहे. भारतातील सुमारे २६ टक्के रोजगार उच्च एआय–संपर्काच्या श्रेणीत असल्याचा अंदाज या अभ्यासात मांडण्यात आला होता. मात्र कमी संपर्क म्हणजे कमी धोका असे समीकरण नाही. कारण विकसित देशांकडे तंत्रज्ञान, भांडवल, संगणकीय क्षमता, विद्यापीठे आणि पुनकौ।शल्य प्रशिक्षणासाठी पैसा आहे. मात्र तेवढी संरक्षक साधने नाहीत.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटना आणि जागतिक बँकेच्या अभ्यासानेही हीच विषमता अधोरेखित केली आहे. विकसनशील देशांमध्ये एआयमुळे रोजगारातील विस्थापनाचा परिणाम उत्पादकतेच्या फायद्यापेक्षा लवकर जाणवू शकतो.

डिजिटल पायाभूत सुविधांची कमतरता असल्याने एआयचा फायदा सवां।ना मिळणार नाही; पण ऑनलाइन स्वरूपातील कारकुनी आणि प्रशासवफीय रोजगार मात्र स्वयंचलनामुळे तुलनेने लवकर प्रभावित होऊ शकतात. विशेष म्हणजे अशा नोकऱ्या अनेक विकसनशील देशांत तरुण आणि महिलांसाठी तुलनेने स्थिर रोजगाराकडे जाणारा मार्ग राहिल्या आहेत. हीच भारतासाठी खरी धोक्याची घंटा आहे. अमेरिकेतील कंपनीने एआय विकसित करायचे, त्यासाठी जगभरातील माहिती आणि बाजारपेठेचा उपयोग करायचा, एआयमुळे उत्पादकता वाढवून नफा मिळवायचा आणि त्यानंतर भारतासारख्या देशाने बेरोजगार युवकांना पुनर्कौशल्य प्रशिक्षण द्यायचे ही व्यवस्था न्याय्य म्हणता येईल काय?

संदर्भ साहित्य तपासा

'ह्युमन रिझर्व्ह' ही कल्पना म्हणूनच स्वागतार्ह असूनही अपुरी आहे. जर एआयमुळे १० माणसांचे काम एक माणूस करू शकणार असेल, तर उर्वरित ९ जणांसाठी रोजगार राखून ठेवण्याची दया दाखविण्यापेक्षा वाढलेल्या उत्पादकतेतील हिस्सा समाजाला कसा मिळणार याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. एआयमधून मिळणा–या असामान्य नफ्यावर कर, कर्मचाऱ्यांच्या पुनर्कौशल्याचा खर्च कंपन्यांनी उचलणे, विकसनशील देशांना तंत्रज्ञान हस्तांतरण, स्थानिक भाषांसाठी मुक्त तंत्रज्ञान आणि एआयमुळे विस्थापित होणा–या कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा या मुद्द्यांवर जागतिक करार आवश्यक आहे.

बिल गेट्स यांचा इशारा म्हणून महत्त्वाचा आहे; पण त्याहून महत्त्वाचा त्यातून समोर येणारा जागतिक विरोधाभास आहे. तंत्रज्ञानाच्या विकासाच्या टप्प्यावर जगाला सांगायचे नवोन्मेष थांबवू नका.

बाजारपेठ निर्माण झाल्यानंतर सांगायचे 'एआय अपरिहार्य आहे' आणि रोजगार धोक्यात आल्यानंतर सांगायचे 'काही नोकऱ्या माणसांसाठी राखून ठेवू या ही भूमिका पुरेशी नाही. तंत्रज्ञानाच्या नफ्यात जगाचा वाटा असेल तर त्याच्या निर्णय प्रक्रियेतही जगाचा वाटा असला पाहिजे. एआयने माणसाची जागा घ्यावी की माणसाला अधिक सक्षम करावे, हा निर्णय केवळ सिलिकॉन व्हॅलीतील काही कंपन्यांच्या संचालक मंडळांनी घेण्याचा विषय नाही.

अब्जावधी लोकांच्या रोजगाराचे भविष्य बदलणाऱ्या तंत्रज्ञानाचे नियमही व्यापक जागतिक सहभागातून ठरले पाहिजेत. तंत्रज्ञान विकसित देशांचे, नफा कंपन्यांचा आणि त्याची सामाजिक किंमत उर्वरित जगाने मोजायची हा नववसाहतवादच आहे.

बाप्पासाठी ट्राय करा स्पेशल मोदक

गणेश चतुर्थीचा उत्सव यंदा १४ सप्टेंबरपासून सुरू होणार असून २५ सप्टेंबरपर्यंत गणेशोत्सवाची धूम पाहायला मिळणार आहे. दहा दिवस चालणाऱ्या या उत्सवात घरोघरी गणरायाची प्रतिष्ठापना करून भक्तिभावाने पूजा केली जाते. बाप्पाच्या नैवेद्यासाठी विविध गोड पदार्थ तयार केले जातात. त्यात सर्वाधिक लोकप्रिय असतो तो म्हणजे मोदक. पारंपरिक उकडीच्या मोदकासोबतच सध्या मोदकाचे अनेक हटके प्रकारही लोकप्रिय झाले आहेत. यंदाच्या गणेशोत्सवात तुम्हालाही बाप्पासाठी काहीतरी वेगळं बनवायचं असेल, तर हे ६ प्रकार नक्की ट्राय करा.

मोदक म्हटलं की बाप्पाचा आवडता पदार्थ म्हणून त्याची खास ओळख आहे. पारंपरिक मोदकाला केशराची सुगंधी आणि

स्वादिष्ट जोड देऊन केसर मोदक तयार करता येतो. केशरामुळे मोदकाला आकर्षक रंग, सुगंध आणि खास चव मिळते. गणेशोत्सवातील नैवेद्यासाठी हा एक उत्तम पर्याय ठरू शकतो.

आरोग्यदायी आणि चविष्ट पर्याय हवा असेल तर ड्राय फ्रूट्स मोदक करून पाहा. अंजीर आणि खजूर यांचा नैसर्गिक गोडवा वापरून हा मोदक तयार करता येतो. त्यात बारीक चिरलेले बदाम, काजू, पिस्ता यांसारखे ड्राय फ्रूट्स मिसळून मोदकाचा आकार देता येतो.पिस्त्याची चव आवडणाऱ्यां साठी पिस्ता मोदक खास पर्याय आहे.

पिस्ता आणि भिजवलेल्या बदामांपासून हा स्वादिष्ट मोदक तयार केला जातो.

रोज मूठभर भोपळ्याच्या बिया खा

भोपळ्याच्या बिया म्हणजेच हा आरोग्यासाठी फायदेशीर स्नॅक मानला जातो. आकाराने छोट्या असलेल्या या बियांमध्ये हेल्दी फॅट्स, फायबर, अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि अनेक खनिजे मुबलक प्रमाणात असतात. त्यामुळे सॅलड, दही किंवा स्मूदीमध्ये भोपळ्याच्या बिया टाकून खाण्याचा ट्रेंड वाढला आहे. मात्र, या बिया कच्च्या खाव्यात की भाजून? असा प्रश्न अनेकांना पडतो. दोन्ही पर्यायांचे काही फायदे आणि काही मर्यादा आहेत.

न्यूट्रिशनिस्ट समरीन सानिया यांच्या मते, भोपळ्याच्या बियांमध्ये हेल्दी फॅट्स, फायबर, अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात. णडउ्अ च्या माहितीनुसार, १०० ग्रॅम भोपळ्याच्या बियांमध्ये सुमारे ५९२ मिलीग्रॅम मॅग्नेशियम आणि ८०९ मिलीग्रॅम पोटॅशियम आढळते. यामध्ये ४० ग्रॅमपेक्षा जास्त फॅट असते, त्यातील बहुतांश फॅट हेल्दी प्रकारातील असते.

अँटिऑक्सिडंट्सचा चांगला स्रोत – भोपळ्याच्या बियांमध्ये व्हिटॅमिन ई आणि बीटा–कॅरोटीनसारखे अँटिऑक्सिडंट्स असतात. हे शरीरातील ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस आणि पेशींचे नुकसान कमी करण्यास मदत करू शकतात.

हृदयासाठी फायदेशीर – यातील मॅग्नेशियम आणि पोटॅशियम रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. त्यामुळे हृदय आणि रक्तवाहिन्यांच्या आरोग्यासाठी या बिया आहारात समाविष्ट करता येतात.

झोपेसाठी उपयुक्त – भोपळ्याच्या बियांमध्ये ट्रिप्टोफॅन हे अमिनो ॲसिड असते. शरीराला सेरोटोनिन तयार करण्यासाठी ट्रिप्टोफॅनची गरज असते. त्यामुळे रात्रीच्या स्नॅकमध्ये थोड्या प्रमाणात भोपळ्याच्या बिया घेणे फायदेशीर ठरू शकते.

रोगप्रतिकारक शक्तीसाठी मदत – व्हिटॅमिन ई आणि झिंक यांसारखी पोषकद्रव्ये रोगप्रतिकारक यंत्रणेच्या सामान्य कार्याला मदत करतात.

पचनक्रिया सुधारण्यास मदत – भोपळ्याच्या बियांमध्ये फायबर असते. १०० ग्रॅम बियांमध्ये सुमारे ६ ग्रॅम फायबर मिळते. पुरेसे पाणी प्यायल्यास फायबर पचनक्रिया सुरळीत ठेवण्यास आणि बद्धकोष्ठता कमी करण्यास मदत करू **शकते.**

मधुमेह असणाऱ्यांसाठीही पर्याय – काही संशोधनानुसार, भोपळ्याच्या बियांमधील घटक रक्तातील साखरेच्या नियंत्रणासाठी फायदेशीर ठरू शकतात.

मात्र, मधुमेह असणाऱ्यांनी आपल्या आहारातील एकूण कॅलरी आणि कार्बोहायड्रेटचे प्रमाण लक्षात घेऊन त्यांचे सेवन करावे.

दिवसभर स्क्रीनसमोर काम करता...?

आजच्या डिजिटल युगात मोबाइल, कॉम्प्युटर, टॅबलेट आणि इतर स्क्रीनचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. सतत स्क्रीनकडे पाहिल्यामुळे डोळ्यांवर ताण येऊ शकतो. या समस्येला कम्प्युटर व्हिजन सिंड्रोम किंवा डिजिटल आय स्ट्रेन असे म्हणतात. जास्त वेळ स्क्रीन पाहणे, कमी पापण्या लवणे आणि स्क्रीन वापरण्याच्या चुकीच्या सवयी यामुळे ही समस्या वाढू शकते.

डिजिटल आय स्ट्रेनमध्ये डोळ्यांना थकवा किंवा जडपणा जाणवू शकतो. डोळ्यांत कोरडेपणा, जळजळ आणि खाज येणे, तसेच डोळे लाल होणे किंवा पाणी येणे अशी लक्षणेही दिसू शकतात.काही जणांना स्क्रीन पाहिल्यानंतर दृष्टी धूसर होणे किंवा वारंवार फोकस बदलण्यास त्रास होऊ शकतो. डोळ्यांच्या आसपास किंवा कपाळात डोकेदुखी, प्रकाशाची जास्त संवेदनशीलता आणि मान, खांदे किंवा पाठदुखीचाही त्रास होऊ शकतो.सलग अनेक तास मोबाइल किंवा कॉम्प्युटर वापरणे हे या समस्येचे प्रमुख कारण आहे. स्क्रीनकडे लक्षपूर्वक पाहताना आपण नेहमीपेक्षा कमी पापण्या लवतो. त्यामुळे डोळ्यांचा कोरडेपणा वाढू शकतो.स्क्रीनचा जास्त प्रकाश, त्यावर पडणारी चमक, चुकीच्या अंतरावरून स्क्रीन पाहणे आणि चुकीची बसण्याची पद्धत यामुळेही डोळ्यांवर ताण येऊ शकतो.

सकाळची सुरुवातच ...



सकाळची सुरुवात कशी होते, यावर अनेकदा संपूर्ण दिवसाचा मूड आणि ऊर्जा अवलंबून असते. मात्र, सकाळच्या काही सवयी आरोग्यासाठी फायदेशीर असण्याऐवजी शरीरातील महत्त्वाच्या अवयवांवर ताण आणू शकतात. विशेषतः किडनीच्या आरोग्यावर परिणाम करणाऱ्या काही सवयी आपण नकळत रोजच्या दिनचर्येत करत असतो. सकाळी उठल्यानंतर पाणी न पिणे, लघवी रोखून धरणे, रिकाम्या पोटी वेदनाशामक औषधे घेणे, व्यायामानंतर शरीराला पुरेसे पाणी न देणे आणि नाश्ता टाळणे अशा पाच सवयी किडनीसाठी त्रासदायक ठरू शकतात.यासंदर्भात युरोलॉजिस्ट डॉ. वेंकटसुब्रमण्यम यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे काही महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. त्यांच्या मते, रात्रीच्या झोपेदरम्यान शरीरात सौम्य प्रमाणात पाण्याची कमतरता निर्माण होऊ शकते. त्यामुळे सकाळची सुरुवात योग्य पद्धतीने करणे महत्त्वाचे आहे.अनेकांची सकाळ चहा किंवा कॉफीशिवाय सुरू होत नाही. मात्र, उठल्यानंतर सर्वप्रथम एक ग्लास पाणी पिण्याची सवय लावणे फायदेशीर ठरू शकते. रात्री अनेक तास पाणी न घेतल्यामुळे शरीराला आणि किडनीला द्रवपदार्थांची गरज असते. त्यामुळे सकाळी चहा किंवा कॉफी घेण्यापूर्वी पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो.

रात्री झोपताना अनेक तास लघवी रोखली जाते. त्यामुळे सकाळी उठल्यानंतर लघवीची इच्छा झाल्यास ती जास्त वेळ रोखून न ठेवता मूत्राशय रिकामा करणे महत्त्वाचे आहे. दिवसभरही वारंवार लघवी रोखून ठेवण्याची सवय टाळण्याचा सल्ला तज्ज्ञ देतात.

डोकेदुखी किंवा शरीरदुखी जाणवल्यास काही जण सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटीच वेदनाशामक औषधे घेतात. मात्र, वेदनाशामक औषधांचा अनावश्यक किंवा चुकीचा वापर किडनीसाठी नुकसानकारक ठरू शकतो. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय अशा औषधांचे सेवन करण्याचे टाळावे.सकाळी व्यायाम किंवा वर्कआउट केल्यानंतर शरीरातून घामाच्या माध्यमातून द्रवपदार्थ कमी होतात. अशावेळी पुरेसे पाणी न प्यायल्यास शरीर डिहायड्रेट होऊ शकते. त्यामुळे व्यायामानंतर शरीरातील द्रवपदार्थांची कमतरता भरून काढण्यासाठी पुरेसे पाणी पिणे महत्त्वाचे आहे.धावपळीच्या जीवनशैलीमुळे अनेक जण सकाळचा नाश्ता टाळतात. मात्र, दिवसाची सुरुवात पौष्टिक नाश्त्याने करणे महत्त्वाचे आहे. नाश्ता टाळल्यास नंतर भूक लागल्यावर अनेकदा जास्त मीठ असलेले किंवा प्रक्रिया केलेले पदार्थ खाण्याची शक्यता वाढू शकते.

जिना चढताच दम लागतोय?

दोन–तीन मजले जिना चढल्यानंतर श्वास वेगाने चालू लागणे किंवा थोडी धाप लागणे काही लोकांसाठी सामान्य असू शकते. विशेषतः दिवसभर बसून काम करणं, व्यायामाचा अभाव किंवा फिटनेस कमी असणं यामुळे जिना चढताना शरीराला अचानक अधिक ऑक्सिजनची गरज भासते. मात्र अगदी काही पायऱ्या चढल्यानंतरच सतत दम लागत असेल, छातीत दुखत असेल किंवा चक्कर येत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका.

नियमित चालणे किंवा इतर शारीरिक हालचाली होत नसतील तर स्टॅमिना कमी होऊ शकतो. त्यामुळे रोज आपल्या क्षमतेनुसार चालणे आणि हळूहळू व्यायामाची सवय लावणे फायदेशीर ठरू शकते.

वेगाने जिना चढल्यामुळे श्वास आणि हृदयाची गती अचानक वाढू शकते. सुरुवातीला आरामात, एका ठराविक गतीने जिना चढा आणि गरज वाटल्यास मध्ये थोडा आराम घ्या.

जिना चढताना नैसर्गिक आणि नियमित श्वास घेण्याकडे लक्ष द्या. श्वास रोखून ठेवणे किंवा अतिशय वेगाने धावण्यासारख्या पद्धतीने पायऱ्या चढणे टाळा.वजन वाढल्यास चालताना किंवा जिना चढताना शरीरावर अधिक ताण येऊ शकतो. संतुलित आहार आणि नियमित शारीरिक हालचाली यामुळे फिटनेस सुधारण्यास मदत होऊ शकते.अशक्तपणा किंवा रक्तातील हिमोग्लोबिन कमी असणे यासारख्या कारणांमुळेही दम लागू शकतो. धाप लागण्यासोबत छातीत दुखणे, चक्कर, तीव्र अशक्तपणा, घाम येणे किंवा श्वास घेण्यास गंभीर त्रास होत असेल तर डॉक्टरांचा तातडीने सल्ला घ्या.

स्वयंपाक होताच झटपट ओटा आवरा

स्वयंपाकघरात कितीही नीटनेटकेपणा ठेवला तरी ओटा मात्र कायम पसरलेला दिसतो. आधी सगळं आवरु मग थोड्या वेळाने ओटा साफ करु? असा विचार करताना कामाचा कंटाळा येतो आणि ओटा तसाच पडून राहतो. पण ओटा स्वच्छ ठेवण्यासाठी तासनतास घासाघीस करण्याची गरज नसते.काही छोट्या सवयी रोजच्या दिनक्रमात आणल्या तर ओटा आवरणं अगदी सहज आणि कमी कटकटीचं होऊ शकतं.

ओटा स्वच्छ ठेवण्याचा सर्वात सोपा नियम म्हणजे एखादं काम संपलं की त्याच वेळी त्याचा पसारा आवरणं. भाजी चिरून झाल्यावर चाकू, फळी आणि साली तशाच ठेवण्याऐवजी लगेच जागच्या जागी ठेवाव्यात. चहा किंवा नाश्ता झाल्यावर कप–प्लेट सिंकमध्ये ठेवाव्यात. एक काम संपल्यानंतर दोन मिनिटं आवरायला दिली तर शेवटी सगळा ओटा एकदम आवरण्याची वेळ येत नाही. त्यामुळे कामाचा डोंगर दिसत नाही आणि आळसही कमी होतो.

ओटा पुसताना साध्या थंड पाण्यापेक्षा कोमट किंवा गरम पाण्याचा वापर केल्यास चिकटपणा आणि तेलकटपणा काढण्यास मदत होते. विशेषतः फोडणी किंवा तळणीनंतर ओट्यावर तेलाचे बारीक थेंब बसतात. अशावेळी गरम पाण्यात कापड भिजवून नीट पिळून ओटा पुसला तर साचलेला तेलकट थर सहज निघण्यास मदत होते. गरम पाणी वापरताना ओट्याच्या पृष्ठभागाला त्याचा त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी आणि उकळतं पाणी थेट ओट्यावर ओतू नये.ओट्यावर एखादी वस्तू ठेवताना तिच्या खाली छोटा कागद, वर्तमानपत्राचा तुकडा किंवा धुण्यायोग्य चटई ठेवण्याची सवय लावून घ्या. तेलाची बाटली, मसाल्यांचे डबे, पीठ किंवा साखरेचे डबे यांच्याखाली थोडासा पदार्थ सांडला तरी तो थेट ओट्यावर चिकटत नाही. नंतर तो कागद किंवा चटई काढून स्वच्छ करता येते. तेलाच्या बाटलीभोवती नेहमी चिकट थर जमा होत असेल तर बाटली ओट्यावर ठेवण्याऐवजी छोट्या ट्रेमध्ये ठेवावी. बाटलीतून तेल सांडलं तरी ते थेट ओट्यावर पसरणार नाही. मसाल्याचे डबे, मीठाची डबी किंवा नेहमी वापरात असलेल्या वस्तूंसाठीही एक छोटा ट्रे ठेवला तर साफसफाई करताना प्रत्येक वस्तू वेगळी उचलण्याची गरज पडत नाही.

ओट्यावर जितक्या जास्त वस्तू तितका पसारा जास्त. त्यामुळे रोज वापरात नसलेल्या वस्तू ओट्यावर कायम ठेवण्याची सवय सोडा. एखादी वस्तू आठवड्यातून एकदाच वापरत असाल तर ती कपाटात ठेवलेलीच बरी. ओटा शक्य तितका मोकळा ठेवला की तो पुसणंही सोपं होते.

जिभेवर विरघळणारी नारळाची वडी

नारळाची वडी म्हटलं की तोंडाला पाणी सुटतं. नारळाचा छान सुगंध, गोडसर चव आणि मऊसर पोत असलेली वडी चहासोबत खायला अगदी परफेक्ट लागते. नेहमीच्या साखरेऐवजी नारळ साखर वापरूनही ही वडी तितकीच चविष्ट करता येते. विशेष म्हणजे यासाठी फार साहित्य लागत नाही. नारळ, साखर आणि तूप या तीनच पदार्थांपासून घरच्या घरी मस्त नारळ वडी तयार करता येते.

ही वडी करण्यासाठी ताजा किसलेला नारळ घेतला तर चव आणि सुगंध अधिक छान. साधारण दोन वाट्या ताजा नारळ खवलेला घ्यायचा, एक वाटी साखर आणि दोन चमचे तूप घ्या. सुरुवातीला कढई गरम करुन त्यात एक चमचा तूप घालायचे. त्यामध्ये नारळ मंद आचेवर काही मिनिटे परतून घ्यायचे. नारळाचा ओलसरपणा थोडा कमी झाला आणि छान सुगंध येऊ लागला की त्यात साखर घालायची.

साखर घातल्यानंतर मिश्रण सतत ढवळत राहणे महत्त्वाचे आहे. साखर वितळल्यामुळे मिश्रण थोडे पातळ होईल, मात्र ते मंद आचेवर शिजवत राहिल्यास हळूहळू घट्ट होऊ लागेल. मिश्रण कढईच्या कडेला सुटू लागले आणि एकत्र गोळ्यासारखे होऊ लागले की त्यात उरलेले तूप घाला. आणखी एक–दोन मिनिटे परतून गॅस बंद करायचा.

आता एका ताटाला किंवा ताटलीला थोडे तूप लावून त्यावर हे गरम मिश्रण पसरवा. चमच्याच्या मागच्या बाजूने किंवा वाटीच्या तळाने ते हलकेच दाबून समान जाडीचे पसरवा. पूर्णपणे गार होण्यापूर्वीच सुरीने चौकोनी किंवा आवडीच्या आकाराच्या वड्या पाडा. वड्या पूर्ण गार झाल्यावर त्या अलगद काढा. हवे असल्यास वरुन थोडासा नारळाचा पसरवूनही सजवता येईल.

ही वडी करायला फारच सोपी आहे. चवीला अगदीच कमाल लागते. सुकं खोबरं वापरुनही करता येते. सुकं खोबरं वापरलं तर वडी जरा कडक होते आणि जास्त दिवस टिकते एवढाच काय तो फरक. ही रेसिपी एकदम सोपी आणि चविष्ट आहे. नक्की करुन पाहा.

उठता - बसता हाडे कुरताहेत

स्व वय वाढत गेलं की हाडांची घनता कमी होण्याचा धोका वाढतो. मात्र लहानपणापासून योग्य आहार, नियमित व्यायाम आणि पुरेसं ऊन मिळालं नसेल , योग्य आहाराची सवय ठेवली नसेल तर लहान वयातही हाडांचा त्रास होतो. काही ठराविक नियमांचे पालन करुन हाडांच्या आरोग्याची चांगली काळजी घेता येते. हाडं मजबूत ठेवण्यासाठी महागड्या गोष्टींची गरज नसते, रोजच्या आहारातील काही साध्या गोष्टी उपयोगी ठरु शकतात.हाडांची झीज होऊ नये यासाठी व्यायाम तर कराच शिवाय चांगला आहाराही घ्या. अनेक सवयी बदलाव्याही लागतात. फार मोठे बदल करायची वेळच येणार नाही जर वेळीच काही नियम पाळले.

दूध, दही, ताक, पनीर यांसारखे कॅल्शियमयुक्त पदार्थ आहारात नियमित घ्या. कॅल्शियम हे हाडांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे खनिज आहे. नाचणी, तीळ, सोयाबीन, चणे, राजमा यांसारख्या पदार्थांचाही आहारात समावेश करा. यापैकी अनेक पदार्थ कॅल्शियम तसेच इतर पोषक घटक देतात. कॅल्शियम शरीरात व्यवस्थित शोषले जाण्यासाठी जीवनसत्त्व डीदेखील महत्त्वाचे आहे. त्यामुळे डॉक्टरांनी मनाई केली नसेल तर सकाळच्या कोवळ्या उन्हात काही वेळ राहण्याची सवय ठेवू शकता. तज्ज्ञांशी बोलून योग्य सप्लिमेंट्स घ्या. त्याचा फायदा नक्की होतो. मात्र स्वतःहून असे उपाय करु नका.

हाडांसोबत स्नायू मजबूत ठेवण्यासाठी नियमित चालणे, जिने चढणे आणि शरीराच्या क्षमतेनुसार वजन उचलण्याचे व्यायाम उपयुक्त ठरतात. व्यायामाची सुरुवात हळूहळू करावी. आहारात पुरेसं प्रथिन मिळतंय याचीही काळजी घ्या. डाळी, कडधान्ये, दूध–दुग्धजन्य पदार्थ, सोयाबीन यांसारख्या पदार्थांचा योग्य प्रमाणात समावेश करता येतो. धूम्रपान आणि अतिमद्यपान टाळणं हाडांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचं आहे. तसेच खूप जास्त मीठ आणि अतिप्रमाणात प्रक्रिया केलेले पदार्थ खाण्याची सवय कमी करणंही चांगलं. फक्त कॅल्शियमची गोळी किंवा एखादा घरगुती उपाय केल्याने हाडं मजबूत होत नाहीत. संतुलित आहार, नियमित शारीरिक हालचाल आणि जीवनसत्त्व डीसह आवश्यक पोषक घटकांची पूर्तता यांचा एकत्रित परिणाम हाडांच्या आरोग्यावर होतो. वारंवार हाडं दुखणे, किरकोळ दुखापतीत फ्रॅक्चर होणे किंवा हाडांची घनता कमी असल्याची शंका असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेऊन तपासणी करुन घेणे योग्य ठरेल. वेळीच उपचार करुन घ्या.

कुंकू कपाळावर लावल्यानंतर लालसरपणा

हळद–कुंकू हा आपल्या परंपरेचा आणि सण–समारंभांचा महत्त्वाचा भाग आहे. मात्र काही वेळा कुंकू कपाळावर लावल्यानंतर लालसरपणा, खाज, जळजळ किंवा आग होण्याचा त्रास जाणवतो. कुंकूचा रंग कपाळावर किंवा केसांच्या भांगात पसरतो, कपड्यांवरही डाग पडतात.

कुंकवामुळे होणारी जळजळ किंवा खाज प्रत्येक वेळी त्यात भेसळ आहेच याचा पुरावा नसतो. काही व्यक्तींना कुंकवातील रंगद्रव्ये, सुगंधी पदार्थ किंवा इतर घटकांमुळे त्वचेची चिडचिड किंवा संपर्कजन्य त्वचारोग होऊ शकतो. काही कृत्रिम लाल रंग त्वचेला त्रासदायक ठरू शकतात. त्यामुळे कुंकू लावल्यानंतर वारंवार खाज, लालसरपणा किंवा जळजळ होत असेल तर ते कुंकू वापरणं थांबवणं योग्य ठरतं.

कुंकू घेताना त्याचा रंग अतिशय भडक आणि कृत्रिम दिसतोय का, याकडे लक्ष द्या. पॅकेटवर उत्पादकाचं नाव, घटकांची माहिती, उत्पादनाची तारीख आणि इतर आवश्यक तपशील दिले आहेत का ते पाहा. शक्यतो विश्वासार्ह आणि व्यवस्थित पॅक केलेलं कुंकू घ्या. केवळ रंगावरून कुंकू नैसर्गिक किंवा भेसळयुक्त आहे, असा निश्चित निष्कर्ष काढता येत नाही. घरगुती चाचणी म्हणून पाण्यात विरघळवणे, हातावर चोळणे किंवा इतर प्रयोग करून कुंकवाची सुरक्षितता निश्चित करता येत नाही. त्यामुळे कुंकू विकत घेताना ओळखीच्या दुकानातूनच घ्यावे.

कुंकू लावल्यानंतर लगेच जळजळ किंवा खाज सुरू झाली तर ते पुसून चेहरा साध्या पाण्याने स्वच्छ धुवा. त्रास होत असताना पुन्हा कुंकू किंवा इतर सौंदर्यप्रसाधन त्या भागावर लावू नका. संवेदनशील त्वचा असल्यास नवीन कुंकू आधी हाताच्या आतील बाजूवर अगदी थोडं लावून प्रतिक्रिया होते का ते पाहता येईल, मात्र यामुळे ॲलर्जीची पूर्ण खात्री होत नाही. सणासुदीला हळद–कुंकू समारंभात अनेक महिलांना कुंकू लावलं जातं. त्यामुळे समोरच्या व्यक्तीच्या त्वचेची संवेदनशीलता लक्षात घेऊन कुंकू अगदी हलक्या हाताने लावावे. कुंकू लावल्यानंतर सूज, तीव्र जळजळ, फोड किंवा त्रास वारंवार होत असल्यास त्वचारोगतज्ज्ञांचा सल्ला घेणं चांगलं. परंपरा जपत असतानाच त्वचेची सुरक्षितताही तितकीच महत्त्वाची आहे. त्यामुळे चांगल्या दर्जाचेच कुंकू विकत घ्यावे.

पृथ्वीला मिळणार सौर कवच



सूर्य शांत दिसत असला तरी त्याच्या पृष्ठभागावर होणाऱ्या प्रचंड स्फोटांमुळे अवकाशात मोठ्या प्रमाणावर विद्युतभारित कण आणि ऊर्जा फेकली जाते. या घटनांना सौर वादळे म्हणतात. पृथ्वीचे चुंबकीय क्षेत्र या कणांपैकी मोठा भाग परतवून लावते आणि आपल्या ग्रहाभोवती एक अदृश्य संरक्षण कवच तयार करते. मात्र आधुनिक जग उपग्रह, जीपीएस, दूरसंचार आणि वीजव्यवस्थेवर अधिकाधिक अवलंबून होत असल्याने सौर वादळांचा अचूक अंदाज घेणे आता अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. याच दिशेने नासाने केलेल्या अलीकडील संशोधनामुळे भविष्यात 'सौर ढाल'सारखे प्रभावी संरक्षण उभे करण्याच्या कल्पनेला नवी दिशा मिळू शकते.

नासाच्या 'पंच' या मोहिमेने सौर वादळांचा अंदाज लावण्याच्या क्षेत्रात नुकतेच महत्त्वाचे यश मिळवले आहे. सूर्यापासून बाहेर फेकल्या जाणा?या प्रचंड पदार्थांच्या लाटा म्हणजे कोरोनल मास इजेक्शन. यापैकी एखादी लाट पृथ्वीच्या दिशेने आली तर तिच्या परिणामामुळे उपग्रह, जीपीएस, दळणवळण व्यवस्था आणि वीज जाळ्यांमध्ये अडथळे निर्माण होऊ शकतात. 'पंच'च्या सततच्या निरीक्षणाच्या मदतीने वैज्ञानिकांनी एका सौर उद्रेकाचा पृथ्वीजवळ पोहोचण्याचा वेळ अवघ्या ३० मिनिटांच्या फरकात भाकीत केला. या सुरुवातीच्या चाचणीचे निकाल ऑगस्ट २०२६मध्ये मांडण्यात आले असून भविष्यात सौर वादळांसाठी मिळणारा इशारा अधिक अचूक आणि उपयुक्त होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पृथ्वीचे स्वतचे चुंबकीय क्षेत्र आधीपासूनच एक नैसर्गिक 'सौर ढाल' म्हणून काम करते. नासाच्या 'स्पेस अंब्रेला' प्रकल्पात या चुंबकीय कवचाचा अभ्यास करण्यासाठी मॅग्नेटोस्फेरिक मल्टीस्केल अर्थात एमएमएस मोहिमेतील माहितीचा वापर केला जात आहे. सूर्यापासून येणाऱ्या कणांचा पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राशी नेमका कसा परस्परसंवाद होतो, याचा अभ्यास या मोहिमेत केला जातो. या प्रक्रियेत सुंदर ध्रुवीय प्रकाश निर्माण होऊ शकतो; परंतु त्याच वेळी जीपीएस आणि दळणवळण यंत्रणांवर परिणाम होण्याची शक्यता असते.

या क्षेत्रातील आणखी एक महत्त्वाची घडामोड म्हणजे युरोपियन स्पेस एजन्सी आणि चायनीज आकॅडमी ऑफ सायन्सेस यांच्या संयुक्त 'स्माइल' मोहिमेचे मे २०२६मध्ये झालेले प्रक्षेपण. 'स्माइल' पृथ्वीच्या चुंबकीय कवचाचा क्ष–किरणांच्या माध्यमातून अभ्यास करणार आहे. सूर्यापासून येणाऱ्या कणांच्या लाटा पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राला कशा धडकतात आणि त्यातून कोणते बदल होतात, हे अधिक स्पष्टपणे समजून घेणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे.

दरम्यान, नासाच्या जुलै २०२६मधील एका अभ्यासाने सौर वादळांबाबतची चिंता आणखी वाढवली आहे. पूर्वी वैज्ञानिकांना पृथ्वीच्या वरच्या वातावरणात निर्माण होणा?या विद्युत प्रवाहांना एक विशिष्ट कमाल मर्यादा असावी असे वाटत होते. मात्र पृथ्वीच्या जवळ घेतलेल्या दहा लाखांहून अधिक सौर वा?याच्या मोजमापांचे विश्लेषण केल्यानंतर या विद्युत प्रवाहांची तीव्रता सौर वा?याच्या ताकदीबरोबर वाढत राहू शकते, असे संकेत मिळाले आहेत. याचा अर्थ अतिशय शक्तिशाली सौर वादळांचा तंत्रज्ञानावर अपेक्षेपेक्षा मोठा परिणाम होऊ शकतो.

याचे महत्त्व केवळ अवकाश संशोधनापुरते मर्यादित नाही. आज बँकिंगपासून विमानसेवेपर्यंत अनेक व्यवस्था उपग्रह आणि अचूक वेळेच्या संकेतांवर अवलंबून आहेत. सौर वादळांचा परिणाम वाढल्यास या सेवांमध्ये व्यत्यय येऊ शकतो. त्यामुळे अंतराळातील हवामानाचा अंदाज हा भविष्यातील दैनंदिन तंत्रज्ञानाच्या सुरक्षेचा महत्त्वाचा भाग ठरणार आहे. सूर्याचे बदलते रूप समजून घेणे आणि पृथ्वीपर्यंत पोहोचणाऱ्या धोक्याचा आधीच इशारा मिळवणे, हीच खरी 'सौर ढाल' ठरणार आहे.

त्यामुळे 'सौर ढाल' म्हणजे उद्या पृथ्वीभोवती एखादे कृत्रिम कवच उभे करणे, असा अर्थ नाही. प्रत्यक्षात पृथ्वीचे चुंबकीय क्षेत्र हे पहिले संरक्षणकवच आहे आणि त्याची रचना, त्यावरील सौर वादळांचा परिणाम तसेच त्यांचा आधीच अंदाज घेण्याची क्षमता अधिक चांगली करणे, ही सध्याची खरी दिशा आहे. भविष्यात अधिक अचूक अंदाज, वेगवान इशारे आणि अधिक सक्षम उपग्रह व वीज व्यवस्था यांच्या मदतीने सौर वादळांपासून आधुनिक तंत्रज्ञानाचे नुकसान मोठ्या प्रमाणावर कमी करता येऊ शकते. सूर्याच्या शक्तीला थांबवणे शक्य नसले, तरी तिचा इशारा वेळेवर मिळवून तिच्या परिणामांपासून स्वतचे संरक्षण करणे नक्कीच शक्य आहे.

ती आई होती ... म्हणुनी

बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई मध्ये राहणाऱ्या या ४७ वर्षांच्या आईला २९ ऑगस्ट २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्राने पाहिलं. आपल्या मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी धावणारी ही आई आहे रमाबाई रणवीर. अनवाणी पायाने धावत, व्यावसायिक तयारीने आलेल्या धावपटूंना हरवत आपल्यातील आईच्या, पालकत्वाच्या कर्तव्याला उभारी देर्णा?या रमाबाई रणवीर यांचे चहूबाजूंनी कौतुक होत आहे. हे कौतुक आणि त्यांच्याप्रती दाटून आलेले आश्चर्य त्यांच्यातील 'आईपणा'ची साक्ष देणारेष्ठ रमाबाईंचे हे कौतुक होण्याचे कारण म्हणजे केवळ एका मॅरेथॉन स्पर्धेत त्यांनी प्राप्त केलेले यश नव्हे, तर मुलींच्या भविष्यासाठी त्यांनी घेतलेली ही 'दौड'च आहे.

भारतीय शिक्षण प्रसारक मंडळाच्या अंबेजोगाई येथील खोलेश्वर संकुलाचा अमृत महोत्सव पार पडला. त्यानिमित्त 'अमृत दौड मॅरेथॉन' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या खुल्या धावण्याच्या स्पर्धेत शेकडो धावपटू सहभागी होऊन धावत होते. याच गर्दीत रमाबाई रणवीर सहभागी झाल्या होत्या. मुलीला पुस्तकं घेण्यासाठी पैसे कमी पडू नयेत म्हणून पहिलंच यायचं हे त्यांनी ठरवलं आणि करूनही दाखवलं. रमाबाईकडे कोणताही धावण्याचा सराव नव्हता. ना मॅरेथॉनसाठी लागणारे स्पोर्टसब शूज होते ना ट्रक सूट. घरकाम करर्णा?या रमाबाई अगदी रोजच्या साडीतच स्पर्धेत सहभागी झाल्या. पायात साधीशी जुनी झालेली स्लीपर, जी धावताना सतत पायातून निसटत होती. शेवटी रमाबाईंनी ती हातातच घेतली आणि आपले धावणे सुरू ठेवले.रमाबाईसाठी कदाचित शर्यत सोपी असावी, कारण याहीपेक्षा अवघड अडथळे पार करण्यात त्यांचे जीवन व्यस्त आहे. २०१२ मध्ये पतीच्या निधनानंतर दोन मुलींच्या पालनपोषणाची जबाबदारी त्यांच्यावर आली. कुटुंबाची जबाबदारी पार पाडण्याचं ध्येय त्यांच्यासमोर आहे.

त्यांचं शिक्षण सातवीपर्यंतचे. त्यामुळे कुटुंब चालवण्यासाठी घरकामाशिवाय पर्याय उरला नाही. शिक्षणाविना आपल्याला ज्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे ते आपल्या मुलींच्या नशिबी येऊ नये यासाठी कष्टाची तयारी त्यांनी ठेवली. आपल्या मुलींनी खूप शिकावे हा त्यांचा अट्टहास आहे. त्या सांगतात, 'मुलींच्या शिक्षणा साठी शेवटच्या श्वासापर्यंत प्रयत्न करणार.' यातच त्यांच्या मॅरेथॉन मधील जिद्दीचं गमक उलगडते.

रमाबाई यांच्या दोन्ही मुली उच्च शिक्षण घेत आहेत. मुलींच्या शिक्षणासाठी रमाबाई मूळ गाव हिंगोली सोडून अंबेजोगाईत स्थायिक झाल्या आहेत. लोकांकडे स्वयंपाकाचे काम करून त्या कुटुंब चालवितात. त्यांची एक मुलगी बीएससीचे शिक्षण घेत आहे, तर दुसरी मुलगी पोलीस भरतीसाठी तयारी करीत आहे. या मुलीला पुस्तकांसाठी पैसे हवे होते. मात्र अडचणींमुळे त्या देऊ शकल्या नाहीत. मुलीने आपण मॅरेथॉनमध्ये धावायला जाणार असल्याचे रमाबाईंना सांगितले. यात बक्षीस मिळणार, हे ऐकून त्याही मॅरेथॉनमध्ये सहभागी झाल्या.

स्पर्धेच्या सुरुवातीला सर्वांत मागच्या रांगेत उभ्या असलेल्या रमाबाई तीन किलोमीटरच्या शर्यतीत अनवाणी धावत राहिल्या. शर्यत संपली तेव्हा पहिला क्रमांक त्यांचाच होता. बक्षीस मिळाले तीन हजार रुपये. रमाबाई सांगतात की, अचानक आलेल्या जबाबदारीनंतर सुरूवातीला हाताला जे काम मिळाले ते केले. लोकांच्या शेतात काम केले. हळद वेचली, सोयाबीन, कापूस वेचला. कष्टाला नाही म्हणायचे नाही हे ठरवलेच होते. आता अंबेजोगाईत त्या ज्ञानदीप अकॅडमीत स्वयंपाकाचं काम करतात. तिथल्या विद्यार्थ्यां साठी त्या जेवण बनवतात. याच अकॅडमीत त्यांची मोठी मुलगी पोलीस भरतीची तयारी करत आहे. तिची पुस्तक खरेदी राहिली होती.रमाबाई धावल्या आणि जिंकल्या. त्यांना विचारले गेले की, 'या पैशांचं काय केलं?' रमाबाईंचे उत्तर होते, 'तीन हजार रुपये मुलीला पुस्तकांसाठी दिले.'

रमाबाईंचे हे उत्तर मुलींसाठी राबणा–या, धावणा–या समस्त मातांच्या भावनांचे प्रतिनिधित्व करणारे आहे. बीड जिल्ह्यातील अंबेजोगाईमध्ये राहणाऱ्या या ४७ वर्षांच्या आईला २९ ऑगस्ट २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले आणि 'आई'पणाचे अस्तित्व अधोरेखित झाले.

शुभांगी बागडे

गणेशमूर्तीचे रहस्य

भारतीय शिल्प परंपरेत गणेशाच्या अनेक प्रतिमा रूपांचा विकास झाला आहे आणि प्रदेश, काळ, आगम, शिल्प परंपरा व उपासना पद्धतीनुसार त्याच्या प्रतिमेतील घटक बदलताना दिसतात. गणेशाच्या पोटाभोवती असलेला नाग आणि पायाशी असलेला उंदीर या दोन प्रतीकांमध्ये गणेश प्रतिमेचा एक महत्त्वाचा तात्त्विक अर्थ दडलेला आहे.

गणपतीची मूर्ती आपण लहानपणापासून पाहत आलो आहोत. मोठे कान, वक्रतुंड, विशाल उदर, हातातील मोदक, पायाशी असलेला उंदीर आणि अनेक पारंपरिक प्रतिमांमध्ये पोटाभोवती वेटोळे घातलेला नाग ही गणेश प्रतिमेची परिचित रूप वैशिष्ट्ये आहेत. मात्र आपण या प्रतिमेकडे प्रामुख्याने भक्तिभावाने पाहतो. तिच्यामागे दडलेल्या प्रतीकात्मक तत्त्वज्ञानाचा विचार क्वचितच करतो. विशेषत गणेशाच्या पोटाभोवती असलेला नाग आणि पायाशी असलेला उंदीर या दोन प्रतीकांकडे बारकाईने पाहिले तर भारतीय प्रतीक चिंतनाची अद्भुत कल्पनाशक्ती आणि मानवी स्वभावाचे सूक्ष्म निरीक्षण यांचा परिचय होतो. गणेशाच्या प्रतिमेत ही दोन्ही प्रतिके एकाच देवतेच्या सान्निध्यात शांतपणे दिसतात. या विरोधाभासामध्येच गणेश प्रतिमेचा एक महत्त्वाचा तात्त्विक अर्थ दडलेला आहे.

भारतीय धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेत नागाकडे केवळ एक प्राणी म्हणून पाहिले गेलेले नाही. सर्पाला शक्ती, संरक्षण, विष, काल, प्रजनन, कुंडलिनी, भय आणि विनाश अशा अनेक अर्थछटा प्राप्त झाल्या आहेत. काही तांत्रिक, पुराणिक आणि ज्योतिषीय परंपरांमध्ये सर्प प्रतिमेचा संबंध राहू, मोह, आसक्ती, अतृप्त इच्छा आणि भौतिक आकर्षण यांसारख्या संकल्पनांशी जोडला जातो. मात्र 'नाग म्हणजे राहू' हा सर्व भारतीय परंपरांना लागू होणारा एकमेव अर्थ आहे, असे म्हणणे योग्य ठरणार नाही.इच्छा आणि वासना माणसाच्या जीवनाचा भाग आहेत. अनेक भारतीय विचार परंपरांमध्ये प्रवृत्तींचे दमन करण्यापेक्षा त्यांचे संयमन, संस्कार आणि रूपांतरण यांना महत्त्व दिले गेले आहे. म्हणूनच गणेशाच्या पोटाभोवतीचा नाग ही एक सुंदर रूपकात्मक प्रतिमा म्हणून वापरली जाते. गणेशाच्या पायाशी असलेला उंदीर या प्रतीक विश्वाला आणखी एक महत्त्वाची दिशा देतो. उंदराकडे चंचल मनाचे रूपक म्हणून पाहिले तर गणेशाच्या चरणाशी त्याचे स्थान अत्यंत अर्थपूर्ण वाटते.

आता एकदा गणेशाच्या संपूर्ण प्रतिमेकडे या दृष्टीने पाहू या. एका बाजूला नाग आहे तीव्र, शक्तिशाली, संभाव्यत हिंसक आणि भक्षक प्रवृत्तीचे प्रतीक. दुस?या बाजूला उंदीर आहे चंचल, अस्थिर आणि सतत धावणा?या मनाचे रूपक. निसर्गात नाग उंदराचा शत्रू आहे; परंतु गणेशाच्या सान्निध्यात दोघेही शांत आहेत. हा निसर्गातील नियम बदलल्याचा दावा नाही. हा मानवी अंतविश्वातील संघर्षाचे रूपक आहे. आपल्या आतही अशाच परस्परविरोधी प्रवृत्ती असतात. इच्छा आणि विवेक, क्रोध आणि संयम, लोभ आणि समाधान, अहंकार आणि नम्रता, चंचलता आणि स्थैर्य या सगळ्यांचा संघर्ष सतत सुरू असतो. या संघर्षावर राज्य कोणाचे असावे? हा खरा प्रश्न आहे. गणेश या प्रश्नाचे उत्तर देतो बुद्धीचे, विवेकाचे आणि आत्मनियंत्रणाचे. गणेश हा केवळ विघ्नहर्ता नाही. त्याच्या प्रतिमेत मानवी जीवनातील विरोधाभासांचा सुंदर समन्वय दिसतो. शिवपार्वतीचा पुत्र असलेला गणेश पुढे भारतीय समाजाच्या धार्मिक–सांस्कृतिक जीवनात सार्वत्रिक देवतेचे स्थान प्राप्त करतो. त्याचे विशाल मस्तक बुद्धीचे स्मरण करून देते, मोठे कान ऐकण्याची क्षमता शिकवतात, लहान डोळे एकाग्रतेचे प्रतीक मानले जातात, विशाल उदर जीवनातील अनुभव सामावून घेण्याची क्षमता दर्शवते.

भारतीय शिल्प परंपरेत गणेशाच्या अनेक प्रतिमारूपांचा विकास झाला आहे आणि प्रदेश, काळ, आगम, शिल्पपरंपरा व उपासना–पद्धतीनुसार त्याच्या प्रतिमेतील घटक बदलताना दिसतात. त्यामुळे नाग नसलेली प्रत्येक गणेश प्रतिमा अमान्य आहे, असे म्हणणे योग्य ठरणार नाही, परंतु ज्या विशिष्ट पारंपरिक गणेशरूपात पोटाभोवती नाग हा प्रतिमेचा अविभाज्य प्रतीकात्मक घटक म्हणून आलेला आहे. गणेशाच्या पोटावरचा नाग आणि पायाशी असलेला उंदीर आपल्याला एक सुंदर जीवन तत्त्वज्ञान सांगतात.

राणी चेन्नम्माचा काकती दुर्ग



बेळगाव शहराच्या उत्तरेस अवघ्या १० किलोमीटर अंतरावर वसलेला काकतीचा किल्ला हा केवळ एक छोटेखानी किल्ला नसून कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या सीमाभागातील ज्वलंत पराक्रम, राजकीय उलाढाली व संस्कृतीचा एक अनमोल ठेवा आहे. एका टेकडीवर दिमाखात उभा असलेला हा किल्ला आजही इतिहासप्रेमींना आपल्या वैभवशाली भूतकाळात घेऊन जातो.काकती गावातून अवघ्या काही मिनिटांतच गाठता येणा?या या किल्ल्याची सर्वात मोठी ओळख म्हणजे ही कित्तूरची राणी चेन्नम्मा यांची जन्मभूमी आहे!२३ ऑक्टोबर १७७८ रोजी काकतीचे जहागीरदार धूळप्पा देसाई आणि पद्मावती यांच्या पोटी याच किल्ल्यात चेन्नम्मांचा जन्म झाला. किल्ल्याच्या तटबंदीच्या सावलीत चेन्नम्मांचे बालपण गेले. लहानपणीच तलवारबाजी, धनुर्विद्या आणि घोडेस्वारीचे धडे त्यांनी काकती किल्ल्याच्या आवारात गिरवले. पुढे कित्तूरचे राजे मल्लसजा। देसाई यांच्याशी विवाहबद्ध झाल्यानंतर ब्रिटिशांविरुद्ध त्यांनी पुकारलेला पहिला सशस्त्र उठाव भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात सुवण। अक्षरांनी लिहिला गेला.काकती किल्ल्याचा इतिहास मराठा साम्राज्याच्या राजकीय पटलाशी थेट जोडलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दक्षिण दिग्विजयानंतर आणि पुढे पेशवेकाळात बेळगाव–कित्तूर हा संपूण। परिसर मराठ्यांच्या थेट प्रभावाखाली आला. काकती दुग। हे पेशव्यांचं महत्त्वाचं लष्करी आणि प्रशासकीय ठाणं मानलं जाई. मराठा राजवटीत काकतीचे देसाई घराणे पेशव्यांच्या छत्रछायेखाली काम करीत असत. उत्तरेकडून येणाऱ्या शत्रूंवर नजर ठेवण्यासाठी आणि मुलुखगिरीदरम्यान महसूल (चौथाई) गोळा करण्यासाठी या किल्ल्याचा वापर केला गेला. मराठा प्रशासनामुळे या काळात काकती किल्ल्यातील राजकीय व्यवहार आणि मोडी लिपीतील सनदा मराठीत लिहिल्या जात असत. खुद्द राणी चेन्नम्मांचे प्रारंभिक शिक्षण मराठी, कन्नड आणि संस्कृतमध्ये याच किल्ल्यात झाले, जे या भागातील समृद्ध संस्कृतीचे प्रतीक आहे.स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने हा किल्ला चुना न वापरता केवळ अवाढव्य पाषाणांची रचना करून बांधला आहे. येथे शत्रूवर लक्ष ठेवण्यासाठी उंच बुरुज आणि खडकात कोरलेली पाण्याची टाकी आजही पाहायला मिळतात. काळाच्या ओघात अवशेष उरले असले तरी काकतीचा हा बुलंद किल्ला राणी चेन्नम्मांच्या शौया।ची आणि मराठाकालीन इतिहासाची अमर साक्ष देत उभा आहे.

प्रांजल वाघ

समुद्राच्या गाभ्यातील अदृश्य विष

समुद्राचे वाढते तापमान, आम्लीकरण, प्लास्टिक प्रदूषण आणि अतिमासेमारी यामुळे सागरी परिसंस्था कमकुवत झाली आहे. त्यात 'फॉरएव्हर केमिकल्स'ची भर पडणे हे जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. समुद्रामध्ये अमर्याद कचरा सामावून घेण्याची क्षमता आहे, हा समज आता पूर्णपणे चुकीचा ठरला आहे. समुद्र सर्व काही गिळून टाकतो; पण ते नष्ट करत नाही. उलट ते प्रदूषण अन्नसाखळीमार्फत आपल्या ताटात परत येते.

विशाल महासागर दुरून जितके स्वच्छ, अथांग आणि शांत दिसतात, तितकीच चिंताजनक कहाणी त्यांच्या खोल गर्भात दडली आहे. एके काळी पृथ्वीवरील सर्वात सुरक्षित नैसर्गिक अधिवास मानले जाणारे समुद्र आता रासायनिक प्रदूषणाच्या विळख्यात सापडले आहेत. ते शेकडो वर्षे नष्ट होत नाही. या प्रदूषणापासून व्हेल आणि डॉल्फिनसारखे विशाल सागरी सस्तन प्राणीही सुरक्षित राहिलेले नाहीत. समुद्र म्हणजे जीवनाचा उगम, जैवविविधतेचा अथांग खजिना आणि पृथ्वीच्या हवामान संतुलनाचा सर्वात महत्त्वाचा आधार. पृथ्वीवरील सुमारे ७१ टक्के भूभाग व्यापणारे महासागर केवळ पाण्याचे साठे नाहीत, तर महाप्रचंड जीवसृष्टीचे आश्रयस्थान आहेत. मानवाने औद्योगिक प्रगतीच्या नावाखाली गेल्या शतकभरात निसर्गावर केलेल्या प्रयोगांचे सर्वाधिक दुष्परिणाम आता समुद्रांच्या तळाशी जमा होत आहेत. प्लास्टिक प्रदूषण, तेलगळती, सांडपाणी आणि रासायनिक कचरा या संकटांमध्ये आता 'पीएफएएस' किंवा 'फॉरएव्हर केमिकल्स' या आणखी एका अदृश्य शत्रूची भर पडली आहे. हे असे कृत्रिम रसायन आहे, जे एकदा पर्यावरणात गेले, की सहज नष्ट होत नाही. त्याची उपस्थिती शेकडो वर्षे टिकू शकते आणि परिणाम अनेक पिढ्यांपर्यंत जाणवू शकतात. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या जागतिक अभ्यासात व्हेल आणि डॉल्फिनसारख्या सागरी सस्तन प्राण्यांच्या शरीरात या रसायनांचे वाढते प्रमाण आढळल्याने जगभरातील पर्यावरण अभ्यासक चिंतेत आहेत. महासागराच्या सर्वात वरच्या अन्नसाखळीमध्ये असलेल्या या प्राण्यांच्या शरीरात इतक्या मोठ्या प्रमाणावर विषारी रसायने साठत असतील, तर समुद्रातील संपूर्ण परिसंस्थेच्या आरोग्यावर प्रश्नचिन्ह उभे राहणे स्वाभाविक आहे.

'पीएफएएस' म्हणजे पर आणि 'पॉलीफ्लुओरोअल्किल पदार्थ'. ही रसायने पाणी, तेल आणि उष्णतेला प्रतिरोधक असल्यामुळे त्यांचा वापर नॉन–स्टिक भांडी, जलरोधक कपडे, खाद्यपदार्थांच्या पॅकेजिंग, अग्निशमनासाठी वापरले जाणारे फोम, सौंदर्यप्रसाधने आणि अनेक औद्योगिक उत्पादनांमध्ये मोठ्या प्रमाणावर केला जातो. या रसायनांचा सर्वात मोठा दोष म्हणजे त्यांचे रासायनिक बंध अत्यंत मजबूत असतात. त्यामुळे ती नैसर्गिक प्रक्रियेत विघटित होत नाहीत. म्हणूनच त्यांना 'फॉरएव्हर केमिकल्स' असे नाव देण्यात आले आहे.